SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २६ नोव्हेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक २० | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सुक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 | 9130008644



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अदानी मुद्यावरून गोंधळ, राज्यसभेचे कामकाज स्थगित

**नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरील लाचेच्या आरोपावर तातडीने चर्चा करण्यात यावी, या मागणीवरून राज्यसभेत आज गदारोळ झाला. यामुळे सभागृहाचे कामकाज आधी १५ मिनिटांसाठी आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या पहिल्या दिवशी राज्यसभेचे कामकाज सरूरु होताच अध्यक्ष जगदीप धनकड यांनी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्यासह विविध सदस्यांनी दिलेल्या स्थगनप्रस्तावाच्या सूचनेकडे सभागृहाचे लक्ष वेधले. खडगे आणि अन्य सदस्यांनी सभागृहाचे कामकाज स्थगित करीत अदानी मुद्यावर तातडीने चर्चा घेण्याची मागणी केली होती. दुसरी स्थगनसूचना नैसर्गिक आपत्तीचा फटका बसलेल्या वायनाडच्या आर्थिक मदतीबाबत होती. नियम २६७ नुसार देण्यात येणाऱ्या स्थगनप्रस्तावाच्या सूचनेवर ८ डिसेंबर २०२२ रोजी मी माझी भूमिका स्पष्ट केली होती. या सर्व सूचना नियमानुसार नसल्यामुळे त्या फेटाळण्यात येत आहेत, असे धनकड म्हणाले. यामुळे काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्यांनी आपल्या जागेवर उभे होत घोषणा सुरू केल्या.



सभागृहातील गोंधळ वाढल्यामुळे धनकड यांनी १५ मिनिटांसाठी कामकाज स्थगित केले. सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यानंतर पुन्हा गोंधळ सुरू झाला. धनकड आपल्या जागेवरून उठून म्हणाले की, विरोधी पक्षनेते म्हणून मी नेहमीच खडगे यांचा आदर केला; मात्र त्यांच्या आजच्या भूमिकेमुळे मला वेदना झाल्या. सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करून खडगे यांनी अदानी मुद्यावर चर्चेची मागणी केली. यामुळे राष्ट्रहिताच्या मुद्यावर सभागृहाचे कामकाज चालवण्याचा उद्देश पूर्ण होत नाही, त्यामुळे त्यांची मागणी मान्य करता येत नाही.

संविधानाचा स्वीकार केल्याला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे सभागृहात रचनात्मक मुद्यावर तसेच देशाच्या प्रगती आणि विकासाच्या मुद्यावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे, असे धनकड म्हणाले. हे तुम्ही मला सांगण्याची गरज नाही, कारण, या ७५ वर्षात आमचेही ५४ वर्षांचे योगदान आहे, असे खडगे म्हणाले.

धनकड यांनी सभागृहाचे काकाज सुरळीतपणे चालू देण्याचे आवाहन सदस्यांना केले. गोंधळ थांबत नसल्यामुळे धनकड यांनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले. (तभा वृत्तसेवा)

## लोकसभेतही गदारोळ

अदानी आणि मणिपूरच्या मुद्यावर चर्चा करावी, या मागणीवरून झालेल्या गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज आधी दोन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात होताच सभापती ओम बिर्ला यांनी नांदेडचे काँग्रेस खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण आणि पश्चिम बंगालमधील खासदार एस. के. नुरुल इस्लाम यांच्या निधनाची सभागृहाला माहिती दिली. याशिवाय माजी लोकसभा सदस्य एम. एम. लॉरेन्स, एम. पार्वती आणि हरिश्चंद्र चव्हाण यांच्या निधनाचीही माहिती दिली. सभागृहाने या सर्व दिवंगत सदस्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यानंतर काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अदानीचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. यामुळे झालेल्या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. नंतरही गोंधळाची स्थिती कायम होती. विरोधी सदस्य ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.

या गोंधळातच सपाचे धर्मेंद्र यादव यांनी संभलमधील हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित केला. याप्रकरणी सपाच्या खासदाराविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचा आरोप करीत यादव म्हणाले की, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री आपली खूर्ची वाचवण्यासाठी संपूर्ण राज्याला हिंसाचाराच्या आगीत ढकलत आहे. विरोधी पक्षांचे सदस्य सभागृहाच्या मध्यभागी येऊन घोषणा देत होते, यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. गोंधळ थांबत नसल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

# पुन्हा पक्षफुटीची भीती, ठाकरेंनी घेतले शपथपत्र

**मुंबई, २५ नोव्हेंबर**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाचे विजयी झालेल्या २० आमदारांची पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बैठक बोलावली. यावेळी त्यांनी पक्षफुटीच्या भीतीने सर्व नवनिर्वाचित आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतले.

मुंबईत मातोश्री या उद्धव ठाकरे यांच्या खाजगी निवासस्थानी विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. यावेळी विधिमंडळ पक्षनेते म्हणून आमदार आदित्य ठाकरेंची एकमताने निवड करण्यात आली. तर, विधानसभेच्या गटनेतेपदी आमदार भास्कर जाधव यांची निवड करण्यात आली. पक्षाच्या प्रतोदपदी आमदार सुनील प्रभू यांना कायम ठेवण्यात आले आहे.मागील पक्षफुटीचा धसका उद्धव ठाकरेंनी चांगलाच घेतला आहे. त्यामुळे यावेळी निवडून आलेले आमदार तरी शेवटपर्यंत कायम





रहावे, यासाठी खबरदारीचे पाऊल म्हणून सर्व आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतल्याची माहिती पुढे आली आहे. मतमोजणीपूर्वीच मविआच्या तिन्ही घटक पक्षांनी हॉटेलचे बुकींग केले होते. आमदारांना मुंबई थांबविण्याबाबत उपाययोजना केल्या होत्या. मात्र, यावेळी निवडून आलेल्या उबाठाच्या आमदारांना परत मतदारक्षेत्रात जाण्याच्या सूचना देण्यात आल्या, त्यानुसार सर्व आमदार परत आपापल्या मतदारसंघात परत गेले.

# मतदानानंतरही ईव्हीएम बॅटरी ९९ टक्के कशी?

## निवडणूक आयोगाचे उत्तर

**मुंबई, २५ नोव्हेंबर**

ईव्हीएम पॉवर पॅक स्थिती ९९ टक्के दिसणे ही बाब तांत्रिकदृष्ट्या वस्तूस्थितीजन्य असल्याचे १७२ अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पत्रकाद्वारे कळविले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी दिवशी १७२ अणुशक्तीनगर मतदारसंघातील केंद्रात मतदानाच्या दिवशी ईव्हीएम पूर्ण दिवस वापरल्यानंतरही काही सीयूमध्ये ईव्हीएम पॉवर पॅक स्थिती ९९ टक्के होती, याबाबत एका उमेदवाराने आक्षेप नोंदविला होता.

निवडणूक आयोगाच्या ईव्हीएम संदर्भातील मार्गदर्शक सूचनांनुसार याबाबत वस्तूस्थितीदर्शक खुलासा करताना १७२ अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कळविले की, ईव्हीएम पॉवर पॅक २००० मतांसह १ सीयूसह ४ बीयूला जोडणी देण्याची रचना आहे. जेव्हा क्षमता जास्त असते, तेव्हा व्होल्टेज खूप हळूहळू कमी होते; परंतु जेव्हा बॅटरीची क्षमता 'थ्रेशोल्ड'च्या खाली कमी होते, तेव्हा ते वेगाने घसरते. एकच बीयू आणि १००० पेक्षा कमी मते नोंदविली असताना हलके विद्युत प्रवाह असल्यास, बॅटरीचा प्रवाह कमी असतो आणि आऊटपुट व्होल्टेज ७.४व्हीच्या खाली जाऊ शकत नाही आणि त्यामुळे ९९ टक्के क्षमता दर्शविली जाऊ शकते. अशा परिस्थितीत ही एक सर्वसामान्य स्थिती असून, याबाबतचा आक्षेप अयोग्य आहे तसेच अशाप्रकारे गैरसमज पसरविणे अयोग्य असल्याचेही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

**बीएमडब्ल्यू हिट अ‍ॅण्ड रन प्रकरण**

# मिहिर शाहच्या सुटकेस हायकोर्टाचा नकार

**मुंबई, २५ नोव्हेंबर**

बीएमडब्ल्यू हिट अ‍ॅण्ड रन प्रकरणातील मुख्य आरोपी मिहिर शाह याला बेकायदेशीर अटकेच्या आधारावर तत्काळ सुटका करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला.

शिवसेनेच्या माजी नेत्याचा २४ वर्षीय मुलगा शाह व त्याचा चालक राजऋषी बिदावत यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती व दावा केला होता की, त्यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेण्यात आले आहे आणि तत्काळ सुटकेची मागणी केली आहे.

मुंबईच्या वरळी भागात मिहिर शाहची बीएमडब्ल्यू कार दुचाकीला धडकली व यात ४५ वर्षीय महिला कावेरी नाखवा हिचा मृत्यू झाला व तिचा पती प्रदीप जखमी झाला. या प्रकरणी ९ जुलै रोजी आरोपी मिहिर शाहला अटक करण्यात आली. अपघाताच्या वेळी कारमध्ये असलेला त्याचा चालक बिदावत याला घटनेच्या दिवशी अटक करण्यात आली.

त्यांच्या विनंतीनुसार, पोलिसांनी त्यांना त्यावेळी त्यांच्या अटकेचे कारण सांगितले नव्हते, जे कायद्याचे उल्लंघन करत असल्याचा त्यांचा दावा होता. न्या. भारती डांगरे व न्या. मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठाने सोमवारी या याचिका फेटाळून लावल्या. याचिका फेटाळण्यात आल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

या दोघांनी या याचिकेतून आपल्या सुटकेची मागणी केली. पुढील कोणतीही अटक घटनात्मक आदेशाचे पूर्णपणे उल्लंघन करेल व फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५० चे पालन करण्यात अपयशी ठरेल, असा दावा या याचिकेतून करण्यात आला होता.

या कलमांतर्गत, पोलिसांनी एखाद्या व्यक्तीला अटक करताना, त्याला/तिला ज्या गुन्ह्यासाठी अटक केली जात आहे अशा अटकेच्या इतर कारणांची संपूर्ण माहिती त्याला/तिला कळवावी लागते. मिहिर शाह व बिदावत हे दोघेही सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

आपली अटक बेकायदेशीर असून आमची ताबडतोब सुटका करण्यात यावी अशी मागणी शाह व बिदावत यांनी ऑगस्टमध्ये उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेतून केली होती. (वृत्तसंस्था)

# गोव्याच्या मुख्यमंत्र्यांनी घेतली अडवाणींची भेट

**पणजी, २५ नोव्हेंबर**

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सोमवारी नवी दिल्लीत भाजपाचे जेष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेतली. यावेळी सावंत यांनी त्यांचे नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्याचे कौतुक केले. सावंत सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत.

माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेणे आणि त्यांचे आशीर्वाद मिळविणे हा एक सन्मान आणि विशेषाधिकार आहे, असे सावंत यांनी सोमवारी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत सांगितले.

अडवाणींचे नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्ये आजही मार्गदर्शक आहेत. माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना सेवेसाठी आणि देशाच्या उन्नतीसाठी स्वत:ला समर्पित करण्यासाठी प्रेरणा देत आहेत. त्यांना उत्तम आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्य मिळावे, अशी प्रार्थना करतो, असे ते म्हणाले. या दौऱ्यात सावंत यांनी केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांचीही भेट घेतली.



चर्चेदरम्यान मुरगाव पोर्ट ट्रस्टशी संबंधित महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली तसेच ऐतिहासिक व्हाईसरेगल पॅलेसचे अवशेष पुरातत्त्व विभाग गोवा सरकारकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेचा शोध घेतला. असे मुख्यमंत्र्यांनी एक्सवर सांगितले. (वृत्तसंस्था)

## 'एस अ‍ॅण्ड पी'ने घटवला आर्थिक वृद्धीचा अंदाज

**नवी दिल्ली :** उच्च व्याजदर आणि शहरी भागांत कमी झालेली मागणी लक्षात घेऊन जागतिक पत मानांकन संस्था 'एस अ‍ॅण्ड पी'ने पुढील दोन आर्थिक वर्षांसाठी भारताच्या आर्थिक वृद्धीचा दर घटवला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी दर ६.७ टक्के आणि त्यापुढील आर्थिक वर्षात ६.८ टक्के राहील, असा सुधारित अंदाज एस अ‍ॅण्ड पीने वर्तवला आहे. यापूर्वी अनुक्रमे ६.९ आणि ७ टक्के वृद्धीचा अंदाज वर्तवण्यात आला होता. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये भारताचा वृद्धी दर ६.८ टक्के राहील, असे एस अ‍ॅण्ड पीने म्हटले आहे.

# लिथुआनियात मालवाहू विमान घरावर कोसळून एक ठार

**विलिनस, २५ नोव्हेंबर**

लिथुआनियाच्या राजधानीजवळ डीएचएलचे मालवाहू विमान एका घरावर कोसळले. या अपघातात एक ठार झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

विमान कोसळल्यानंतर दोन जणांना रुग्णालयात हलवण्यात आले. त्यापैकी एकाचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले. विमानतळाजवळ असलेल्या दोनमजली घराला विमान धडकले, असे लिथुआनियातील सरकारी माध्यम एलआरटीने दिलेल्या वृत्तात म्हटले.

घरावर कोसळलेले मालवाहू विमान डीएचएलचे होते आणि ते जर्मनीतील लिपझिग येथून विलिनस येथे जात होते, अशी माहिती



लिथुआनिया विमानतळ प्राधिकरणाने दिली. अपघाताची माहिती मिळताच शहर सेवा आणि अग्निशमन विभागाचे बंब घटनास्थळावर दिसून आले, असे या माध्यमाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले.

या अपघाताबाबत जर्मनीतील बॉन येथे मुख्यालय असलेल्या डीएचएलने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. अपघातग्रस्त बोईंग ७३७ विमान ३१ वर्षे जुने होते. त्याची एअरफ्रेम जुनी असली, तरी मालवाहतुकीसाठी वापरली जाते, असे तज्ज्ञांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## दिल्ली सरकार वृद्धांना देणार अडीच हजार पेन्शन


**नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर दिल्ली सरकारने वृद्धांना पेन्शन देण्याची घोषणा केली. हे सरकार ८० हजार वयस्क लोकांसाठी वृद्धावस्था पेन्शन योजना सुरू करणार असल्याचे मुख्यमंत्री आतिशी यांनी जाहीर केले.

या योजनेची घोषणा माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी केली. आमच्या सरकारमध्ये १.२५ लाख वृद्धांना पेन्शन योजनेशी जोडण्यात आले आहे. आता एकूण ५ लाख ३० हजार वृद्धांना पेन्शन मिळणार असल्याची माहिती अरविंद केजरीवाल यांनी दिली. मी जिथे जात होतो, तिथे वृद्ध पेन्शनची मागणी करीत होते. त्यामुळे दिल्ली सरकार ही योजना लागू करणार असल्याचे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### नवीन वर्षात येताहेत् दमदार मराठी चित्रपट










**मुंबई :** २०२५ मध्ये अनेक नव्या दमाचे मराठी चित्रपट भेटीला येत आहेत. गरम गरम 'जिलबी'ची गोड चव काही औरच असते. अशीच एक लज्जतदार 'जिलबी' आपल्या भेटीला मराठी चित्रपटरूपात येणार आहे. आनंद पंडित मोशन पिक्चर्स निर्मित ही खुमासदार 'जिलबी' १७ जानेवारीला आपल्या मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे. अभिनेता प्रसाद ओक, स्वप्निल जोशी, शिवानी सुर्वे या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. या तिघांच्या जोडीला पर्ण पेठे, गणेश यादव, प्रणव रावराणे, अश्विनी चावरे, प्रियांका भट्टाचार्य या कलाकारांचे अभिनय पाहायला मिळणार आहेत. समीर रमेश सुर्वे लिखित-दिग्दर्शित 'मिशन अयोध्या' हा चित्रपट २३ जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची कथा रामभक्ती आणि अयोध्या या ऐतिहासिक संदर्भात गुंफलेली असल्याने चित्रपटाबद्दल जनमानसात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटातील कलाकार आणि निर्मितीशी संबंधित इतर सदस्यांची नावे अद्याप गुपित ठेवली आहेत. टी-सीरीज, कलर यल्लो प्रॉडक्शन आणि चलचित्र मंडळी यांचा चित्रपट 'फसक्लास दाभाडे' २४ जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. त्याचे दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी केले आहे. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर चित्रपटाचे नवीन पोस्टर आणि प्रदर्शनाची तारीख सोशल मीडियावर जाहीर करण्यात आली होती. अमेय वाघ, क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर यांच्यासह निवेदिता सराफ, हरिष दुधाडे, राजन भिसे, राजसी भावे यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. पोस्टरमध्ये एक एकत्रित कुटूंब दिवाळी साजरी सादरी करताना दिसत आहे.

### अभिषेकने अखेर ऐश्वर्याबाबत सोडले मौन

**मुंबई :** 'आय वॉण्ट टू टॉक' या चित्रपटामुळे अभिषेक बच्चन बराच चर्चेत आहे. या चित्रपटात त्याने एका आजाराने त्रस्त असलेल्या वडिलांची भूमिका साकारली आहे. असे असतानाच अभिषेक हा सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे जास्त चर्चेत आला आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने त्याने एका मुलाखतीत, मी खरच खूप भाग्यवान आहे की, मला बाहेर जाऊन चित्रपट करण्याची संधी मिळत आहे. कारण, मला माहिती आहे, आराध्यासोबत घरी ऐश्वर्या आहे. त्यासाठी मी तिचे खरच आभार मानतो. मुले तुम्हाला कधीच कोणती तिसरी व्यक्ती म्हणून पाहात नाही. ते कायमच तुम्हाला त्यांच्या आयुष्यातली पहिली व्यक्ती म्हणून पाहात असतात, असे म्हटले.

### एक दिवस आधीच प्रदर्शित होणार 'पुष्पा २'





**मुंबई :** अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. सध्या अ‍ॅडव्हॉन्स बुकिंगला सुरुवात झाली आहे. काही दिवसांपूर्वी पुष्पा २ चित्रपटाचा चेन्नईमध्ये भव्य कार्यक्रम पार पडला, जिथे या चित्रपटाचे गाणे प्रसिद्ध करण्यात आले. या गाण्याला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाने अमेरिकेत प्री सेल्समध्ये प्रचंड कमाई केली. हा चित्रपट हैदराबादमधील विमल चित्रपटगृहात प्रदर्शित होण्याच्या एक दिवस आधी स्पेशल प्रीमियर ठेवण्याचे नियोजन सुरू आहे. परंतु, निर्मात्यांनी अद्याप या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही. असे झाले तर, हा चित्रपट एक दिवस आधी प्रेक्षकांच्या भेटीला येऊ शकतो.

# पाच वर्षे आमदारकीचा थाट, आता मतदारांनी फिरवली पाठ!


## राज्यात ६५ आमदारांचा दारुण पराभव

**मुंबई, २५ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत मोठा उलटफेर पाहायला मिळाला. मतदारांनी महायुतीच्या पदरात मतांचे दान टाकले खरे, पण सोबतच अनेक विद्यमान आमदारांना पराभवाची चव चाखायला भाग पाडले. अनेक ठिकाणी तर मतदारांनी प्रस्थापितांचा पुरता धुव्वा उडवला. यंदाच्या निवडणुकीत तब्बल ६५ आमदारांना पराभवाचा सामना करावा लागला. एवढेच काय तर, सहा आमदारांचे डिपॉझिटही जप्त झाले आहे.

चौदाव्या विधासभेतील १८५ आमदार पुन्हा पंधराव्या विधानसभेत दिसणार आहेत. पराभूत आमदारांमध्ये सर्वाधिक १९ काँग्रेसच्या व राष्ट्रवादी काँग्रेसच्या १० आमदारांचा समावेश आहे. शरद पवार गटाचे ८ आणि उद्धव ठाकरे गटाचे ७ आमदार पुन्हा जिंकू शकले नाहीत. शिवसेनेचे ६, भाजपाचे ५, बहुजन विकास आघाडीचे ३, प्रहारचे २, एमआयएम आणि मनसेचा एक आणि तीन अपक्ष आमदारांना पराभवाचा सामना करावा लागला. या सर्व आमदारांना मतदारांनी नाकारल्याचे निवडणूक निकालांमध्ये स्पष्ट झाले.

शरद पवारांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक २० विद्यमान आमदार निवडणुकीत पराभूत झाले. त्यानंतर विदर्भातील १२ आमदारांना पराभवाचा सामना करावा लागला. मुंबईतील ८ आमदारही निवडणूक जिंकू शकले नाहीत. (वृत्तसंस्था)





निवडणूक रिंगणात उतरलेल्या विद्यमान आमदारांपैकी काही आमदारांचा तर पार सुपडा साफ झाला. सहा आमदारांना एकूण मतांपैकी १६ टक्के मतेही मिळवता आली नाहीत. त्यात मीरा-भाईंदरमधून गीता जैन, मानखुर्दमधून नवाब मलिक, मेळघाटमधून राजकुमार पटेल, मोर्शीतून देवेंद्र भुयार, गेवराईतून लक्ष्मण पवार आणि आष्टीमधून बाळासाहेब आजबे यांचा समावेश आहे.

### मुंबईतील 'या' विद्यमान आमदारांचा पराभव

मुंबईतही अनेक प्रस्थापित विद्यमान आमदारांना मतदारांनी पराभव चाखायला भाग पाडले. त्यात वर्सोव्यातून भारती लवेकर, भायखळ्यातून यामिनी जाधव, माहीममधून सदा सरवणकर, वांद्रे पूर्वमधून झिशान सिद्दिकी, चेंबूरमधून प्रकाश फातेर्पेकर, अंधेरी पूर्वमधून ऋतुजा लटके, भांडुपमधून रमेश कोरगांवकर आणि आपला मतदारसंघ सोडून मानखुर्दमधून निवडणूक रिंगणात उतरलेले नवाब मलिक यांचा समावेश आहे.


**ट्रम्पेटने डाव साधला**

# शरद पवारांच्या पक्षाला नऊ जागांवर फटका

**मुंबई, २५ नोव्हेंबर**

शरद पवार यांच्या पक्षाला या निवडणुकीत ट्रम्पेटमुळे नऊ जागांवर फटका बसला आहे. तुतारीला मिळणारी मते शरद पवार यांच्या पक्षाला मिळाली असती, तर या नऊ जागांवर शरद पवार गटाचे उमेदवार विजयी झाले असते, असे बोलले जात आहे.

विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाचे चिन्ह तुतारी फुंकणारा माणूस असे होते. याच निवडणुकीत अनेक जागांवर तुतारी (ट्रम्पेट) असे चिन्ह असलेले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. तुतारी या नावामुळे अनेक जागांवर शरद पवार यांच्या पक्षाला फटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात होता. त्याची प्रचिती आता आली आहे. (वृत्तसंस्था)



### मतांचा फरक काय?

जालना जिल्ह्यात शरद पवार गटाचे विजय भांबळे यांचा पराभव झाला. या मतदारसंघात त्यांचा ४,५१६ मते कमी पडली, तर तुतारी म्हणजेच ट्रम्पेटला ७,४३० मते मिळाली. घनसावंगीमध्ये राजेश टोपे यांचा २,३०९ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेट या चिन्हाला ४,८३० मते मिळाली. शहापूर येथे शरद पवार यांच्या पक्षाचे पांडुरंग बरोरा यांचा १,६७२ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेटला ३,८९२ मते मिळाली. बेलापूरमध्ये शरद पवार पक्षाचे संदीप नाईख यांचा अवघ्या ३७७ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेटला २,८६० मते मिळाली. अणुशक्तीनगर येथे फहाद अहमद यांचा ३,३७८ मतांनी पराभव झाला. येथे तुतारीला ४,०७५ मते मिळाली.

### कोणकोणत्या जागांवर बसला फटका

**जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव, पारनेर, केज, परंडा या जागांवर शरद पवार गटाच्या उमेदवारांचा जेवढ्या मतांनी पराभव झाला, त्यापेक्षा अधिक मते तुतारी हे निवडणूक चिन्ह असलेल्या उमेदवाराला मिळाली आहेत.**

CMYK

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



# भारतीय संविधान महोत्सवाचे आज उद्घाटन

## संसदेच्या केंद्रीय कक्षात विशेष कार्यक्रम

◆ **नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मंगळवारी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून वर्षभर चालणाऱ्या भारतीय संविधान महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे.

संविधान सदन म्हणजे जुन्या संसदभवनातील केंद्रीय कक्षात सकाळी ११ वाजता आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे प्रमुख संबोधन होणार आहे. यावेळी राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एका विशेष नाण्याचे तसेच डाक तिकिटाचे विमोचनही यावेळी केले जाणार आहे. भारतीय संविधानाच्या संस्कृत तसेच मैथिली भाषेतील पुस्तकाचे विमोचनही होणार आहे.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचा आपल्या देशाने स्वीकार केला तसेच २६ जानेवारी १९५० रोजी हे संविधान देशात लागू करण्यात आले. त्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. त्याचा शुभारंभ मंगळवारी होत आहे. यानिमित्त देशभर शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये तसेच अन्य ठिकाणी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचनही केले जाणार आहे.

आज एका पत्रपरिषदेत विधि आणि न्याय राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार अर्जुनराम मेघवाल, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि संस्कृती मंत्री गजेंद्र शेखावत यांनी संविधान महोत्सवानिमित्त वर्षभर आयोजित कार्यक्रमांची माहिती दिली. ◄(तभा वृत्तसेवा)




# तटरक्षक दलाने जप्त केले सहा टन मादकपदार्थ

◆ **पोर्ट ब्लेअर, २५ नोव्हेंबर**


तटरक्षक दलाने अंदमान-निकोबार द्वीपसमूहाजवळ मोठी कारवाई करीत सहा टन मादकपदार्थ जप्त केले. नौकेतून मेथॅम्फेटामाईनची तस्करी करणाऱ्या म्यानमारच्या सहा नागरिकांना अटक करण्यात आली.

प्रत्येकी दोन किलो वजनाच्या सहा हजार पाकिटांमध्ये मादकपदार्थ ठेवण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत याचे मूल्य कोट्यवधी रुपये आहे. नियमित गस्त घालत असताना तटरक्षक दलाच्या डॉर्नियर विमानाच्या चालकाला २३ नोव्हेंबर रोजी पोर्ट ब्लेअर बेटापासून १५० किमी अंतरावर असलेल्या उजाड बेटाजवळ मासेमारी करणाऱ्या एका ट्रॉलरची संशयास्पद हालचाल दिसली. ट्रॉलरला इशारा देत वेग कमी करण्यास सांगण्यात आले आणि त्याच वेळी वैमानिकाने याबाबतची माहिती अंदमान-निकोबार कमांडला दिली. माहिती मिळताच गस्त घालणाऱ्या वेगवान नौका या बेटाकडे रवाना झाल्या. ट्रॉलरवरील म्यानमारच्या सहा नागरिकांना अटक करण्यात आली. ◄(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### महायुतीच्या विजयाला शेअर बाजारांची सलामी

**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील भाजपा-महायुतीच्या विजयानंतर सोमवारी शेअर बाजारांनी जोरदार सलामी दिली. आज



सुरुवातीच्या सत्रात सेन्सेक्स सुमारे १,३०० अंकांनी झेपावला आणि ८०,४७३ च्या अंकाला स्पर्श केला. निफ्टी ४१३ अंकांनी वाढला. सुरुवातीची सेन्सेक्स-निफ्टीची ही तेजी अनुक्रमे १.६ आणि १.७ टक्के एवढी होती. दिवसभराच्या व्यवहारानंतर सेन्सेक्स ९९२ अंकांच्या वाढीसह ८०,१०९ अंकांवर, तर निफ्टी ३१४ अंकांच्या वाढीसह २४,२२१ या पातळीवर स्थिरावला. निफ्टी पीएसयू बँक ४ टक्के वाढला. निफ्टी बँक २ टक्के, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेस निर्देशांकात १.८ टक्के वाढ दिसून आली. बीएसई मिडकॅप १.६ टक्के, तर स्मॉलकॅप १.८ टक्के वाढला. आज सर्वच क्षेत्रांतून खरेदी दिसून आली. ■

### राज्यात वाढणार थंडीचा जोर, उत्तर महाराष्ट्रात हुडहुडी

**मुंबई**: राज्यात अचानक थंडीची लाट आली असून, सर्वत्र गारठा जाणवू लागला आहे. उत्तर महाराष्ट्रात तापमानात चांगलीच घट झाली आहे. या आठवड्यापासून उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे थंडीचा कडाका हळूहळू वाढू लागला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही गारठा वाढला. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात थंडीचा जोर आणखी वाढणार असून, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तापमान १० अंशाखाली जाण्याची शक्यता आहे. राज्यात यंदा कडाक्याच्या थंडीची लाट राहणार असून, नोव्हेंबरच्या शेवटी आणि डिसेंबरच्या सुरुवातीला महाराष्ट्रातील तापमान कमी होणार असल्याचा अंदाज आहे.

## भारताचा ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय




**पर्थ : वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियन भूमीवर जोरदार मुसंडी मारत बॉर्डर-गावस्कर करंडक मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात वर्चस्व गाजवले आणि यजमान ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी सर्वांत मोठा विजय नोंदवला. या विजयाचा आनंद साजरा करताना विराट कोहली व इतर भारतीय क्रिकेटपटू**

# मूठभर लोक स्वार्थासाठी संसदेला वेठीस धरतात

- विरोधकांनी मतदार, संविधानाच्या अपेक्षांवर उतरावे
- पंतप्रधान मोदी यांचा जोरदार हल्ला

◆ **नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

मतदार, संविधान आणि जगाच्या भारताकडून ज्या अपेक्षा आहेत, त्या कसोटीवर उतरण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज संसदेतील विरोधी पक्षांच्या सदस्यांना केले. ज्यांना जनतेने ८० ते ९० वेळा नाकारले आहे, ते आता संसदेवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. राजकीय स्वार्थासाठी हे मूठभर लोक संसदेला वेठीस धरत आहेत, असा टोलाही पंतप्रधानांनी हाणला.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून प्रारंभ झाला. त्यासाठी सकाळी संसदभवनात आगमन झाल्यानंतर मोदी माध्यमांशी बोलत होते. विरोधी पक्षांनी मतदारांच्या तसेच जागतिक समुदायाच्या अपेक्षांच्या कसोटीवर उतरले पाहिजे. यातून मतदार आणि लोकशाहीवरील



प्रतिबद्धता तसेच भारतीय संविधानवरची निष्ठा आणि समर्पणाची भावना तसेच संसदीय प्रक्रियेवरील विश्वासाचे प्रतिबिंब दिसून आले पाहिजे, असे मोदी म्हणाले.

हिवाळी अधिवेशनातील वातावरण थंडीमुळे आणखी थंड राहील, अशी अपेक्षा आहे. २०२४ च्या शेवटच्या टप्प्यात आम्ही पोहोचले आहो. २०२५ म्हणजे नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्व जण उत्सुक आहेत. यावेळचे संसदेचे अधिवेशन अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण आहे; कारण आपली संविधानाची यात्रा ७५ व्या वर्षात प्रवेश करीत आहे. लोकशाहीच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा आणि गौरवपूर्ण असा टप्पा आहे, असे मोदी म्हणाले.

संविधान निर्माण करणाऱ्यांनी एकेक मुद्यावर सखोल चर्चा केली, तेव्हाच संविधानाचा ऐतिहासिक दस्तावेज तयार झाला आहे. संसद आणि खासदार भारतीय संविधानाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळे संसदेत सर्व मुद्यांवर मनमोकळी चर्चा झाली पाहिजे आणि सर्व सदस्यांनी या चर्चेत सहभागी व्हायला पाहिजे. दुर्दैवाने काही मुठभर लोक आपल्या राजकीय स्वार्थासाठी संसदेला ओलिस धरण्याचा प्रयत्न करतात; मात्र यात ते यशस्वी होत नाही. जनतेचे अशा गोंधळी खासदारांवर लक्ष असते आणि योग्यवेळी त्याची शिक्षाही जनता अशा खासदारांना देत असते, असे मोदी म्हणाले.

**नवीन खासदारांना चुकवावी लागते किंमत**

सभागृहात गोंधळ घालणाऱ्या सदस्यांची सर्वांत जास्त किंमत नवीन खासदारांना चुकवावी लागते. त्यांना बोलण्याची, चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळत नाही. संसदेतून राजकीय नेत्यांची नवी पिढी तयार करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. मात्र, जनतेने नाकारलेले नेते संसदेत लोकांच्या आकांक्षावर चर्चा होऊ देत नाही. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सहकार्य करा, असे आवाहन मी वारंवार विरोधी सदस्यांना करीत आहे, त्यातील काही सदस्यांची भूमिकाही तशीच आहे, पण गोंधळी सदस्य पक्षातील आपल्या सहकाऱ्यांचेही ऐकत नाही, याकडे मोदी यांनी लक्ष वेधले. ◄(तभा वृत्तसेवा)







## अग्रलेख...

# सहिष्णुतेची नवी कसोटी!

केवळ काही वर्षे, दशकांचाच नव्हे, तर कित्येक शतकांचा आणि अनेक पिढ्यांचा सांस्कृतिक संघर्ष सामंजस्याच्याच मार्गाने संपुष्टात येऊ शकतो, हे अयोध्या वादातून निघालेल्या तोडग्याने दाखवून दिलेले असताना, असेच अनेक वादग्रस्त मुद्देही याच मार्गाने सोडविण्याचा सामाजिक समंजसपणा दाखविण्याची गरज आता पुन्हा एकदा समाजासमोर प्रभावीपणे मांडणे आवश्यक झाले आहे. अयोध्येतील जवळपास पाचशे वर्षांपासूनची वादग्रस्त वास्तू ही मूळची प्रभू रामचंद्रांची जन्मभूमी आहे आणि या जागेवर असलेल्या वास्तूच्या जागेवर पूर्वी मंदिर होते याचे असंख्य पुरातन व आधुनिक पुरावे समोर आल्यानंतरही या वादाने भारतातील दोन धर्मांच्या लोकांत तीव्र संघर्षाचे अनेक प्रसंग उद्भवले. सांस्कृतिक अस्मितेच्या अभिमानबिंदूंना धक्का लागला, तर अन्यथा सहनशील व सहिष्णू असलेला समाजदेखील संतापून उठतो आणि संघर्षास सिद्ध होतो, हा भारताचा इतिहास आहे. भारतावर गेल्या अनेक शतकांपासून अनेक परकीय आक्रमणे झाली आणि ज्या संस्कृतीच्या आधारावर या विभिन्न प्रांतरचना असलेल्या समाजाचे सामाजिक ऐक्य टिकून राहिले, त्या संस्कृतीचे अस्तित्वच पुसण्याचे अनेक प्रयत्नही झाले. सांस्कृतिक ऐक्य ही या खंडप्राय देशाची ताकद आहे आणि ते ऐक्य मोडून काढले तरच भारतावर सत्ता गाजविणे शक्य होईल हा परकीय आक्रमकांचा विचार होता. त्यामुळेच त्यांनी सामाजिक संवेदनांना धक्का देण्याचे तंत्र अवलंबिले. भारतीय समाज ज्यांच्याकडे शक्तिस्थळे म्हणून पाहतो, ज्यांच्या स्मरणाने, दर्शनाने आणि आराधनेतून या समाजास ऊर्जा प्राप्त होते, ती शक्तिस्थळे उद्ध्वस्त करून या समाजाचे मानसिक हनन करणे सोपे होईल असाच या आक्रमकांचा हेतू होता. तुमच्या शक्तिस्थळांहूनही आमची शक्ती अधिक आहे, असा संदेश देण्यासाठी व त्याद्वारे भारतीय समाजाचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी या आक्रमकांनी मंदिरांची नासधूस केली, तरीही या समाजाने हार मानलीच नाही हा इतिहास आहे. अयोध्येतील पाच शतकांहून अधिक काळाचा सांस्कृतिक अस्मितेचा मुद्दा केवळ न्यायालयाच्या आदेशाने सुटला हे मानणे शंभर टक्के योग्य नाही. कदाचित, कायद्याच्या चौकटीत तो तसा सुटलादेखील असता, पण ते तेवढेच झाले असते, तर सामाजिक नाराजीची भावना खदखदत राहिली असती. धार्मिक संघर्षाची बीजे कुठे तरी नवे कोंब फुटण्याची व योग्य वेळ येण्याची वाट पाहात स्वस्थ राहिली असती आणि या जाणिवेने सामाजिक अस्वस्थताही धुमसत राहिली असती. तसे झाले नाही, यावरूनच, सामाजिक सामंजस्य आणि संस्कृतीचा आदर करून समाजाच्या भावनांचा सन्मान करण्याची भावना जागी करण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांचाही या समस्यापूर्तीमध्ये मोठा वाटा राहिला, हे आज संपूर्ण देशाने मान्य केले आहे.

म्हणूनच, जेथे अशा समस्यांची बीजे डोकी वर काढण्याची संधी शोधत असतात, तेथे अगोदर सामंजस्याच्या मार्गाने व संयमीपणाने तोडगा काढण्याचा केंद्रातील मोदी सरकारचा प्रयत्न असतो. अयोध्येचा वादग्रस्त मुद्दादेखील कायमचा निकाली निघून भारतीय संस्कृती, परंपरा आणि श्रद्धेचा विजय झाल्यानंतर अन्य वादग्रस्त मुद्देही याच मार्गाने सोडविण्यासाठी सरकार सरसावले आहे. भारतातील सर्वधर्मीय समाजाने सरकारची ही भावना प्रामाणिक असल्याचे मान्य केल्यास या प्रयत्नांना अधिक ताकद मिळेल आणि सौहार्दाचे वातावरणदेखील कायम राहील, अशी अपेक्षा करावयास हवी. पण गेल्या दशकभरातील राजकारणाचे रंग या अपेक्षेस फारसे अनुकूल नाहीत, हे वारंवार स्पष्ट झाले आहे. धर्माच्या, जातीच्या आणि आर्थिक स्तराच्या आधारावर समाजात वर्गभेद रुजविण्याचे राजकारण या प्रयत्नांस अडथळे आणू पाहात असल्याने, समाजातही संभ्रम निर्माण होतो आणि या प्रयत्नांची वाट अधिकच खडतर होऊ लागते. वस्तुत:, या देशाच्या प्राचीन सांस्कृतिकतेवरदेखील हिंदू समाजव्यवस्थेचाच प्रभाव आहे आणि शेकडो वर्षांच्या संस्कृतीची मुळे या जीवनशैलीतच रुजलेली आहेत, हे स्वयंस्पष्ट सत्य असताना, अशा वादांना खतपाणी घातले जाईल अशी कोणतीही भूमिका केवळ राजकीय स्वार्थ साधण्यापलीकडे काहीच साध्य करू शकत नाही, हे वारंवार स्पष्टदेखील झाले आहे. समाज म्हणून शतकानुशतके सोबत राहणाऱ्या समूहांना परस्परांच्या जीवनशैलीची, संस्कृतीची आणि अस्मितांचीदेखील नेमकी ओळख असल्याने, त्या जपण्याची सहिष्णुतादेखील समाजाने जपलेली आहे. मात्र, राजकारणातील तात्कालिक लाभाची गणिते अशा भावनांना तडे देऊ पाहतात, तेव्हा समाजात संभ्रम निर्माण होऊन त्याचा परिणाम संघर्षात होतो, हेही अनेकदा स्पष्ट झालेले आहे. अशा संघर्षांतून सामाजिक स्वास्थ्य बिघडते, परस्परांविषयी अविश्वासाच्या भावना वाढीस लागतात आणि अशांततेच्या शंकेमुळे अस्थैर्य निर्माण होऊन असुरक्षितता वाढते, हेही स्पष्ट असताना, असे वादग्रस्त मुद्दे सामंजस्याने सोडविण्याच्या प्रयत्नांस सहकार्य करण्याची भूमिका समाज व देशहिताच्या दृष्टीने आवश्यक असते. राजकीय स्वार्थाच्या गणितांपुढे मात्र ही गरज प्रभावहीन ठरत असल्याने, अनेक वादग्रस्त मुद्दे धुमसत राहतात आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम समाजाच्या मानसिक स्वास्थ्यावर होतात. त्यामुळे जुन्या वादांवर तोडगा काढण्याच्या नव्या प्रयत्नांस सामूहिक राजकीय साथ देण्याचा प्रामाणिकपणा राजकारणाने दाखवावयास हवा.

उत्तर प्रदेशातील संभल मशिदीच्या सर्वेक्षणाबाबत न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर तेथे उफाळलेल्या हिंसाचाराची दखल घेताना अशा काही शंकांचे निरसन होणे आवश्यक आहे. संभल येथील या मुघलकालीन मशिदीच्या जागी अगोदर हरिहर मंदिर होते, असा दावा करणारी याचिका स्थानिक न्यायालयात दाखल करण्यात आल्यानंतर त्या वास्तूच्या सर्वेक्षणाचा आदेश न्यायालयाने दिला होता. त्यानुसार सर्वेक्षणाचे काम सुरू झाल्यावर या परिसरात हिंसक घटना घडू लागल्या. दगडफेकीचे प्रकार वाढले, सुरक्षा यंत्रणांवरच जमावांचे हल्ले सुरू झाले आणि काही जणांचा हिंसाचारात मृत्यू ओढवला. रविवारी या संघर्षास तोंड फुटले, सर्वेक्षणास विरोध करणाऱ्या जमावाने काही वाहने पेटवून दिली आणि लगेचच त्याचे राजकीय पडसादही उमटू लागले आणि विरोधकांची इंडिया आघाडी या हिंसाचारास प्रोत्साहन देत असल्याचा थेट आरोप सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने केला. अयोध्येतील राम जन्मभूमीवर बांधण्यात आलेल्या वास्तूचा आणि या मशिदीच्या उभारणीचा काळ एकच असल्याचे, म्हणजे सन १५२६ मध्येच ही मशीद उभारण्यात आल्याचे सांगण्यात येते. त्याआधी याच जागेवर हरिहराचे मंदिर होते, असा याचिकाकर्त्याचा दावा असल्याने उभय बाजूंचे दावे प्रतिदावे पडताळून पाहणे न्याय्यच ठरते. सामाजिक समस्यांवर सामंजस्याने तोडगा काढण्याचा तो सुसंस्कृत मार्ग असतो. म्हणूनच, न्यायालयाच्या दारात दाद मागणाऱ्या कोणत्याही वादात शस्त्रांच्या साह्याने घुसखोरी करून बळाच्या जोरावर न्यायव्यवस्थेला आव्हान देणे गैर ठरते. यामुळेच, बाबरी वादाप्रमाणेच हा वादही सामंजस्यानेच सुटणे शक्य आहे याची जाणीव संघर्षशील समाजघटकांमध्ये रुजविण्याची गरज असताना, त्याला राजकीय वळण दिले गेल्यास तो अधिक चिघळण्याचीच शक्यता जास्त असल्याने, राजकारणाने त्यापासून अलिप्त राहणेच योग्य ठरते. देशातील सर्व समाजघटक परस्परांसोबत सौहार्दाने राहिल्यास सामाजिक स्वास्थ सुरक्षित राहते आणि आश्वस्ततेमुळे शांततेचे वातावरण राहिल्यास प्रगतीची वाटचाल सुनिश्चित होते. तसे व्हावे आणि वादाचे न्याय्य निराकरण व्हावे ही आजची देशातील सामाजिक गरज असताना, संभलमधील संघर्षाचे पडसाद अन्यत्र उमटल्यास शांतता व सुरक्षिततेच्या भावनांना धक्का पोहोचण्याची भीती आहे. न्यायव्यवस्था ही समाजातील समस्यांवर तोडगा काढणारी लोकशाही व्यवस्थेतील सर्वांत सक्षम आणि शक्तिशाली व्यवस्था आहे, हे या देशात सिद्ध झालेले आहे. समाजाने या व्यवस्थेला समंजसपणाने साथ दिली, तर शतकांचे संघर्षदेखील सहज सुटू शकतात, हे अयोध्या वादाने सिद्धदेखील केले आहे. म्हणूनच, संभल मशिदीच्या जागेच्या वादाचा मुद्दा न्यायालयाच्या दारात असताना, संघर्ष टाळण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावयास हवे.

## आंतरराष्ट्रीय

# कॅनडात खलिस्तान्यांची एवढी वरवर का?

**वसंत गणेश काणे**

(पूर्वार्ध)

"कॅनडामधील खलिस्तानवादी दहशतवादी हरदीप सिंग निज्जर याच्या हत्येच्या कटाची पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री जयशंकर यांना माहिती होती, असा दावा करणारे कॅनडाच्या प्रसारमाध्यमांतील वृत्त म्हणजे मानहननाच्या मोहिमेचा भाग असून यामुळे दोन देशांतील आधीच ताणलेले संबंध अधिकच दुरावतील,'' असा इशारा भारताने कॅनडाला दिला आहे. त्यानंतर पंतप्रधान ट्रुडो यांनी असा कोणताही पुरावा उपलब्ध नाही, असा खुलासा केला आहे.

**कॅनडातील शीख** : कॅनडाची आजची लोकसंख्या सुमारे ३ कोटी ८२ लाख असून, यात २ कोटी ७४ लाख मतदार आहेत. कॅनडा मुळात बहुसांस्कृतिक आणि सर्वसमावेशकता असलेला देश आहे. म्हणून लोक या देशात नोकरी, शिक्षण आणि व्यवसाय यानिमित्त स्थायिक होण्यास उत्सुक असतात. भारतातील शीख, गुजराती, पंजाबी आदी भाषक लोक मोठ्या संख्येत कॅनडात स्थायिक झाले आहेत. कॅनडात तशी शिखांची लोकसंख्या आठ लाखच आहे; पण ती तीन प्रांतातच आणि काही विशिष्ट शहरांत किंवा मतदारसंघांतच केंद्रित झालेली आहे. त्यामुळे त्या त्या ठिकाणी शिखांच्या जबरदस्त मतपेढ्या उभ्या झाल्या आहेत. जसे की, ऑंटेरिओ प्रांतात ३ लाख, ब्रिटिश कोलंबियामध्ये २ लाख ९० हजार शीख वसलेले आहेत. आज कॅनडात २ टक्के शीख राहतात. पण मोजक्या जागी भरपूर शीख समुदाय हे आजच्या कॅनडाचे स्वरूप आहे, हे लक्षात घेतले की, कॅनडात शिखांचा एवढा प्रभाव का आहे, याचे आश्चर्य वाटणार नाही. कॅनडातील पार्लमेंटमध्ये ३३८ जागा आहेत. म्हणजे बहुमतासाठी १७० जागा हव्यात. सध्या कॅनडात जस्टिन ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीच्या १५९ जागा आणि खलिस्तानचा कट्टर समर्थक असलेल्या जगमित सिंग यांच्या न्यू डेमोक्रॅटिक पार्टीच्या २५ जागा मिळून एकूण १८४ जागांसह सत्तेत आहे. पण जगमित सिंग यांनी न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचा ट्रुडो सरकारला असलेला पाठिंबा काढून घेतल्याचे वृत्त आहे. त्यांची समजूत काढण्यासाठी कॅनडाची कवायत सुरू आहे, असे मानतात.

**पक्षीय बलाबल** : कॅनडातील पार्लमेंटमध्ये पक्षीय बलाबल असे आहे. एकूण जागा ३३८ आहे. १) जस्टिन ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीजवळ १५९ जागा व (३२.६२ टक्के मते) आहेत. हा जुना, उदारमतवादी, डावीकडे झुकलेला पक्ष मानला जातो. सध्या हाच प्रमुख शीखधार्जिणा पक्ष आहे. २) एरिन ओ टूल यांच्या कॉन्झर्वेटिव्ह पार्टीजवळ ११९ जागा व (३३.७ टक्के मते) आहेत. हा उजवीकडे झुकलेला विरोधी पक्ष आहे. ३) इव-फ्रान्स्वा ब्रॉकॉईस ब्लांचेट यांचा ब्लॉक क्युबेकॉईस पार्टी हा पक्ष ३३ जागा व ७.६४ टक्के मते बाळगून आहे. हा एकेकाळी फुटीरतावादी पक्ष होता; आता मात्र याची भूमिका प्रादेशिक स्वायत्ततावादी पक्षाची आहे. ४) जगमित सिंग (डाव्या विचारसरणीचे, खलिस्तानवादी व फौजदारी वकील) यांचा न्यू डेमोक्रॅटिक पार्टी मुळातला सर्वसमावेशक आणि लिबरल पार्टीला मदत करणारा पक्ष होता; पण सध्या खलिस्तानी शिखांच्या वर्चस्वाखाली असून २५ जागा १७.६३ टक्के मते यासह खलिस्तानचा समर्थक आहे. ५) ॲनॉमी पॉल/एलिझाबेथ मे यांचा पर्यावरणवादी ग्रीन पार्टी २ जागा आणि २.३३ टक्के मते मिळवून कसाबसा टिकून आहे.

**भारताने जबरदस्त पाऊल** : भारताने कॅनडाच्या भारतातील ६ अधिकाऱ्यांना (डिप्लोमॅट) भारत सोडून जाण्याचा आदेश (एक्सपेल) १४ ऑक्टोबर २०२४ ला दिला. हे अधिकारी व त्यांची पदे अशी आहेत. १) स्टीवर्ट रॉस व्हीलर, कार्यवाहक (ॲक्टिंग) हाय कमिश्नर, २) पॅट्रिक हेबर्ट, डेप्युटी हायकमिश्नर, ३) मारी कॅथरिन ज्योली, फर्स्ट सेक्रेटरी, ४) इयान रॉस डेव्हिड ट्राईट, फर्स्ट सेक्रेटरी, ५) ॲडम जेम्स च्युइप्का, सेक्रेटरी, ६) पॉला ओर्ज्युला, फर्स्ट सेक्रेटरी. यातील पदांचा उल्लेख यासाठी महत्त्वाचा ठरतो की, त्यावरून भारताने केवढे मोठे आणि जबरदस्त पाऊल उचलले आहे, ते जाणवावे. सामान्यत: युद्धजन्य परिस्थितीतच असे पाऊल उचलले जाते.

या अगोदर कॅनडाने भारताचे कॅनडात नेमलेले वरिष्ठ अधिकारी, कॅनडाचा नागरिक असलेल्या एका खलिस्तानवादी कार्यकर्त्याच्या, म्हणजे हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत सामील असल्याचा आरोप केला होता. हे पाहून भारताने आपले कॅनडातील हायकमिश्नर संजयकुमार वर्मा यांच्यासह आणखी काही अधिकाऱ्यांना परत बोलावून घेतले आहे आणि उत्तरादाखल कॅनडाच्या सहा अधिकाऱ्यांना भारत सोडून जाण्यास सांगितले आहे. मतपेढीच्या राजकारणाला बळी पडून कॅनडा शासनाने हा हत्येबाबतचा हास्यास्पद आरोप केला आहे. अशा प्रकारचे आरोप करून शिखांची मते मिळविण्याचा हा प्रयत्न आहे, हे स्पष्ट आहे. कॅनडा सरकारचे अस्तित्वच अशा पक्षाच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे की, ज्या पक्षाचे नेते भारतातील फुटीरतावाद्यांशी संबंध ठेवून आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिखांनी कॅनडामध्ये स्थलांतर करायला सुरुवात केली. आज कॅनडात २ टक्के शीख आहेत. खलिस्तान्यांवर भारतात कारवाईला सुरुवात करताच त्या शिखांनी कॅनडात जायला वेगाने सुरुवात केली. खलिस्तानच्या प्रश्नावर जगाचे लक्ष प्रथम वेधून घेण्यास तेव्हाच खऱ्या अर्थाने सुरुवात केली होती. आज खलिस्तानचा मुद्दा न भारतात महत्त्वाचा आहे न कॅनडात. शिखांची संख्या लक्षात घेऊन ट्रुडो यांच्या पक्षाने त्यांना चुचकारण्यास सुरुवात केली व शिखांना खूश करून त्यांची मतपेढी आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठी त्यांच्या मागण्या एकापाठोपाठ एक मान्य करण्यास प्रारंभ केला. २००१ ते २०२१ या अल्प कालावधीत शिखांची कॅनडातील टक्केवारी ०.९ वरून वाढत २.१ टक्क्यांपर्यंत पोहोचली. १९९३ मध्ये पंजाबात जन्मलेला गुरुबक्ष सिंग माल्ही हा पहिला शीख कॅनेडियन नागरिक लिबरल पार्टीच्या तिकिटावर पार्लमेंटवर निवडून आला तर २०२१ मध्ये २१ शीख पार्लमेंटवर निवडून गेले आहेत.

**आजची न्यू डेमोक्रॅटिक पार्टी** : आतापर्यंत न्यू डेमोक्रॅटिक पार्टी मध्यम मार्गी, पण डावीकडे झुकलेला पक्ष ट्रुडो सरकारला पाठिंबा देत होता. पुढे या पक्षाचा नेता जगमित सिंग याने खलिस्तानच्या मागणीला उघडउघड पाठिंबा देणे सुरू केले. २००४ पासून शिखांचा कॅनडाच्या राजकारणात प्रभाव वाढताना पहिल्यांदा कॅनडाच्या वृत्तसृष्टीला जाणवू लागले. कॅनडातील उदारमतवादी पक्ष स्थलांतरितांच्या बाजूचे आहेत. त्यांची मते आपल्यालाही मिळावीत या हेतूने उदारमतवादी पक्षांचे अनुकरण करीत कॅनडातील कॉन्झर्वेटिव्ह पक्षानेही शिखांना चुचकारण्यास सुरुवात केली आहे.

धर्मानुसार कॅनडातील लोकसंख्येचे विभाजन असे आहे- ख्रिश्चन ५३.३ टक्के, कोणताही धर्म न मानणारे ३४.६ टक्के, मुस्लिम ४.९ टक्के, हिंदू २.३ टक्के, शीख २.१ टक्के, बौद्ध १ टक्का, ज्यू ०.९ टक्के, अन्य ०.८ टक्के. म्हणजे शीख धर्म हा कॅनडातील चौथा सर्वात मोठा धार्मिक गट आहे. कॅनडातील शीख समुदाय गुरुद्वारांच्या माध्यमातून स्थानिकांना आणि अन्य संघटनांना मदत करू लागले. या विषयाबाबत स्थानिकांसाठीचे कायदे कॅनडात स्थलांतरितांच्या तुलनेत अधिक कडक आहेत. त्यामुळे स्थानिक राजकारणेतर समुदायही साहजिकच त्यांच्याशी अधिकाधिक जवळीक साधू लागले आहेत.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# होय, हे धर्मयुद्धच लढले गेले

पूर्वी युद्धे तलवारीने लढली जायची. धर्मासाठी रणांगणामध्ये रक्तांचे पाट वाहायचे. त्यानंतर काळ बदलला अन् लोकशाहीमध्ये मताच्या रूपाने हे युद्ध लढले जाऊ लागले. भारताच्या इतिहासामध्ये महाराष्ट्रात प्रथमच २० नोव्हेंबरचा लोकशाहीचा उत्सव धर्मयुद्धासारखा लढला गेला. यावेळी प्रथमच संपूर्ण महाराष्ट्राने भगवी लाट अनुभवली. विरोधकांच्या अपेक्षेबाहेर भाजपाला यश मिळाले. काँग्रेसच्या विखारी प्रचाराला मतदारांनी सडेतोड उत्तर देऊन त्यांनी काँग्रेसला त्याची जागा दाखवून दिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गलिच्छ राजकारण करून काँग्रेसने समाजामध्ये जातीयतेचे विष पेरले. खोट्या धर्मनिरपेक्षतेची दवंडी देऊन काँग्रेसने घराणेशाहीला सर्वाधिक महत्त्व देत राष्ट्राला दुय्यम स्थान दिले. वाट्टेल त्या थराला जाऊन महाविकास आघाडीला राज्याची सत्ता हवी होती. काँग्रेसच्या भूलथापांना बळी न पडता व्होट जिहादला मतदारांनी धर्मयुद्धाने चोख प्रत्युत्तर दिले. वाढलेली मतदानाची टक्केवारी हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे.

नेहमीप्रमाणे समाजामध्ये विष पेरून हिंदूंच्या मतविभाजनाचा आटोकाट प्रयत्न यावेळीही काँग्रेसने करून बघितला. परंतु, तो त्यांच्याच अंगलट आला. महाविकास आघाडीला फक्त ४६ जागांवर मतदारांनी नेऊन ठेवले. अखेर त्यांना आपल्या कर्माची फळे मिळाली. राहुल गांधींना या देशाची संस्कृती, परंपरा आणि उज्ज्वल भविष्याशी काहीएक देणेघेणे नाही. मातृभूमी



या संकल्पनेला त्यांचा विरोध, प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वालाही त्यांचा विरोध आहे. त्यामुळे ठासून खोटे बोलले की, लोकांना ते खरे वाटायला लागते. राहुल गांधीची ही चाल नेमकी यावेळी लोकांनी ओळखली. भारतामध्ये आरक्षणाचे तारणहार म्हणून मिरवायचे अन् परदेशामध्ये जाऊन आरक्षण संपविण्याच्या गोष्टी करायच्या हा दुटप्पीपणाही लोकांनी हेरला. जवळपास ६० वर्ष खोट्या धर्मनिरपेक्षतेचा येथील हिंदूंनी सतत मार खाल्ला. दुसऱ्या पक्षाला जातीयवादी म्हणणारी काँग्रेस किती जातीयवादी आहे, हे ओळखण्यास लोकांना जवळपास ६० वर्षे लागली. ६० वर्षे काँग्रेस हिंदूंच्या अस्मितेशी खेळली. संस्कृती आणि परंपरा पायी तुडविल्या. गुलामीच्या मानसिकतेमधून काँग्रेसने लोकांना बाहेर येऊच दिले नाही. जगामध्ये सर्वाधिक सहिष्णू कोण असेल तर तो हिंदू होय. जगा आणि जगू द्या, हा एकच हिंदूंचा मंत्र आहे. नेमका याच बाबीचा फायदा घेत काँग्रेसने येथील हिंदूंना कायम दुय्यम नागरिकाचे स्थान दिले. अशी ही हिंदुद्रोही काँग्रेस भारतामध्ये कशी फोफावली हेही एक आश्चर्यच म्हणावे लागेल. मतांच्या राजकारणासाठी यावेळी काँग्रेसने नैतिकतेचे सर्वच मार्ग सोडून दिले होते. त्यामुळे 'बटेंगे तो कटेंगे' हा योगी आदित्यनाथ यांचा नारा व 'एक हैं तो सेफ हैं' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नारा या निवडणुकीमध्ये काँग्रेसवर भारी पडला. सत्तेच्या मोहापायी उद्धव ठाकरेही भरकटत गेले. त्यांनी हिंदुत्व सोडले त्यामुळे मतदारांनीही त्यांना सोडले अन् शरद पवारांचा छुपा हेतू साध्य झाला. हिंदू या राष्ट्राचा कणा आहे, हे उद्धव ठाकरेही साफ विसरले. संस्कृती आणि परंपरा या देशाचा आत्मा आहे, हे पण उद्धव ठाकरे विसरले. त्यामुळे जे व्हायचे होते ते होऊन गेले. निव्वळ सत्तेसाठी केलेले राजकारण अधिक काळ टिकू शकत नाही, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजूनही कळले नाही. देशाला खिळखिळे करणाऱ्या विघातक शक्ती अजूनही देशाबाहेर कार्यरत आहेत. काँग्रेसही सतत त्यांच्या पाठीशी उभी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे काँग्रेसने येथील हिंदूंना सतत दाबण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, सनातन वैदिक परंपरेच्या भक्कम पायावर उभा असलेला हा देश कधीच वाकला नाही आणि कधीच वाकणारही नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. आपल्याच काळ्या कृत्याने काँग्रेस आतून पूर्णपणे खिळखिळी झाली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे. काँग्रेसचा पूर्वीपासून सुरू असलेला हा दुटप्पीपणा लोकांनी यावेळी ओळखला. तो कायम स्मरणात ठेवला तरच या देशाचे भविष्य उज्ज्वल राहू शकते, एवढे मात्र नक्की.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# पंतप्रधान इंटर्नशिप योजना : नव्या संधींचा आशादीप

नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या 'पंतप्रधान इंटर्नशिप' योजनेंतर्गत देशातील प्रमुख व निवडक अशा ५०० कंपन्यांमध्ये नवोदित विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या असून, विद्यार्थ्यांचाही या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसतो. यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा एक भाग म्हणून नव्याने उत्तीर्ण झालेल्या पात्रताधारक उमेदवारांना नवागत म्हणून आपल्या करीअरची सुरुवात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेच्या संदर्भात स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच नमूद केल्यानुसार देशातील आर्थिक व्यवसाय क्षेत्रातील प्रमुख व प्रथितयश अशा ५०० कंपन्यांमध्ये योजनेच्या पहिल्या टप्प्यात 'इंटर्नशिप योजना' अमलात आणली जाणार आहे. योजनेचा मुख्य उद्देश या कंपन्यांना बरेचदा भासणारी प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता काही प्रमाणात कमी करणे व त्याचवेळी नव्याने उत्तीर्ण झालेल्या विविध विषय आणि क्षेत्रातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या प्रशिक्षणातून सुरुवातीची रोजगार संधी उपलब्ध करून देणे, अशा दुहेरी स्वरूपाचा आहे. योजनेच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच टप्प्यात अर्थमंत्रालयातर्फे करण्यात आलेल्या प्राथमिक अभ्यासानुसार, या नव्या 'इंटर्नशिप योजने'चा फायदा महानगरांपेक्षा तुलनेने मध्यम आकारातील म्हणजेच तृतीय स्तरीय शहरातील कंपन्यांना तुलनेने अधिक होऊ शकतो.

केंद्र सरकारची ही योजना प्रामुख्याने युवक व नव्याने शैक्षणिक पात्रताधारकांसाठी असल्याने देशातील युवा आणि विद्यार्थ्यांच्या संदर्भातील वस्तुस्थिती आणि आकडेवारीचा तपशील जाणून घेणे आवश्यक ठरते. यासंदर्भात उपलब्ध आकडेवारीनुसार, सध्या देशांतर्गत युवकांच्या एकूण लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकसंख्या ही १५ ते २९ या वयोगटातील आहे. सद्य:स्थितीत या वयोगटातील निम्मी संख्या ही नव्याने शैक्षणिक पात्रताधारक व रोजगारक्षम आहे. त्यातही यातील बहुसंख्य विद्यार्थी-उमेदवार हे महानगरांच्या तुलनेने छोटी शहरे वा जिल्हा स्थाने अथवा औद्योगिकदृष्ट्या विकसित प्रदेशांतील रहिवासी आहेत. हेच विद्यार्थी नव्या पंतप्रधान 'इंटर्नशिप प्रशिक्षण योजने'च्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरू शकतात.

**'पंतप्रधान इंटर्नशिप' योजनेचा थोडक्यात तपशील असा** : या योजनेंतर्गत प्रमुख व निवडक अशा ५०० कंपन्यांमध्ये नवोदित विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित केले जाईल. प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्ष असेल. या योजनेमागे सरकारचा मुख्य उद्देश शिक्षित नवयुवकांना प्रशिक्षित करून रोजगारक्षम करणे आहे. यासाठी २१ ते २४ या वयोगटातील शालान्त परीक्षा, तंत्रशिक्षण, पदवी-पदव्युत्तर, चार्टर्ड अकाऊंटन्सी असे शैक्षणिक पात्रताधारक व अल्प उत्पन्नधारक गटातील उमेदवार अर्ज करू शकतील.

वरील प्रशिक्षण कालावधीत निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या एक वर्ष कालावधीसाठी दरमहा पाच हजार रुपये पाठ्यवेतन देय असेल. यापैकी ४ हजार ५०० रुपये सरकारतर्फे व ५०० रुपये संबंधित कंपनीतर्फे देण्यात येतील. याशिवाय वार्षिक सहा हजार रुपये अतिरिक्त खर्चापोटी देण्यात येतील. पंतप्रधान इंटर्नशिप योजनेच्या पहिल्या व प्रायोगिक टप्प्यात २०२४ साली सुमारे १ लाख २५ हजार विद्यार्थी-युवकांना समाविष्ट करून घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. योजनेला अधिक लवचीक बनविण्यासाठी त्यामध्ये सहभागी होणाऱ्या कंपन्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असणारा 'सीएसआर' निधी या योजनेसाठी वापरण्याचा व्यवहार्य पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या नव्या सवलतीचा लाभ आता संबंधित कंपन्या सहजपणे घेऊ शकतात.

'पंतप्रधान इंटर्नशिप' योजनेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनंतर त्यानुसार कौशल्य विकास, संबंधित व प्रत्यक्ष कामाचा सराव व काही प्रमाणात पाठ्यवेतन असे विविध लाभ हमखासपणे होणार आहेत. याशिवाय योजनेत प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांना मिळणारा अनुभव त्यांना संबंधित कंपनीच नव्हे, तर इतर उद्योग-व्यवसाय क्षेत्रात करीअर सुरू करण्यासाठी लाभप्रद ठरू शकते. याशिवाय नव्याने विविध अभ्यासक्रमांत उत्तीर्ण झालेल्या व मध्यम आकारातील शहरांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नोकरी-रोजगार व स्पर्धेच्या संदर्भात जी संकोच वा प्रसंगी संभ्रमाची भावना असते, त्यावर तोडगा म्हणून नवी 'इंटर्नशिप प्रशिक्षण योजना' फायदेशीर ठरू शकेल. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना रोजगारासाठी निवड-मुलाखतीचा सराव व निवड झाल्यावर प्रत्यक्ष कामाची व्यावहारिक माहिती व अनुभव मिळतो. याचा लाभ त्यांना पुढील मुलाखत व अन्यत्र निवडीसाठी होऊ शकतो. उमेदवारांना त्यांच्या प्रशिक्षण काळात उद्योग-व्यवसायाच्या प्रक्रियेपासून संगणकीय कार्यपद्धतीपर्यंतच्या विविध कार्यपद्धतींचा प्रत्यक्ष सराव मिळू शकतो. तसे पाहता, प्रशिक्षणासाठी 'इंटर्नशिप' पद्धतीचा वापर आपल्याकडे नवीन नाही. त्याचा अवलंब मुख्यत: विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून बहुधा सर्वच प्रमुख संस्था वा विद्यापीठ स्तरावर केला जातो. त्याद्वारे अशा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यासक्रमाच्या अंतिम टप्प्यात काही आठवड्यांच्या माहिती व उद्योग-व्यवसायात काम करणे आवश्यक ठरते. पदव्युत्तर वा तंत्रशिक्षण क्षेत्रातील अभ्यासक्रमात तर विद्यार्थ्यांना त्यांच्या या अल्पकालीन प्रशिक्षण कालावधीत माहितीशास्त्र-संगणक तंत्रज्ञान, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, मूलभूत व्यवस्थापन या क्षेत्राची मूलभूत माहिती देण्याचे महत्त्वपूर्ण काम होणार आहे. कंपनी व्यवस्थापनांच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, कंपन्यांना त्यांच्या नव्या व वाढत्या व्यावसायिक गरजा लक्षात घेता, प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता नेहमीच असते. विशेषत: अशा प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी कंपन्यांचे प्रयत्न सुरूच असतात. विविध अभ्यासक्रमांसह उत्तीर्ण होणाऱ्या नव्या व पात्रताधारक उमेदवारांना कंपन्या प्रशिक्षणाच्या संधी देत असतात. प्रसंगी त्यासाठी अशा विद्यार्थ्यांसाठी पाठ्यवेतनापासून प्रशिक्षणापर्यंत तरतूद करतात. कंपन्यांच्या याच प्रयत्नांना आता 'पंतप्रधान इंटर्नशिप योजने'द्वारा मर्यादित स्वरूपात का होईना, पण पाठ्यवेतनासह सरकारी पुढाकार व प्रयत्नांसह प्रोत्साहन मिळणार आहे.

पंतप्रधान इंटर्नशिप योजनेची अंमलबजावणी म्हणजे मूलत: २०२० सालच्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा मोठा व महत्त्वपूर्ण टप्पा म्हणायला हवा. या धोरणांतर्गत केंद्र सरकारने कौशल्याधारित शिक्षणाद्वारे प्रशिक्षित युवावर्ग व उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा मोठा व महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. त्याच निर्णयाची नियोजनपूर्ण व वेळेत अंमलबजावणी यानिमित्ताने होत आहे, हे महत्त्वाचे. जाणकारांच्या मते, प्रचलित परिस्थितीत शैक्षणिकदृष्ट्या विविध क्षेत्रांतील पात्रताधारक विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रता असून केवळ अनुभव नाही, या चाकोरीबद्ध मानसिकतेमुळे नोकरी-रोजगार मिळण्यास नेहमीचीच अडचण येते व नोकरीची सुरुवातच न झाल्याने, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेला अनुसरून रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. तेव्हा, प्रचलित शिक्षण-रोजगार क्षेत्राशी असणाऱ्या मर्यादांना काही प्रमाणात छेद देण्याचे काम आता नव्याने होणार आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### मतदारयाद्या वेळीच दुरुस्त करा

नेमेचि येतो मग पावसाळा तसे प्रत्येक निवडणूक झाल्यावर मतदारयाद्या अचूक नाही अशी ओरड होते. ज्यांचे निधन झाले त्यांची नावे यादीत दिसतात. 'डिलिटेड' असे स्टॅम्प असून ते मोजतात. डबल नावे, नावे नसणे, घर, गाव, देश बदलून, सोडून गेले त्यांची नावे असणे, घरातील एकाचेच नाव दुसऱ्याच यादीत असणे, आधी नाव असणे आणि आता नसणे.

आमचेच उदाहरण घेतो. रामनगर ३०२, ३०३ बुथवर २४००+ नावे आहेत. त्यातील वर सांगितल्याप्रमाणे नावे काढल्यास ती संख्या १६००+ येईल. १६०० पैकी ११५० मतदान झाले. पण मोजताना टक्के २४००+ वर काढून मग रामनगरमध्ये मतदान टक्केवारीने कमी दिसते. पण हे फक्त दोन बुथचे. असे नागपुरात ३०००+ बुथ आहेत म्हणजे हे प्रमाण फार जास्त होते. मतदान कमी झाले असे म्हणणे त्यामुळे बरोबर नाही.

दुसरे जर नावे बरोबर आली तर मतदान चिठ्ठ्या वाटणे सोपे होते. तिसरे महत्त्वाचे आता जनगणना होईल. लोकसंख्या पाहून वॉर्ड, प्रभाग, विधानसभा, लोकसभा क्षेत्रे तयार होतील. अचूक याद्या नवीन रचना करतील. काही कमी जास्त होतील. जुन्या चूक मतदारयाद्या हे प्रारूप चुकीचे करतील.आता तरी या चुका दुरुस्त व्हाव्या असे आपण प्रयत्न करूया असे वाटते.

**रवी वाघमारे**/९९६००१८०३०

### विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील महायुतीने विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवले. एकट्या भाजपाने १३२ जागा जिंकल्या. महायुतीने विधानसभेत बहुमतासाठी आवश्यक असलेल्या जागांपेक्षा कितीतरी जास्त जागा जिंकल्या. महायुतीच्या या ऐतिहासिक बहुमताचा देशाच्या एकूणच राजकारणावर परिणाम होणार आहे. महायुतीचा प्रचंड विजय हा भारतीय मतदारांमधील विरोधी पक्षाच्या विशेषतः काँग्रेस, उबाठा आणि शरद पवारांच्या तसेच मुस्लिम तुष्टीकरणविरोधी तीव्र भावनांचा परिणाम आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### लाडक्या बहिणींचे मन:पूर्वक आभार



काही दिवसापूर्वी म्हणजे महाराष्ट्र राज्य विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर मी याच स्तंभाद्वारे समस्त लाडक्या बहिणींना आता परतफेड करण्याची जबाबदारी त्यांची आहे, असे आवाहन केले होते. जाहीर झालेल्या निकालाने हे सिद्ध झाले आहे की, लाडक्या बहिणींनी उदारपणे आपल्या मतदानाने महायुती सरकारवर आपले प्रेम व विश्वास व्यक्त करून महायुती सरकारला प्रचंड बहुमताने विजयी केले आणि लाडकी बहीण म्हणून मिळालेल्या मदतीची परतफेड केली आहे. त्यामुळे सर्व बहिणींचे मन:पूर्वक आभार.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### उद्धव ठाकरे, शरद पवारांना जनतेने नाकारले

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल अनपेक्षित पण ऐतिहासिक आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे जेव्हा एखाद्या युतीला दोनशेपेक्षा जास्त जागा मिळाल्या. जनसामान्यांनी उद्धव ठाकरेंना साफ नाकारले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी हिंदुत्वाशी तोडलेले नाते हे जनतेला आवडले नाही. 'मलाच मुख्यमंत्री करा' हा त्यांचा अहंकारी दुराग्रहही त्यांच्या विरोधात गेला. एकनाथ शिंदेंची शिवसेना खरी शिवसेना आहे ही गोष्ट जनतेने ठळकपणे अधोरेखित केली आहे. तसेच मतदाराने मतपेटीतून काँग्रेस व शरद पवार यांच्यावरही अविश्वास व्यक्त केला आहे. पवारांनी आता राजकारणातून संन्यास घ्यावा हेच जणू मतदाराने सांगितले आहे. तरीही त्यांनी राजकारणात लुडबुड चालू ठेवली तर त्यांना यापेक्षाही जास्त अपमानाची मानसिक तयारी ठेवावी लागेल. मविआमधील भांडणे विकोपास गेली होती. 'मोठा भाऊ' वाद, जागावाटपातील मतभेद, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा अशा अनेक कारणांनी आघाडीतील घटकपक्षात मनभेद निर्माण झाला होता. याउलट महायुतीतील घटकांनी आपसात चांगला समन्वय ठेवला होता. वादाचा एकही मुद्दा नव्हता. मतदानाची टक्केवारीही वाढली होती. त्याचा फायदा युतीला नक्कीच मिळाला. ज्यांचा पराभव झाला त्यांनी गंभीरपणे आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. इतिहास सांगतो की, जे आत्मचिंतन करत नाही ते राजकारणातून लुप्त होतात.

**अरविंद तापकिरे**/९८१९७९४४९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आ.कैलास पाटील यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने कळंब येथील तालुका क्रीडा संकुलनात विभागस्तरीय शालेय आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेतील विजेत्या संघाना माझ्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. विजयी झालेल्या संघातील तसेच सहभागी झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रदीप मेटे, दिलीप पाटील, सागर मुंडे, विश्वजित जाधव आदींसह शिक्षक, खेळाडू उपस्थित होते.



### क्राईम वृत्त...



## महेश यादव यांच्या वाढदिवसानिमीत्त शालेय साहित्य, फळांचे वाटप

**येरमाळा, दि.२५ नोव्हेंबर -**

येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत बार्शीचे युवा उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, श्रीगणेश बिगरशेती सह पत संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष महेश उर्फ देवा यादव यांच्या वाढदिवसानिमीत्त शालेय साहित्य, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णासाठी फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सिध्दार्थ मित्र मंडळाने केले होते. यावेळी शाळेतील शिक्षक सुरेश ठोंबरे, शिक्षक अनिल बारकुल, शिक्षिका कांचन चेचे तर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.डी. बिरादार कर्मचारी के.बी.गुरव, अविनाश सारुक, आरोग्य सेविका सुतार एम.एस. इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विकी वाघमारे, सुरज कांबळे, नोबल कांबळे, दिलीप खलसे, अनिल वाघमारे, भास्कर कांबळे,नितीन बोकेफोडे, राजेश ठोकळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## तेरमध्ये हेरिटेज वॉक

**तेर, दि.२५ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे सोमवारी हेरिटेज वॉक करण्यात आला. जागतिक वारसा सप्ताह साजरा केला जात असून या निमित्ताने तेर येथील कै.रामलिंगअप्पा लामतुरे पुरातन शासकीय वस्तू संग्रहालय यांच्या वतीने तेर येथील महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन असलेल्या त्रिविक्रम मंदिरात, उत्तरेश्वर मंदिरात सोमवारी सकाळी हेरिटेज वॉक संपन्न झाला. यावेळी मेघा राऊत व भाग्यश्री बिराजदार यांना ऐतिहासिक वारसाचे महत्त्व सांगितले. या हेरिटेज वॉकमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थिनी सहभाग घेतला होता. हेरिटेज वॉक यशस्वी करण्यासाठी किसन काळे, अविनाश राठोड, मेघा राऊत, भाग्यश्री बिराजदार, सविता बांगडे, गिरीश चव्हाण, सलमान पठाण, दुर्गश नानजकर, विवेक उबाळे यांना परिश्रम घेतले.

## भारतीय संविधान रॅलीत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

भारतीय संविधान दिवस असुन या दिनाचे औचित्य साधून आणि भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समिती धाराशिव व भारतीय संविधान अमृतमहोत्सवी समिती धाराशिवच्या वतीने शहरातुन भारतीय संविधान जनजागरण रॅलीचे आयोजन केले आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या रॅलीत संविधान रथ,शाळा कॉलेज नर्सिंग कॉलेज,प्रशासकीय अधिकारी कर्मचारी सह सामाजिक संस्था,संघटना व शहरवासियांचा सहभाग असुन दरवर्षी प्रमाणे ठिकठिकाणी भारतीय संविधान जनजागरण रॅलीचे स्वागत केले जाणार असुन भारतीय संविधानाचा गौरव करण्यासाठी आपणही या संविधान जनजागरण रॅलीत सहभागी व्हावे,हि रॅली दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात होणार आहे. सर्वांनी या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन मतदार जनजागरण समिती धाराशिवचे कार्याध्यक्ष गणेश वाघमारे यांनी समितीच्या वतीने केले आहे.


# धाराशिव पोलिसांकडून आठ दिवसात खुनाचा उलगडा; चार आरोपींना अटक

### अनैतिक संबंधानंतर पैशाची मागणी करणाऱ्या महिलेचा झाला होता खुन... पोलिस अधिक्षक संजय जाधव यांची पत्रकार परिषदेत माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

अनैतिक संबंधानंतर पैशाची मागणी करणाऱ्या महिलेचा खुन करुन तिचा मृतदेह परंडा तालुक्यातील सोनारी शिवारात १७ नोव्हेंबर रोजी हरण ओढा पुलाखाली टाकण्यात होता. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. त्या खुनाचा उलगडा करण्यात धाराशिव पोलिसांना यश आले असून अहिल्यानगर जिल्ह्यातून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस अधिक्षक संजय जाधव यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेस अति.पोलिस अधिक्षक गौहर हसन, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक अमोल मोरे, पोलिस विभागाचे पीआरओ प्रमोद भिंगारे आदींची उपस्थिती होती.



यावेळी ते म्हणाले, मृत महिलेचे वय अंदाजे ३० वर्षे असून तिच्या डाव्या हातावर प्रकाश असे गोंदलेले होते. तिच्या शरीरावर आणि डोक्यावर कशानेतरी वार करून तिचा खून करण्यात आला होता. याचा पुरावा हाती लागू नये यासाठी महिलेचा मृतदेह पुलावरून खाली पाण्यात फेकण्यात आला होता. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता अंबी पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक रामकिसन दगडू कुंभार यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती.

गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले. गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या हाती कोणताही ठोस पुरावा नव्हता. अशातही तपासासाठी नेमलेल्या पथकाने परिसरातील विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली. यात एक स्विफ्ट डिझायर कार संशयित रित्या दिसून आली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आणि गोपनीय माहितीच्या आधारे या कारचा माग घेत शोध लावला. ती श्रीरामपूर तालूक्यातील पढेगाव येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तातडीने पढेगाव गाठून कारसह चालक संदीप उत्तम तोरणे याला ताब्यात घेतले. सुरुवातीला तोरणेने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु पोलिसांनी त्याला विश्वासात घेत अधिक चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.



त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे, मृत महिलेचे श्रीरामपूर येथील विश्वास नामदेव झरे याच्याशी अनैतिक संबंध होते. ती त्याला सतत पैशांची मागणी करून त्रास देत होती. त्यामुळे झरे याने तोरणे, सोमनाथ रामनाथ कराळे आणि महेश कुंडलीक जाधव या तिघांना मिळून ९२ हजार रुपये देऊन महिलेची हत्या करण्याचे कट रचला. १६ नोव्हेंबर रोजी रात्री या चौघांनी महिलेला तुळजापूरला देवदर्शनासाठी जाण्याचे आमिष दाखवून नेवासा फाट्यावरून घोडेगाव, अहमदनगर, कडा आष्टी, जामखेड, खर्डा आणि आंबी मार्गे सोनारी गावाजवळील पुलावर नेले. तेथे त्यांनी तिचा गळा आवळून आणि डोक्यात दगड मारून खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह पुलावरून खाली फेकला. पोलिसांनी तोरणे याला अटक केल्यानंतर त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे इतर तिघांनाही ताब्यात घेतले. त्यांनीही गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, सुदर्शन कासार यांच्यासह पोलीस हवालदार विनोद जानराव, शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, अमोल निंबाळकर, समाधान वाघमारे, फरहान पठाण, पोलीस नाईक नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक पोलीस अंमलदार प्रकाश बोईनवाड, विनायक दहिहंडे, पोलीस अंमलदार नागनाथ गुरव आणि सुनिल मोरे यांच्या पथकाने केला आहे.

# तुळजापूर तालुक्यातील १२१ गावांनाही हावाय विकास; २२ हजाराची आ. पाटील यांना लीड

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील मात्र तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील मतदारसंघ पुनर्रचनेत गेलेल्या ७२ गावापेक्षा तुळजापूर तालुक्यातील १२१ गाव भारी ठरली. या गावांनीही आ.राणाजगजितसिंह पाटील यांना २२ हजाराची लीड दिली आहे. त्या गावांनाही विकास हावाय, असे दिसत आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार आ.राणाजगजीतसिंह पाटील तर महाविकास आघाडीचे धीरज पाटील यांच्यात मुख्य लढत झाली.

या लढतीत भाजप आ.राणाजगजीतसिंह पाटील यांनी ३६ हजार ८६३ मतांची लिड मिळवत विजय संपादीत केला. धाराशिव तालुक्यातील ७२ गावावर तुळजापूर तालुक्यातील १२१ गावे भारी ठरली आहेत. ७२ गावापेक्षा तुळजापूर तालुक्यातील १२१ गावातून मताची लीड अधिक मिळाली आहे.

धाराशिवमधील ७२ गावातून ९६ हजार ६९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यापैकी आ.राणाजगजितसिंह पाटील यांना ५२ हजार ११८ तर धिरज पाटील यांना ३७ हजार ४९१ मतदान झाले आ.राणाजगजितसिंह पाटील यांना यातून १४ हजार ६२७ मतांची आघाडी घेतली तर तुळजापूरमधील १२१ गावातून १ लाख ५९ हजार ८७५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यापैकी आमदार राणा पाटील यांना ७९ हजार ७०५ तर धीरज पाटील यांना ५७ हजार, ४९३ मतदान झाले आ.राणाजगजितसिंह पाटील यांना २२ हजार २१३ ची लीड देत धाराशिवमधील ७२ गावा पेक्षा जास्त लिड दिली.

त्यामुळे धाराशिवमधील ७२ गावाला तुळजापूर मधील १२१ गावे भारी ठरली आहेत. अशी चर्चा सध्या विधानसभा मतदासंघात ऐकावयास येत आहे.



## धाराशिव साखर कारखान्याच्या १३ गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ नोव्हेंबर -**

धाराशिव साखर कारखाना लि. चोराखळी ता. कळंब, जि.धाराशिव या कारखान्याचे सन २०२४-२०२५ चा १३ वा गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रम दि.२४ रोजी ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महारज जाधव (येडशीकर) यांचे हस्ते पार पडला. या प्रसंगी कारखान्याचे कर्मचारी सचिन साठे यांच्या हस्ते सत्यनारायण पुजा करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक जनरल मॅनेजर ए.एस पठाण यांनी केले. यावेळी कार्यकारी संचालक अमर धनंजय पाटील यांनी उपलब्ध ऊस नोंदी नुसार अंदाजे ३ ते ३.५० लाख मे. टन ऊस गाळपाचे उदिष्ट पुर्ण करणे करिता कारखाना टीम, व तोडणी वाहतुक यंत्रना ई. सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमा प्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर धनंजय पाटील, संचालक रणजीत भोसले, संचालक संदिप खारे, संचालक सुहास शिंदे, सुरेश पाटील (केज), मालोजीराव गलांडे, हरिश्चंद्र भगत, प्रा.सुनिल पाटील, किरण मुळे, बालाजी मुळे, भास्कर पुरेकर, सुरेश सावंत, एम.एस.सी बँकेचे कारखाना प्रतिनिधी एच.बी.शेवाळे कारखान्याचे जनरल मॅनेजर ए.एस पठाण, सुंदर साळुंखे, वैभव देशमुख, दयानंद गव्हाणे, सुनिल लोमटे, प्रविण बोबडे, बाबासाहेब वाडेकर, सर्व कर्मचारी व कामगार तसेच कारखाना परिसरातील शेतकरी, वाहतुक ठेकेदार, इतर कार्यकमास उपस्थित होते. तसेच चीफ इंजीनिअर वैभव देशमुख यांनी उपस्थितताांचे आभार मानले.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजन ठरली किंगमेकर; महायुतीच्या भावांना दिली साथ

### महायुती सत्तेत आल्यानंतर बहिणींच्या खात्यात २ हजार १०० रुपये देण्याचे अभिवचन पूर्ण होणार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२५ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर करून ती प्रत्यक्षात राबवण्यात आली. ऐन दिवाळीत भावाची बहिणीला ओवाळणी थेट खात्यावर टाकल्याने महायुतीच्या पारड्यात लाडक्या बहिणींनी भरभरून मतदानरूपी आशीर्वाद दिले आहे. हे स्पष्ट निकालावरून दिसत आहे. महाविकास आघाडीचा लोकसभेचा ट्रेंड या निवडणुकीत बिलकुल चालला नाही. हेच निकालावरून स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागासाठी दि.२० रोजी सर्वत्र एकाच वेळी मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानंतर एक्झिट पोलचा सिलसिला सुरू झाला. या एक्झिट पोलमध्ये महायुतीला जवळपास सत्ता मिळणार आहे. हे सांगण्यात येत होते. परंतु दि.२३ रोजी झालेल्या मतमोजणी प्रक्रियेत महायुतीच्या अफलातून विजयाबद्दल सर्वत्र या विजयाचे खरे श्रेय या लाडक्या बहिणीला जाते. असे ग्रामीण भागाचे चित्र सांगत आहे. महायुतीसमोर विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकसभेच्या पराभवाचे चित्र होते. तर महाविकास आघाडीकडे लोकसभा विजयाचा परफॉर्मन्स होता. अशा राजकीय घडामोडीत महायुतीने मध्यप्रदेशचा पॅटर्न वापरून लाडली बहनाप्रमाणे महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेचा महाराष्ट्रभर महायुतीचे नेत्यांनी फिरून भरपूर प्रचार केला. एका कुटुंबातील दोन महिलांना महिना १५०० रुपये महिन्याला देण्याचे जाहीर केल्यानंतर लागलीच पहिला हप्ता बहिणींच्या थेट खात्यात जमा केला. त्याचबरोबर दिवाळीत एका बहिणीच्या खात्यावर ७५०० रुपये थेट खात्यात जमा केले. त्यामुळे महायुतीतील लाडके भाऊ अधिक लाडके झाले. महायुतीवरचा विश्वास पूर्णतः पक्का झाला. महायुती सत्तेत आल्यानंतर बहिणींच्या खात्यात २१०० रुपये देण्याचे अभिवचन जाहीर प्रचार सभेत केल्याने या योजनेला अधिक बळ मिळाले. महिलांचे मतदान महायुतीच्या पारड्यात गेले. त्यामुळेच सर्वच निकाल आश्चर्यकारक लागले आहेत. महाविकास आघाडीच्या दिग्गज नेते मंडळींना पराभवाचा फटका बसला आहे.

## संत सोयराबाई : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या ग्रंथाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालय येथील खा. प्रमोद महाजन सभागृहात 'संत सोयराबाई : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या ग्रंथाचे प्रकाशन कवयित्री, समीक्षक, साहित्यिका डॉ. कविताजी मुरूमकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी शेषाद्रीआण्णा डांगे, अधिवक्ता हभप पांडुरंग महाराज लोमटे महाराज, कमलाताई नलवडे, माजी प्राचार्या सुलभा देशमुख, प्राचार्य प्रशांत चौधरी, प्रा.महेश्वर कळलावे, ज्येष्ठ नेते रामदास कोळगे, ग्रंथ संपादक सचिन पाटील, प्रा.सोमनाथ लांडगे, ॲड. रोहित मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.तेरकर तर आभार प्रा.डॉ.रसाळ यांनी केले.

# संकट मोचक; तेरखेडा जिल्हा परिषद गटाने सावंताना तारले; १७०० मतांची लीड

### तरुण भारतचा ग्राउंड रिपोर्ट ठरला खरा... कोणाकडे किती ग्रामपंचायती, सरपंच असल्याचे वृत्तातून टाकला होता प्रकाश...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२५ नोव्हेंबर -**

राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला जाहीर झाला आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा थेट सामना राज्यात पाहिला मिळाला आहे. महायुतीने महाराष्ट्रात जोरदार मुसांडी मारली असून सर्वाधिक २३२ जागांवर महायुतीने विजय मिळवला आहे. तर महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीत मोठा दारुण पराभव झाला आहे. फक्त ५६ जागांवर महाविकास आघाडीला समाधान मानावे लागले आहे. विधानसभा निवडणुकीत सर्व राज्याचे लक्ष मात्र परंडा विधानसभेवर लागले होते. याठिकाणी विद्यमान आमदार राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत आणि पंधरा वर्ष आमदार राहिलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल मोटे यांच्यात जोरदार लढत झाली होती. आणि या लढतीत तानाजी सावंत यांचा दुसऱ्यांदा विजय झाला. १ हजार ५०९ अल्प मतांनी निसटता विजय झाला.



तर राहुल मोटेंचा पराभव झाला. परंडा विधानसभेत भूम, परंडा आणि वाशी या तीन तालुक्यांचा समावेश आहे. या तीन तालुक्यात १३ जिल्हा परिषद गट येत आहेत. यात विधानसभा निवडणुकीत सावंतांच्या विजयात वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटाचा मोठा वाटा मिळाला आहे,असेच म्हणावे लागेल.

तेरखेडा जिल्हा परिषद गटातून तानाजी सावंताना १ हजार ७०० मतांची लीड मिळाली आहे. सावंत यांच्यासाठी तेरखेडा जिल्हा परिषद गट हा संकट मोचकच ठरला असल्याचे दिसून येते. तसेच तेरखेडा गटात हवा कोणाची, कोणाकडे किती ग्रामपंचायती व कोणाचे किती सरपंच आहेत, असा ग्राउंस रिपोर्ट दि.७ ऑक्टोबर रोजी तरुण भारत सोलापूर वृत्तपत्राचे बातमीदार सुधीर घोलप यांनी ग्राउंड आडवा घेतला होता. बातमी मध्ये

तेरखेडा गटात एकूण १६ गावे असून १४ ग्रामपंचायती आहेत. जरी राजकीय पक्षांच्या चिन्हांवर या निवडणुका लढल्या जात नसल्या तरीही पक्षांच्या विचारांचे वेगवेगळे गट ग्रामपंचायत निवडणुकीत असतात. यातील तेरखेडा, सटवाईवाडी आणि गोजवडा या तीन ग्रामपंचायत शरद पवार गटाकडे आहेत. तर नांदगाव ही एक ग्रामपंचायत उद्धव ठाकरे गटाकडे आहे. मात्र पारडी ही एक ग्रामपंचायत बिनविरोध झालेली होती. तर कडकनाथवाडी, खामकरवाडी,मसूबाचीवाडी,वडजी,गोलेगाव,

कन्हेरी, इंदापूर, जुन्नर आणि इसरूप-बोरी खानापूर ग्रुप ग्रामपंचायत मिळून सर्वात जास्त ९ ग्रामपंचायती ह्या शिंदे सेना गटाकडे असल्याचे तरुण भारत वृत्तपत्राने दाखवले होते. त्या दरम्यान वाशी तालुक्यात आणि तेरखेडा गटात नागरिकांमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये सर्वत्र चर्चेला उदान आले होते,की येत्या २०२४ विधानसभा निवडणुकीत तानाजी सावंताना ९ ग्रामपंचायती नक्की फायदा होईल आणि जास्त मतांची लीड तेरखेडा गटातून मिळेल, अशी मोठी चर्चा रमली होती.

तसेच होऊन झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपण पाहिले आहे. तेरखेडा गटाने सावंत यांना तारले असून १ हजार ७०० मतांची लीड तेरखेडा गटाने दिली आहे. तर सावंत यांचा १ हजार ५०९ मतांनी विजय झाला आहे. त्यामुळे सावंत यांचे या गटात वर्चस्व असल्याचे दिसून आले. तसेच तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे भूम, परंडा, वाशी तालुक्यात शिंदे सेना, भाजप कार्यकर्त्यांचे कौतुक केले जात आहे.



## धनंजय बडवे यांना काण्व उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील धनंजय व्यंकटराव बडवे यांना नुकतेच काण्व उद्योगरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. काण्व ब्राह्मण समाज, छत्रपती संभाजीनगर याच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. बडवे यांना आपला स्वतःचा उद्योग छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असून याचा वार्षिक उलाढाल ३५ कोटीहून अधिक असून या माध्यमातून अनेकांच्या हाताला त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यांना २४ नोव्हेंबर रोजी कण्व उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष लक्ष्मीकांत जयपुरकर, उपाध्यक्ष उदय मानवतकर, सचिव धिरज देशपांडे, आदींचा हास्ते बडवे यांना काण्व उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## वार्ड ११, न.प. शाळा क्र.३, सांजा रोडवरील शौचालय तात्काळ सुरु करा : मनविसेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

वार्ड क्रमांक ११, नगर परिषद शाळा क्रमांक ३ व सांजा रोड जवळील शौचालय बंदावस्थेत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना शौचास जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगर परिषदेच्यावतीने बांधलेली शौचालय ही फक्त शोभेची वस्तू बनली आहेत. त्याचा वापर करता येत नसल्यामुळे असून अडचण अन् नसून खोळंबा याप्रमाणे अवस्था या शौचालयाची झाली आहे. त्यामुळे ती शौचालय तात्काळ सुरू करावीत. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांनी एका निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांना दि.२५ नोव्हेंबर रोजी दिला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### १४ ऑलिम्पिक पदक विजेती एम्मा जलतरणातून निवृत्त



**सिडनी** : ऑस्ट्रेलियाची सर्वाधिक पदक विजेती ऑलिम्पियन एम्मा मकॅकिऑनने सोमवारी स्पर्धात्मक जलतरणातून निवृत्तीची घोषणा केली. मॅककिऑनच्या नावावर १४ ऑलिम्पिक पदके जिंकण्याचा ऑस्ट्रेलियन विक्रम आहे. त्यापैकी सहा सुवर्ण- तीन उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये जिंकले, तर टोकियो २०२० मध्ये तिने मिळवलेली सात पदके जिंकलीत. एका ऑलिम्पिकमध्ये एकाच खेळात सर्वाधिक पदके जिंकणारी ती एकमेव महिला जलतरणपटू आहे. ३० वर्षीय एम्माने यापूर्वी संकेत दिले होते की, २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिने ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाइल रिलेमध्ये सुवर्ण जिंकले होते, तेव्हा तिने हे माझे अंतिम ऑलिम्पिक असेल, परंतु ती स्पर्धात्मक जलतरण सुरू ठेवेल की नाही हे तिने सांगितले नव्हते. माझ्या जलतरण कारकिर्दीने मला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सर्व काही समाधान दिले, याचा मला अभिमान आहे, असे एम्मा मॅककिऑन समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये म्हणाली. एम्माने रिओ २०१६, टोकियो २०२० आणि पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमधून एकूण १४ पदके जिंकलीत., यात ५ ऑलिम्पिक सुवर्ण, ३ रौप्य आणि ५ कांस्यपदकांचा समावेश आहेत. ऑलिम्पिक जलतरण सुवर्णपदक जिंकण्याच्या बाबतीत ती अमेरिकेच्या केटी लेडेकीनंतर दुसऱ्या स्थानावर आहे.

### सात्त्विक-चिरागचा पराभव

**शेनझेन** : येथे सुरू असलेल्या चायना मास्टर्स बीडब्ल्यूएफ सुपर-७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या भारतीय जोडीला दक्षिण कोरियाच्या जिन योंग व सेओ सेउंग जे यांच्याकडून १८-२१, २१-१४, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. कोरियन खेळाडूंनी भारतीय खेळाडूंना एक तास १४ मिनिटे घाम फोडला. सात्त्विक-चिरागने अविश्रांतपणे आक्रमण केले, परंतु कोरियन खेळाडूंनी भारतीयांच्या बचावात अनेक तडे दिले. पहिल्या गेममध्ये सात्त्विक-चिराग एका टप्प्यावर १६-१२ ने आघाडीवर होते, परंतु त्यांनी काही नाहक चुका केल्यामुळे कोरियन खेळाडूंना सामन्यात परतण्यास मदत झाली.

### जागतिक ॲथ्लेटिक्सचे प्रमुख सेबॅस्टियन मोदींना भेटणार

**नवी दिल्ली** : जागतिक ॲथलेटिक्सचे अध्यक्ष सेबॅस्टियन को पंतप्रधान नरेंद्र मोदी व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांच्यासोबत अनौपचारिक भेटीसाठी राजधानी दिल्लीत दाखल झाले आहेत. आपल्या कारकिर्दीत चार ऑलिम्पिक पदके जिंकणाऱ्या मध्यम पल्ल्याचे माजी धावपटू ६८ वर्षीय सेबॅस्टियन को यांचे सोमवारी आज सकाळी दिल्ली विमानतळावर भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाचे अध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी स्वागत केले. ब्रिटनचे महान ॲथ्लिट सेबास्टियन को हे सध्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) पुढील अध्यक्षपदाच्या शर्यतीत आहे आणि भारताच्या समर्थनासाठी मोहिमेचा एक भाग म्हणून ही भेट मानली जाते. पुढील वर्षी आयओसीच्या निवडणुका होणार आहेत. सध्या आयओसीचे अध्यक्ष थॉमस बाक असून त्यांचा कार्यकाळ लवकरच संपणार आहे. सायंकाळी पंतप्रधाना मोदी व क्रीडा मंत्र्यांसोबतच्या भेटीनंतर ते एका व्यावसायिक व्यस्ततेसाठी मुंबईला जाणार असल्याचे भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाच्या सूत्राने पीटीआयला सांगितले. सेबास्टियन को हे आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील एक लोकप्रिय व्यक्तिमत्व असून त्यांचे आजोबा दिवंगत हॉटेल व्यवसायी सरदारी लाल मल्होत्रा हे भारतीय होते.

### जागतिक बुद्धिबळ स्पर्धेसाठी गुगलचे खास डुडल

**सिंगापूर** : जागतिक बुद्धिबळ स्पर्धा सध्या सिंगापूर येथे सुरू आहे. यानिमित्ताने गुगलने डुडलच्या माध्यमातून या खेळाबाबत माहिती दिली. काळ्या आणि पांढऱ्या चौकटींच्या घरांमध्ये खेळला जाणारा हा इतिहासातील सर्वांत जुन्या खेळांपैकी एक आहे. बुद्धिबळ हा खेळ आज घराघरात पोहोचला आहे. बुद्धिबळाची उत्पत्ती सहाव्या शतकात झाली. या खेळाची सुरुवात भारतात झाली. त्यानंतर या खेळात अनेक बदल झाले. पहिली आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा १८५१ मध्ये झाली. तेव्हापासून बुद्धिबळाचा विकास झाला. बुद्धिबळाची वेळ आली आहे! हे डूडल बुद्धिबळ साजरे करते, ६४ कृष्णधवल चौकोनांवर खेळला जाणारा डायनॅमिक खेळ आहे, असे डुडलने म्हटले आहे. २५ नोव्हेंबर आणि १२ डिसेंबर या काळात सिंगापूरमध्ये जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले आहे. २०२४ हे वर्ष बुद्धिबळ चाहत्यांसाठी खास ठरू शकते. या चॅम्पियनशिपमध्ये १४ शास्त्रीय खेळ होणार आहेत, ज्यापैकी प्रत्येक सामना ४ तासांपेक्षा जास्त काळ खेळला जाऊ शकतो. या स्पर्धेत खेळणारा प्रत्येक अव्वल खेळाडू ७.५ गुण आणि विजेतेपद मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर सर्वांत मोठा कसोटी विजय

◆ **पर्थ, २५ नोव्हेंबर**

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियन भूमीवर सर्वाधिक वर्चस्व गाजवलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी सर्वात मोठा विजय नोंदवला. या विजयामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिकेटमध्ये भारताचे नाव सुवर्णअक्षरांनी नोंदवल्या गेले.

पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी दुपारी भारताने ५३४ धावांचा पाठलाग यजमान ऑस्ट्रेलिया संघाला ५८.४ षटकांत २३८ धावांत गुंडाळले. या विजयाबरोबरच भारताने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी मिळविली व त्याचबरोबरच भारताने ६१.११ टक्के गुणांसह जागतिक कसोटी अजिक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत पुन्हा आघाडीचे स्थान मिळविले.

यापूर्वी, १९७८ साली केरी पॅकर जागतिक मालिकेतील सिडनी येथे खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर २२२ धावांनी सर्वात मोठा विजय मिळविला होता.




बुमराहच्या नेतृत्वाखाली भारताचा हा पहिला कसोटी विजय ठरला. नियमित कर्णधार रोहित शर्मा ६ डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये सुरू होणाऱ्या दिवस/रात्रकाळात खेळल्या जाणाऱ्या गुलाबी चेंडूच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात संघनेतृत्वाची जबाबदारी घेण्यास तयार आहे.

दुसऱ्या डावात भक्कम फलंदाजी करणारे यशस्वी जयस्वाल, विराट कोहली व केएल राहुल हे भारताच्या विजयाचे प्रमुख शिलेदार असले तरी हंगामी कर्णधार व वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने अविश्वसनीय कौशल्य व आत्मविश्वासपूर्वक गोलंदाजी करून भारताच्या विजयाचा भक्कम पाया रचला. बुमराहने पहिल्या डावात ३० धावांत ५ बळी व दुसऱ्या डावांत ४२ धावांत ३ बळी टिपलेत. या सामन्यात एकूण ८ बळी टिपणारा बुमराह सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

पहिल्या दिवशी १५० धावांवर संपूर्ण संघ बाद झाल्यानंतर बरेच संघ पुनरागमन करू शकले नाहीत, परंतु बुमराहच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने ही किमया करून दाखवली.

भारताचा पहिला डाव १५० धावांत आटोपल्यानंतर भारताने ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावात १०४ धावांत गुंडाळले व पहिल्या डावात ४६ धावांची निसटती आघाडी मिळविली. दुसऱ्या डावात मात्र भारताने जोरदार पुनरागमन केले. य़शस्वी जयस्वाल (१६१), विराट कोहलीची (नाबाद १००) दमदार शतके व केएल राहुलच्या (७७) अर्धशतकाच्या बळावर भारताने ६ बाद ४८७ धावा उभारून आपला दुसरा डाव घोषित केला व ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ५३४ धावांचे लक्ष्य ठेवले., परंतु धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ चौथ्याच दिवशी ५८.४ षटकांत २३८ धावांतच गारद झाला. ट्रॅव्हिस हेड (८९) व मिचेल मार्शने (४७) तेवढे शर्थीचे प्रयत्न केले, परंतु इतर फलंदाज जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराजच्या प्रभावी गोलंदाजीसमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाही. बुमराह व सिराजने प्रत्येकी ३ बळी टिपलेत. वॉशिंग्टन सुंदरने २ बळी, तर कसोटी पदार्पण करणाऱ्या हर्षित राणा व नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले. ◂(वृत्तसंस्था)

# भारत डब्ल्यूटीसी गुणतालिकेत पुन्हा अव्वल स्थानावर

◆ **दुबई, २५ नोव्हेंबर**

सोमवारी येथे बॉर्डर-गावस्कर करंडकाच्या पहिल्या कसोटी सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी पराभव करून भारताने जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या गुणतालिकेत पुन्हा अव्वल स्थान पटकावले.

भारत डब्ल्यूटीसी क्रमवारीत लक्षणीय फरकाने आघाडीवर होता, परंतु न्यूझीलंडकडून आपल्या मायभूमीवर ०-३ ने कसोटी मालिका गमावल्यामुळे भारताची डब्ल्यूटीसीच्या क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर घसरण झाली होती. या पराभवामुळे भारताच्या पुढील वर्षी होणाऱ्या डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत प्रवेश करण्याच्या आशाही धूसर झाल्या होत्या. मात्र ऑस्ट्रेलियावरील या सर्वात मोठ्या विजयामुळे भारताला बळ मिळाले आहे. भारताचे आता ६१.११ टक्के गुण आहेत आणि ते अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया ५७.६९ टक्के गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

या विजयामुळे दोन वेळच्या उपविजेत्या भारतीय संघाला आता २०२३-२५ डब्ल्यूटीसी गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचवले आहे व पुढील वर्षी लॉर्ड्वर सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरी गाठण्याची त्यांची शक्यता अधिक बळकट झाली आहे, असे आयसीसीने आपल्या वेबसाइटवर म्हटले आहे. ऑस्ट्रेलिया नऊ संघांच्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर घसरला असून ते अद्याप आपल्या विजेतेपदाचे रक्षण करण्याच्या शर्यतीत आहेत, असेही त्यात म्हटले आहे.

डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत थेट पात्रता सुनिश्चित करण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आपल्या उर्वरित चारपैकी तीन कसोटी जिंकणे आवश्यक आहे, अशी आयसीसीने पुष्टी केली आहे. ऑस्ट्रेलियासाठी, त्यांच्या उर्वरित सहा कसोटीं सामन्यांपैकी चार सामने जिंकल्यास ते अव्वल स्थानासह डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत लढतीत पोहोचतील, कारण पॅट कमिन्सचा संघ भारताविरुद्धच्या घरच्या मालिकेनंतर दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी श्रीलंकेचा दौरा करेल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आता ॲडलेड येथे ६ डिसेंबरपासून दिवस-रात्र कसोटी सामना होणार आहे, त्यानंतर ब्रिस्बेनमध्ये तिसरी कसोटी (१४-१८ डिसेंबर), मेलबर्नमध्ये २६-३० डिसेंबर दरम्यान चौथी कसोटी आणि ३ ते ७ जानेवारी दरम्यान सिडनी येथे पाचवी आणि शेवटची कसोटी होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# जयस्वालची आतापर्यंतची सर्वोत्तम कसोटी खेळी : बुमराह

◆ **पर्थ, २४ नोव्हेंबर**

सलामीवीर यशस्वी जयस्वालने चार शतकांसह आपल्या कसोटी कारकिर्दीची उल्लेखनीय सुरुवात केली आहे, परंतु भारताचा हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने युवा सलामीवीराची ऑस्ट्रेलियाविरुद्ध येथे १६१ धावांची खेळी ही आजपर्यंतची सर्वोत्तम खेळी असल्याचे म्हटले आहे. यशस्वीची ही खेळी मैलाचा दगड ठरला आहे.

जयस्वालने आपल्या ऑस्ट्रेलियन दौऱ्याची सुरुवात पहिल्या डावात शून्यासह केली, परंतु दुसऱ्या डावात त्याने २९७ चेंडूंत १५ चौकार व ३ षट्कारांसह १६१ धावांची प्रभावी खेळी केली. डावखुऱ्या जयस्वालचे हे चौथे कसोटी शतक ठरले, त्यातील दोन द्विशतके आहेत.

जयस्वालची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कसोटी खेळी होती. त्याला आक्रमण करायला आवडते, असे भारताचा हंगामी कर्णधार बुमराह म्हणाला. भारताने बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी मालिकेच्या सलामीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी विजय नोंदवला. फॉर्मात आलेल्या विराट कोहलीने दुसऱ्या डावात नाबाद १०० धावा ठोकल्या.

भारताचा प्रमुख फलंदाज फॉर्मसाठी संघर्ष करत आहे असे मला कधीच वाटले नाही, असे बुमराह म्हणाला. पहिल्या डावात १५० धावांवर बाद झाल्यानंतर दोन मोठा विजय मिळवणे हा भारतासाठी जबरदस्त निकाल आहे. जेव्हा एखादी व्यक्तकी आत्मविश्वास ठेवते, तेव्हा विशेष गोष्टी घडतात, असे रोहित शर्माच्या अनुपस्थितीत संघाचे नेतृत्व करणारा बुमराह म्हणाला.

पहिल्या डावात आमच्यावर दडपण आले होते, पण आमच्या संघाने ज्या पद्धतीने प्रत्युत्तर दिले, तो वाखाणण्याजोगा आहे, मी प्रत्येकाला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास सांगितले होते. क्षमतेवर विश्वास असेल, तर तुम्ही काहीतरी विशेष करू शकता, असेही तो म्हणाला. पहिल्या डावात धावा न केल्यामुळे आमच्या संधी वाया गेल्या, असे ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने मान्य केले. आमचे अनुभवी खेळाडू मालिकेत पुनरागमन करण्याचा प्रयत्न करतील अशी आशा कमिन्सने व्यक्त केली. दुसरा कसोटी सामना ॲडलेडमध्ये ६ डिसेंबरपासून सुरू होणार आहे.बाजूला खूप अनुभव आहे, ते त्याबद्दल चांगले चालले आहेत, त्याच परिस्थितीत आपण काय चांगले करू शकतो यावर बरीच संभाषणे होतील. ◂(वृत्तसंस्था)

# पहिल्या फेरीत डी. गुकेशचा पराभव

**जागतिक बुद्धिबळ स्पर्धा**

◆ **सिंगापूर, २५ नोव्हेंबर**

येथे सोमवारपासून प्रारंभ झालेल्या जागतिक बुद्धिबळ विजेतेपदासाठीच्या स्पर्धेत पहिल्या फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेशला गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनला पराभव पत्करावा लागला.

१८ वर्षीय गुकेश हा जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपदाच्या स्पर्धेत लढणारा आतापर्यंतचा सर्वात तरुण आव्हानकर्ता आहे. गुकेशने डावाच्या सुरुवातीला आपल्या राजासमोरील प्याद्याला पुढे ढकलून आश्चर्यचकित केले. ही एक चाल आहे, आक्रमण करण्याच्या हेतूचे प्रतीक आहे आणि डिंग लिरेनने परिस्थितीचा सामना करण्यासाठी फ्रेंच संरक्षण पद्धतीचा अवलंब केला.

मधल्या डावात अवास्तव गुंतागुंतीमुळे गुकेश काहीसा गोंधळला व चुकीच्या गणनेची त्याला फार मोठी किंमत मोजावी लागली. त्यामुळे डिंग लिरेनला सुरुवातीच्या सामन्यात विजय मिळवता आला.




जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या पहिल्या फेरीत खेळताना डिंग लिरेन व डी. गुकेश

दिग्गज विश्वनाथन् आनंदने २००१ मध्ये स्पेनच्या ॲलेक्सी शिरोव्हविरुद्धच्या पहिल्या विश्वविजेतेपदाच्या स्पर्धेत निवडल्या पद्धतीप्रमाणेच गुकेशने आपल्या डावाची सुरुवात केली होती. लिरेनने डावाची सुरुवात करण्यात बराच वेळ घालवला. ◂(वृत्तसंस्था)

# रोहितचा गुलाबी चेंडूसह कसून सराव

**सराव सामन्यात खेळणार**

◆ **पर्थ, २५ नोव्हेंबर**

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने येथे आल्यावर नेटमध्ये फलंदाजीचा कसून सराव केला. पितृत्वाच्या सुटीनंतर रोहित भारतीय संघात सहभागी झाला. गुलाबी चेंडूच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळण्यापूर्वी तो येथे एका सराव सामन्यात खेळणार आहे.

रोहितच्या अनुपस्थितीत संघाची धुरा सांभाळणाऱ्या उपकर्णधार जसप्रीत बुमराहने बॉर्डर-गावस्कर करंडकाच्या सलामीच्या कसोटी सामन्यात सोमवारी भारताने ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी शानदार विजय मिळवला.



पर्थ येथे पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवसाचा खेळ बघताना रोहित शर्मा

काही मुलाचे स्वागत करणारा रोहित रविवारी सायंकाळी पर्थमध्ये आला आणि ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर भारताच्या सर्वात मोठ्या कसोटी विजयाचा साक्षीदार म्हणून ड्रेसिंग रूममध्ये होता.

सोमवारी दुपारच्या जेवणाच्या सत्रात तो नेटमध्ये फलंदाजी करताना दिसला. राखीव वेगवान गोलंदाज नवदीप सैनी, यश दयाल व मुकेश कुमारने टाकलेल्या गुलाबी चेंडूंचा सामना केला. अनुभवी फिरकीपटू रवींद्र जडेजानेही काही काळ गोलंदाजी केली. त्याने आपले प्रचलित पुल शॉट्स खेळण्याचा प्रयत्न केला.

३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दोन दिवसीय टूर सामन्यासाठी भारतीय संघ बुधवारी कॅनबेरा येथे जाणार आहे. या सराव सामन्याला प्रथम श्रेणीचा दर्जा नाही. हा सामना दुसऱ्या कसोटी सामन्याची तयारी म्हणून काम करेल.

आगामी ६ डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान गुलाबी चेंडूचा वापर केला जाणार आहे.

आता दुसऱ्या कसोटी सामन्यात मी शक्य होईल त्या मार्गाने रोहितला मदत करण्यास उत्सुक आहे, असे बुमराह म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

# माजी हॉकीपटू अशोक कुमार यांना हृदयविकाराचा झटका



◆ **नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

महान मेजर ध्यानचंद यांचे सुपुत्र व भारताचे माजी हॉकीपटू अशोक कुमार यांना रविवारी हृदयविकाराचा झटका आला आणि छातीत अस्वस्थतेमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर आणि धोक्याबाहेर आहे, अशी माहिती त्यांच्या कुटुंबातील सूत्रांनी सोमवारी दिली. सोमवार नंतर ७४ वर्षीय अशोक कुमार यांच्यावर ॲंजिओप्लास्टी केली जाईल. रविवारी त्यांना एस्कॉर्ट्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले व तिथे ॲंजिओग्राफी करण्यात आली. ॲंजिओग्राफीच्या अहवालात काही ब्लॉकेज असल्याचे निदर्शनास आले. आज स्टेंट लावणार आहेत, असे कौटुंबिक सूत्रांनी सांगितले. अशोक कुमार हे अजित पाल सिंग यांच्या नेतृत्वाखाली १९७५ विश्वचषक जिंकलेल्या भारतीय संघाचे सदस्य होते. १९७२ म्युनिक ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचेही ते सदस्य होते. १९७४ मध्ये त्यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९७५ मध्ये त्यांनी पाकिस्तानविरुद्ध विजयी गोल करून भारताला विश्वचषकात एकमेव विजय मिळवून दिला होता. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राच्या दोन्ही संघाची विजयी सलामी

## कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**अलिगड, दि.२५ नोव्हेंबर -**

महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने ४३ व्या कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेची विजयी सलामी दिली.अलिगड (उत्तर प्रदेश) येथील म हाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस स्टेडियमवर सोमवारी सुरू झालेल्या या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत कुमार व मुली गटांमध्ये प्रत्येकी ३० संघाने सहभाग घेतला आहे.

सलामीच्या सामन्यात महाराष्ट्र मुलांच्या संघाने विदर्भावर ३७-२६ असा ११ गुण आणि ५ मिनिटे राखून दणदणीत विजय मिळविला. मुलींच्या गटात महाराष्ट्राने मध्यप्रदेशवर ४०-१२ असा १ डाव आणि २८ गुणांनी धुव्वा उडविला.

मुलांच्या सामन्यात महाराष्ट्र संघाकडून विलास वळवीने २.४० मी. व १.३० मी. संरक्षण आणि आक्रमणामध्ये ४ गुण मिळवले. भरतसिंग वसावेने १.३० मिनिट संरक्षण करताना आक्रमणामध्ये २ गुणांची कमाई केली. कृष्णा बनसोडेने २.५९ मी. संरक्षण केले. आशिष गौतमने नाबाद २.१० आणि १.२० संरक्षण करताना आपल्या धारदार आक्रमणात ८ गुण टिपले. विदर्भ संघाकडून मोहित नेवरेने १.00 मी. संरक्षण केले. शैलेश कोरेटीने १.00 मी. संरक्षण करताना आक्रमणात ६ गुण मिळवले.





मुलींच्या सामन्यात प्रतीक्षा बिराजदारने ३.३० मी. संरक्षण करून आक्रमणात २ गुण मिळवले. अश्विनी शिंदे हिनेही ३.३० मी. संरक्षण करून ४ गुणांची कमाई केली. सुषमा चौधरीने ३.२० मी. संरक्षण करून आक्रमणामध्ये ४ गडी बाद केले. प्रणाली काळेने नाबाद १.१० मी. संरक्षण करून आक्रमणामध्ये १० गुणांची कमाई केली. तन्वी भोसलेने २.४० मी. वेळ नोंदवली. मध्यप्रदेश संघाकडून अक्षरा मालिनी आणि लक्ष्मीने प्रत्येकी एक मिनिटे वेळ नोंदवली.

मुलांच्या अन्य सामन्यात तामिळनाडूने चंदीगड वर एक डाव आणि ३४ गुणांनी विजय संपादन केला. आंध्र प्रदेशने मध्य भारतचा १६ गुणांनी पराभव केला. दिल्ली संघाने हिमाचल प्रदेशवर एक डाव आणि २१ गुणांनी मात केली. मुलींच्या गटात ओडिसाने मध्य भारतचा १ डाव २२ गुण राखून पराभव केला. राजस्थाने आंध्रप्रदेशवर एक डाव आणि १६ गुणांनी विजय संपादन केला.

# भुवनेश्वर १०.७५ कोटी रुपयांत पुन्हा आरसीबीशी करारबद्ध

**आयपीएल लिलाव**



◆ **जेद्दाह, २५ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या आयपीएल लिलावात दुसऱ्या दिवशी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मध्यम गती गोलंदाज भुवनेश्वर कुमारला १०.७५ कोटी रुपयांची मोठी बोली लावून पुन्हा आपल्या संघात दाखल करून घेतले.

गुजरात टायटन्सने तुषार देशपांडे, वॉशिंग्टन सुंदर व गेराल्ड कोएत्झीवर मोठी बोली लावून आपल्या संघात सहभागी करून घेतले. मात्र अजिंक्य रहाणे, मयंक अग्रवाल, पृथ्वी शॉ, ग्लेन फिलिप्स, केन विल्यम्सन, शार्दुल ठाकूर, डॅरील मिचेल, शाय होप, के. एस. भरत, केशव महाराज, आदिल रशिद, अकिल हुसेन व विजय वियास्कंथला अद्याप कोणत्याही फ्रॅन्चायझींनी खरेदी केले नाही.

### दुसऱ्या दिवशी विक्रीस गेलेले खेळाडू असे-

| | |
|---|---|
| ☞ भुवनेश्वर कुमार (बंगळुरू)- | १०.७५ कोटी रुपये |
| ☞ दीपक कुमार (मुंबई)- | ९.२५ कोटी रुपये |
| ☞ आकाश दीप (लखनौ)- | ८ कोटी रुपये |
| ☞ मुकेश कुमार (दिल्ली)- | ८ कोटी रुपये |
| ☞ मार्को जॅन्सेन (पंजाब)- | ७ कोटी रुपये |
| ☞ तुषार देशपांडे (गुजरात)- | ६.५० कोटी रुपये |
| ☞ कृणाल पांड्या (बंगळुरू)- | ५.७५ कोटी रुपये |
| ☞ अल्लाह गझनफर (मुंबई)- | ४.८० कोटी रुपये |
| ☞ नितीश राणा (राजस्थान)- | ४.२० कोटी रुपये |
| ☞ वॉशिंग्टन सुंदर (गुजरात)- | ३.२० कोटी रुपये |
| ☞ जोश इंग्लिस (पंजाब)- | २.६० कोटी रुपये |
| ☞ सॅम करन (चेन्नई)- | २.४० कोटी रुपये |
| ☞ गेराल्ड कोएत्झी (गुजरात)- | २.४० कोटी रुपये |
| ☞ फाफ डु प्लेसिस (दिल्ली)- | २ कोटी रुपये |
| ☞ रोवमन पॉवेल (कोलकाता)- | १.५० कोटी रुपये |
| ☞ रियान रिकेल्टन (मुंबई)- | १ कोटी रुपये |

◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# मिशन झिरो डेथ अंतर्गत हजारो प्रवाशांचे वाचले प्राण

## मध्य रेल्वेचा सातत्यपूर्ण प्रयत्न; गतवर्षीच्या तुलनेत जानेवारी ते ऑक्टोबरदरम्यान डेथ ऑन ट्रॅकच्या घटनांमध्ये लक्षणीय घट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मिशन झिरो डेथ अंतर्गत हजारो प्रवाशांचे प्राण वाचले असून गतवर्षीच्या तुलनेत जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ''डेथ ऑन ट्रॅक'' च्या घटनांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. मिशन झिरो डेथचा एक भाग म्हणून ट्रॅकवरील मृत्यू कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने घेतलेल्या परिश्रमाचे अत्यंत प्रभावी परिणाम मिळाले आहेत.

''डेथ ऑन ट्रॅक'' प्रकरणांची संख्या ३६७ प्रकरणांनी म्हणजेच १४ टक्क्यांनी कमी झाली आहे. म्हणजे जानेवारी ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत २७५५ प्रकरणांवरून यावर्षी जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान २३८८ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. ''जखमी'' होण्याची प्रकरणे १४१ ने म्हणजेच १० टक्क्यांनी कमी झाली आहेत. म्हणजे जानेवारी ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीतील १३५२ प्रकरणांवरून यावर्षी जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत १२११ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. एकूण घटनांची संख्या पाहता मृत्यू किंवा जखमींची संख्या ही ५०८ म्हणजेच १३ टक्क्यांने घटली आहेत. म्हणजे जानेवारी ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीतील ४१०७ प्रकरणांवरून यावर्षी जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ३५९९ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.



### अल्पकालीन योजना
- ❊ अनधिकृत प्रवेशाच्या (ट्रेसपासींग) नियंत्रणासाठी ठराविक ठिकाणांवर रेल्वे सुरक्षा दलाचे कर्मचारी नियुक्त करणे.
- ❊ सदर भागात सीमा सुरक्षा भिंती बांधणे (मुख्यतः उपनगरी भागात, विशेषतः मुंबई विभागात).
- ❊ रेल्वे हद्दीवरील रेल्वे रुळाजवळची अतिक्रमणे हटवणे.
- ❊ अतिक्रमण झालेल्या भागात रेल्वे सुरक्षा दलाने इतर विभागांसोबत जनजागृती कार्यक्रम आखणे.
- ❊ रेल्वे कायद्याच्या १४७ अन्वये दंडात्मक कारवाईची नोंद करणे.
- ❊ फलाट संपण्याच्या ठिकाणी कुंपण घालणे.
  अनधिकृत प्रवेश टाळण्यासाठी फलाटावर शेवटी रॅम्प काढणे.
- ❊ धोकादायक ठिकाणांजवळ व्हिसल बोर्डची स्थापना.

### दीर्घकालीन योजना
- ❊ फलाटाचे रुंदीकरण.
- ❊ नवीन फलाटाचे बांधकाम.
- ❊ पादचारी पूलांचे बांधकाम.
- ❊ भुयारी मार्गांचे बांधकाम.
- ❊ विना वातानुकूलित उपनगरीय गाड्या वातानुकूलितमध्ये बदलण्याची योजना (मुंबई विभागात).
- ❊ एका फलाटावरुन दुसऱ्या फलाटावर जाताना अनधिकृत रुळ ओलांडता येऊ नये म्हणून एस्केलेटर आणि लिफ्ट.
- ❊ समाज माध्यमांद्वारे प्रवाशांच्या विचार करण्यावर प्रभाव पाडणे.
- ❊ गर्दीच्या वेळी गर्दी कमी करण्यासाठी कार्यालयांच्या वेळात बदल करणे (मुंबई विभागात)

या प्रकरणांचा बारकाईने अभ्यास केल्यावर असे दिसून आले आहे की, ट्रॅकवर मृत्यू किंवा गंभीर जखमी होण्याचे प्रमुख कारण हे अनधिकृत प्रवेश हे आहे. जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत अनधिकृत वावरामुळे (ट्रेसपासींग) मृत्यू आणि जखमींच्या एकूण ३५९९ प्रकरणांपैकी १४२९ घटना घडल्या आहेत. ज्याचे प्रमाण जवळपास ४०% आहे. ट्रॅकवर मृत्यूच्या एकूण २३८८ प्रकरणांपैकी १२१० प्रकरणे अनधिकृत वावरामुळे (ट्रेसपासींग) घडली आहेत, ज्याचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त आहे. अनधिकृत वावरामुळे (ट्रेसपासींग) यापैकी बऱ्याच घटनांमध्ये शरीराचा एक अंग/भाग गमावणे यासह गंभीर दुखापती आहेत, ज्याचे प्रमाण सुमारे १८% आहे. चालत्या ट्रेनमधून पडल्यामुळे ६५३ प्रकरणे, फलाट आणि ट्रेनमधील अंतरामुळे पडल्याची ९१ प्रकरणे आणि आत्म हत्या, विजेच्या धक्क्याने मृत्यू, हृदयविकाराचा झटका, आजारपण इत्यादी नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू यासारख्या इतर कारणांची १४२३ प्रकरणे. मध्य रेल्वेने अशा प्रकारच्या घटना कमी करण्यासाठी सर्वसमावेशक जनजागृती मोहिमा राबवून ठोस प्रयत्न सुरू केले आहेत. ज्यात अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन बाबींचा समावेश आहे. माहिती पत्रक वाटण्याबरोबरच बॅनरद्वारे समुपदेशन, नुक्कड नाटक (यमराज आणि चित्रगुप्त थीम) द्वारे समुपदेशन देखील नियमित अंतराने केले जात आहे. मध्य रेल्वे प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध आहे आणि यामुळेच मिशन शून्य मृत्यू साध्य करण्याच्या सामूहिक उद्दिष्टात योगदान देऊ पाहत आहे. मध्य रेल्वे प्रवाशांना रेल्वे परिसरात वावरताना सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे, रुळ ओलांडते वेळी जोखीम टाळण्यासाठी आणि क्रॉसिंगच्या ठिकाणी पादचारी पूलाचा तसेच भुयारी मार्ग, एस्केलेटर, लिफ्ट्स सारख्या पर्यायांच्या वापरावर भर देण्याचे रेल्वेकडून आवाहन करत आहे.

---

## संक्षिप्त वृत्त

### प्रामाणिकपणे जे सोबत राहिले त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही : दीपकआबा

**सांगोला, दि.२५ नोव्हेंबर-**

या निवडणुकीत जे माझ्याबरोबर प्रामाणिकपणे राहिले, त्यांना वार्यावर सोडणार नाही व त्यांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही असे प्रतिपादन माजी आ.दिपकआबा साळुंखे-पाटील यांनी केले. ते सांगोला विधानसभा निवडणूक निकालानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होते. पुढे बोलताना दीपकआबा साळुंखे-पाटील म्हणाले, ही निवडणूक आपली पहिलीच निवडणूक होती. या निवडणुकीत जनतेने दिलेला कौल मान्य आहे. मला पडलेले मते ही निष्ठावंतांची मते आहेत. कोणीही खचून जाण्याचे कारण नाही. ज्यांनी गद्दारी केली, त्याला माझे दरवाजे कायमस्वरूपी बंद केले आहेत असे सांगून कार्यकर्त्यांनी आजपासून नव्या जोमाने कामाला लागावे. कार्यकर्त्यांना कसलीही अडचण आली तर, अर्ध्या रात्री मला फोन करा त्याची अडचण दूर करू असेही शेवटी म्हणाले. माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी पहिल्यांदाच सांगोला विधानसभा निवडणूक लढवली. त्यामध्ये त्यांना ५० हजार पेक्षा जास्त मते मिळाली.

### विवाहितेचा छळ; सात आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी, दि. २५ नोव्हेंबर-**

मुंबई येथील आरोपी अब्दुलरहीम उर्फ अब्दुल मुनीर शेख, मुनीर हैदर शेख, राजीया उर्फ रिजवाना मुनीर शेख, महम्मद यासीन मुनीर शेख,नयमा मुनीर शेख, सायमा महम्मद मिराज शेख, महम्मद मिराज शेख यांच्राविरुद्ध पांगरी पोलीस स्टेशन येथे दि. २६ ऑक्टोबर २४ रोजी मारहाण केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. सदर कार्यवाईदरम्यान आरोपी हे फरार होते व तदनंतर आरोपींनी ॲड. वैभव सज्जनराव देशमुख व ॲड. अभिषेक राजीव कदम यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन मिळण्याकामी अर्ज दाखल केला. सदर जामीन अर्जाची सुनावनी जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांच्यासमोर सुनावणी झाली. सदर जामीन अर्जाची युक्तीवादावेळी या आरोपींविरोधात खोटेपणाने आरोप केलेले होते. सदर आरोपींकडून काहीही जप्त करावयाचे नाही, असा युक्तीवाद केला व सदर युक्तिवाद न्यायाधीश यांनी ग्राह्य धरुन तपासकामात मदत करण्याच्या अटीवर अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला व सदर प्रकरणी ७ आरोपीविरुद्ध ॲड . वैभव देशमुख व ॲड. अभिषेक कदम यांनी काम पाहिले.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोलापूर विभागातून विशेष गाडी

**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी त्यांच्या अनुयायांच्या सोयीसाठी आणि अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे. सोलापूर रेल्वे विभागातून चालवल्या जाणाऱ्या गाड्यांचा तपशील खालीलप्रमाणे : कलबुर्गी-मुंबई-कलबुर्गी अनारक्षित विशेष गाडी, विशेष गाडी क्रमांक ०१२४५ दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता कलबुर्गी येथून सुटेल पुढे ही गाडी सोलापूर रेल्वे स्थानकांवर रात्री ०९.४० वाजता पोहोचेल आणि १०.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ८:२० वाजता सीएसएमटी मुंबई येथे पोहोचे. विशेष गाडी क्रमांक ०१२४६ सीएसएमटी मुंबई येथून ७ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री १२:२५ वाजता (६/७ डिसेंबरच्या मध्यरात्री) सुटेल पुढे हि गाडी सोलापूर रेल्वे स्थानकांवर दुसऱ्या दिवशी सकाळी ०८.४५ वाजता पोहोचेल आणि त्याच दिवशी सकाळी ११:३० वाजता कलबुर्गी येथे पोहोचेल. थांबे: कलबुर्गी, गाणगापूर रोड, अक्कलकोट रोड, सोलापूर, कुर्डुवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कल्याण, दादर आणि सीएसएमटी मुंबई. रचना: २२ सामान्य दुसऱ्या श्रेणीचे डबे. दरवर्षी सोलापूर येथून भरपूर प्रमाणात भिम अनुयायी हे मुंबई येथे चैत्यभूमी ला बाबासाहेबांच्या स्मृतीस वंदन करायला जात असतात. त्याच प्रमाणे यंदाच्या हि वर्षी महापरिनिर्वाण विशेष गाडीच्या वेळेची नोंद घेऊन अनुयायांनी आपला प्रवास करावा असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील यांनी केले आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोलापुरातून हजारो अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी जात असतात. यामुळे रेल्वे प्रशासन नेहमीच नियोजन करत असते. यंदाही यासाठी विशेष नियोजन केले आहे.

## निधन वृत्त...

### परमेश्वर जिडगी



**अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी व मुंबई रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी परमेश्वर ईरण्णा जिडगी (वय ६५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर वागदरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

### चंद्रकांत वळसंग



**अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील एस. एस. शेळके प्रशालेचे निवृत्त कर्मचारी चंद्रकांत सिध्दप्पा वळसंग (वय ८५) यांचे अकस्मिक निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर वागदरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन भाऊ, दोन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे.

---

# समायोजन होऊनही मुख्याध्यापकाचे अपात्र शाळेतून दहा महिन्यांपासून वेतन

## प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचा मनमानी कारभार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-**

पटसंख्याअभावी अपात्र झालेल्या शाळेतून मुख्याध्यापक पात्र शाळेत समायोजन बदली होऊनही मागील दहा महिन्यांपासून अपात्र शाळेतच वेतन काढून शासनाची आणि प्रशासनाची दिशाभूल केल्याचा प्रकार अक्कलकोट तालुक्यात घडला. हा सर्व प्रकार प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्या मनमानी कारभाराचा उत्तम नमुना असल्याची चर्चा प्राथमिक शिक्षकांतून होत आहे.

कोन्हाळी जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी झाल्याने मुख्याध्यापक पद अपात्र झाले आहे.अपात्र शाळेतून पात्र शाळेत मुख्याध्यापक पदाची समायोजन प्रक्रिया डिसेंबर २०२३ मध्ये पार पडली. यावेळी कोन्हाळी शाळेतून मुख्याध्यापक मा. ई. पवार यांची समायोजन बदली हंजगी शाळेत झालेली असतानाही संबंधित मुख्याध्यापकास अद्यापपर्यंत कार्यमुक्त करण्यात आलेले नाही.



यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. समायोजन ही प्रशासकीय बदली असूनही अद्यापपर्यंत कार्यमुक्त न केल्याने शासन आदेशाची पायमल्ली झालेली आहे. तसेच नियमबाह्य पद्धतीने अपात्र शाळेत वेतन काढून प्रशासनाची फसवणूक केल्याने प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्यावर कारवाईची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. प्रभारी गटविकास अधिकारी प्रशांत आरबाळे यांच्या कारनाम्यावर आजपर्यंत अनेक पीडित शिक्षक आणि शिक्षिकांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागासह राज्याच्या शिक्षण विभागाकडे तक्रार केल्या आहेत. मात्र कोणीही त्यांना रोखत नाहीत, हे दुर्दैवी बाब आहे. यामुळे संताप व्यक्त होत आहे. आतातरी त्यांच्यावर कारवाई होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या वेतनातून वसूल करा

हम करे सो कायदा हा प्रकार सर्रासपणे तालुक्यात चालू असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. अपात्र शाळेत काढण्यात आलेले वेतन प्रभारी गटशिक्षणाधिकारी आरबाळे यांच्या वेतनातून वसूल करण्याची मागणी मागासवर्गीय संघटनेचे तालकाध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी केली आहे.

---

# राज्यात भाजपाची सत्ता आल्याचा आनंद

## ॲड. सोमनाथ वैद्य : विकासाला चालना मिळण्याच्या भावना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**



सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून भाजपचे बंडखोर उमेदवार म्हूणन निवडणूक लढवलेले ॲड. सोमनाथ वैद्य यांनी राज्यात भाजपप्रणित म हायुतीची सत्ता आल्याने आनंद व्यक्त केला आहे.

मी जरी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून पराभूत झालो असलो तरी राष्ट्रनिर्मिती व राज्यविकाससाठी भाजपाची सत्ता राज्यात येणे आवश्यकता होती, लाडक्या बहिणीनी भाजपाला भरघोस मतदान करून सत्तेवर बसवले यांचा मनस्वी आनंद झाला आहे. आमदार सुभाषबापू देशमुख हे आपणास आदरणीय असून त्यांनी भूतकाळातील अनुभवावर ही निवडणूक प्रचंड मताधिक्यने जिंकली त्याबद्दल मी आदरणीय सुभाष बापू यांचे मनापासून अभिनंदन करतो तसेच सोलापूर दक्षिणच्या विकासासाठी व भाजपाला मजबूत करण्यासाठी मी यापुढेही सर्वसामान्यची कामे करणार परंतु यापुढे लरश्रश्रशीं पेपरवर निवडणूक सुरु झाल्याशिवाय एकही निवडणुक लढवणार नाही असे स्पष्ट केले आहे. दक्षिणची जनता अधिक विकासासाठी प्रशासकीय कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तीला संधी देईल म्हूणन मी निवडणूक लढवली परंतु मला अत्यअल्प मते मिळाल्याने मी आता निवडणुकीच्या राजकारणपासून लांब राहून शासनस्थरावर काम करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. गेल्या सहा महिन्यात विविध उपक्रम घेऊन मी १०-१५ हजार थेट लोकांच्या संपर्कात होतो परंतु मला मिळालेली मते अत्यअल्प असल्याने ती एवढीच का मिळाली हा संशोधनचा विषय आहे. राज्याचे प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस हे आपले आवडते नेते असून एक सामान्य कार्यकर्ता म्हूणन काम करणार आहे असे स्पष्ट केले आहे.

---

**CHANGE IN NAME**

I HERBY DECLARE THAT MY OLD NAME **SARITA PADAM RAKA** HAS BEEN CHANGED TO **SARITA PADAMCHAND RAKA** RESIDING AT 203 WEST MANGALWAR PETH, SOLAPUR-413002. KINDLY NOTE THE SAME.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **RUPESH PUNDILK SONKAMBALE** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **RUPESH PUNDILK SONKAMBLE** KINDALY NOTE THE SAME.
**AFFI NO. 55110**
**DATE : 22/10/2024**

**नावात बदल**

माझे जुने नाव - **शोएबमोहम्मद रऊफ रायटर (Shoaibmohammed)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **शोएबमोहम्मद रऊफ रायटर (Shoaibmohammad)** (पत्ता - ४२, मंत्री चंडक इस्टेट, होटगी रोड. सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**ॲफि. नं. २४५२६१२४७१२ ६८५०१४९७२१८**
**दि. २५/११/२०२४**

**नावात बदल**

माझे जुने नाव - **अबु सुफियान म उमर बागवान (Umar)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **अबुसुफियान मोहम्मद उमर बागवान (Umer)** (पत्ता- ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**ॲफि. नं. ५५३४१/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

**नावात बदल**

माझे जुने नाव - **मोहम्मद उमर अब्दुल गफूर बागवान (Umar)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **मोहम्मद उमर अब्दुल गफूर बागवान (Umer)** (पत्ता - ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**ॲफि. नं. ५५३४२/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

**नावात बदल**

माझे जुने नाव - **फैझान म. उमर बागवान (Umar)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **फैझान मोहम्मद उमर बागवान (Umer)** (पत्ता - ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**ॲफि. नं. ५५३४३/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

**नावात बदल**

माझे जुने नाव - **बीबी फातिमा मोहम्मद उमर बागवान (Umar)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **बीबी फातिमा मोहम्मद उमर बागवान (Umer)** (पत्ता - ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**ॲफि. नं. ५५३४०/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

**Classifieds**

**पाहिजेत**
डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटण्याची वेळ:- ९-५/६ फोन नं : ७०२०१४८४२६ ८६५२७५१९०२

**पाहिजेत**
अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला संपर्क : ९८९०१४३४३२

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**महावितरण** — 'ई' निविदा सूचना

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवण्यात येत आहेत. इतर सर्व निविदा माहिती https://tender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरीधारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | EE/PPR/T-08/2024-25 | RSJ/PSC पोल, वितरण रोहित्र, मिटर्स, ऑईल बॅरल वाहतूक व इतर साहित्याची चढ / उतार | १० लाख | 02.12.2024 |

ई निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशीलासह व विहित नमुन्यात सादर करावी.
**ऑफिसचा पत्ता :-** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर
**PRO / BMTZ / 136 / 2024-25** **कार्यकारी अभियंता, महावितरण (संवसु) विभाग पंढरपूर**

**अुत्तम सेवा** — **मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४** — **नोकरीच्या शोधात**

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **समाजकल्याण आयुक्तालय, पुणे** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) अधीक्षक- महिला (९२ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ३०/११/२४ |
| | २) अधीक्षक- सर्वसाधारण (६१) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) समाजकल्याण निरीक्षक (३९) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) वरिष्ठ निरीक्षक (०५ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ५) लघुलेखक (२२ पदे) | दहावी व टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| २) | **राष्ट्रीय पात्रता परिक्षा, NET** | | | |
| | सहा. प्राध्यापक | पदव्युत्तर पदवी (५५%) किंवा ॲपिअर | -- | १०/१२/२४ |
| ३) | **आय.डी.बी.आय. बँक, IDBI** | | | |
| | १) सहा. प्रबंधक (५०० पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २५ पर्यंत | ३०/११/२४ |
| | २) ॲग्री असिस्ट ऑफिसर (१००) | B.Sc / B.Tech (कृषी) उत्तीर्ण | २५ पर्यंत | |

**❊ मोफत सरकारी अपडेट ❊**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ४) | **कर्नाटका बँक** | | | |
| | कस्टमर सर्व्हिस असिस्टंट | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | २६ पर्यंत | ३०/११/२४ |
| ५) | **एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडिया,** | **AAI** | | |
| | सिक्युरिटी स्क्रीनर्स (२७४ पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २७ पर्यंत | १०/१२/२४ |
| ६) | **नॉर्थेस्ट फ्रंटीवर रेल्वे, NFR** | **(ॲप्रेंटिस करण्याकरिता)** | | |
| | ॲप्रेंटिस (५६४७ पदे) | दहावी (५०%) व ITI (इले/डिझेल/ मशिनिस्ट, वेल्डर/ फिटर/ कार्पेंटर/ पेंटर/ टर्नर/ए.सी./मेसन/आय.टी.) | २४ पर्यंत | ०३/१२/२४ |
| ७) | **यात्रा इंडिया लि.** | | | |
| | १) ITI ॲप्रेंटिस (२४९८ पदे) | दहावी (५०%) व ITI (इले./फिटर/ वेल्डर/इलेक्ट्रॉ/झिझेल/मोटार/कोपा) | १८ पर्यंत | ३०/११/२४ |
| | २) नॉन ITI ॲप्रेंटिस (१३८५ पदे) | दहावी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे. | १८ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा** १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org

## संक्षिप्त वृत्त



### महापालिकेतर्फे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त सात रस्ता येथील त्यांच्या पुतळ्यास विभागीय अधिकारी हिदायत मुजावर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच कौन्सिल हॉल समोरिल कै.यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास तद्नंतर सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांचे कार्यालयात कै.यशवंतरावजी चव्हाण यांचे प्रतिमेस विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण अधिकारी रोहित रामटेके ,दिनेश शिंदे, आनंदराव जाधव,जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार, सिद्धू तिमीगार,अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

### अंबर बबलू इलेव्हन संघास विजेतेपद

**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

**अक्षयकुमार चौगुले स्मृती करंडक क्रिकेट; बबलू वळसंगे सामनावीर**

अक्षयकुमार चौगुले स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेत अंबर बबलू इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी अंबर आय. बी. टायगर संघाचा १९ धावांनी पराभव केला. बबलू वळसंगे सामन्याचा मानकरी ठरला. या स्पर्धेत पंच म्हणून स्वप्नील इंगळे व नितीन गायकवाड यांनी तर गुणलखेक म्हणून संतोष गरड यांनी काम पाहिले. अंबर क्रिकेट क्लबने ही स्पर्धा आयोजित केली होती. पारितोषिके संजय चौगुले यांच्या हस्ते देण्यात आली. कृष्णा पवार यांनी सूत्रसंचालन केले. महादेव वरळे यांनी आभार मानले.

**संक्षिप्त धावफलक :** अंबर बबलू : १० षटकांत ११३ (सुनील होतवानी ३७, बबलू वळसंगे ३६, सुरेश नागदेव २२, महेद्र चव्हाण ३ बळी, कुमार आनंदानी १ बळी) वि. वि. अंबर आय.बी. टायगर : १० षटकांत सर्व बाद ९४ (अजहर मुल्ला ३०, महेंद्र ढवाण २३, शंकर वंजारी २ बळी).

**वैयक्तिक पारितोषिके :** सुनील होतवाणी (मालिकावीर), बबलू वळसंगे (सामनावीर), सुरेश नागदेव (फलंदाज), महेंद्र ढवण (गोलंदाज), तुषार म्हेत्रे (क्षेत्ररक्षक).

# पठाण बाग येथील तीन घरांना आग

## गॅस सिलेंडर बाहेर काढल्याने अनर्थ टळला; पालिका अग्निशामक दलाने विझवली आग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

श्री सिद्धेश्वर मंदिर जवळील पठाण बाग येथील तीन घरांना आग लागल्याची घटना आज दुपारी ३.४५ च्या सुमारास घडली. आगीचे कारण अस्पष्ट असून प्रसंगावधान राखून येथील नागरिकांनी घरातील गॅस सिलेंडरच्या टाक्या बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. महापालिका अग्निशामक दलाने तत्परतेने ही आग आटोक्यात आणली.



येथील शेख व राजपूत यांच्या तीन घरांना अचानक आग लागल्याची घटना घडली. परिसरातील पाला पाचोळ्याला आग लागून ही आग नजीकच्या घरांना लागली असावी अशी शक्यता वर्तवली जात आहे. बघता बघता ही आग वाढत गेली. घराबरोबरच कंपाउंड वरील वाळलेल्या झाडांनाही आग लागली. दरम्यान आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी तत्काळ गाड्या पाठवून दिल्या. काही वेळातच अग्निशामक दलाच्या गाड्या दाखल झाल्या. पोलिसही दाखल झाले. साधारणतः पाऊण तासात अग्निशामक दलाच्या जवानांनी ही आग आटोक्यात आणली. अग्निशामक दलाच्या तीन गाड्यांचा वापर करण्यात आला. त्यानंतर ही आग आटोक्यात आली. दरम्यान , येथील नागरिकांनीही आग विझवण्यासाठी मदत केल्याचे दिसून आले.

या आगीमध्ये येथील घरांम धील संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली. विशेष म्हणजे एका घरामध्ये पुढील महिन्यात लग्न असल्याने आवश्यक ती तयारी करण्यात आली होती. डोळ्यात देखत आपल्या घरांना लागलेली आग पाहून संबंधित कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. महिला रडत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. घटनास्थळी आज पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# सोलापुरात चार दिवसांपासून तापमानात घट; पारा घसरला १७ अंशापर्यंत

## थंडीचा वाढणार जोर हवामान खात्याचा अंदाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

सोलापूर शहरात थंडीचा जोर दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा हा १७ अंशापर्यंत स्थिर आहे. सकाळ सत्रात आणि रात्री थंडीचा जोर ही कायम आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या दिवसापासून किमान तापमानाचा पारा हा दोन अंशांनी घसरलेला आहे. यंदाच्या वर्षी सरासरी सर्वत्र इतका पाऊस झाला त्यामुळे थंडीचे प्रमाणही वाढेल असा अंदाज यापूर्वीचा हवामान खात्याने वर्तवला होता. त्याचप्रमाणे थंडीचा कडाका सुरू झालेला जाणवत आहे.

दरम्यान सकाळी धुके पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शहरवासीयांना थंडीचा सामना करावा लागत आहे. सकाळ सत्रात थंडी मोठ्या प्रमाणात जाणवत असल्याने चाकरमान्यांना आणि विद्यार्थ्यांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. डिसेंबर महिन्यात थंडीच्या प्रमाणात आणखीन वाढ होईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

### शहरात थंडीचा पारा घसरला

शहरात २० नोव्हेंबर रोजी ३२.२ अंशावर असलेले किमान तापमान एक अंशांनी घसरून २३ नोव्हेंबरला ३१.४ अंशावर आले आहे. रविवारी किमान तापमान १७.२ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान ३२.४ अंश सेल्सिअस इतके होते. डिसेंबर महिन्यापासून थंडीचा जोर वाढण्याची शक्यता नागरिकांनी थंडीपासून आपल्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी उबदार कपड्यांचा आधार घ्यावा असे आवाहन हवामान खात्याने केले आहेत.

# संजवाड येथे अज्ञात कारणावरून एकाचा खून

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २५ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड येथे अज्ञात कारणावरून एकाचा खून करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आला नाही. ही घटना संजवाड येथे २० नोव्हेंबर रोजी घडला असून चंद्रकांत विठ्ठल व्हनमाने (वय ४५) असे त्याचे नाव आहे.

मयताच्या गळ्यावर तीन ठिकाणी काताडे निघालेल्या जखमा, दोन्ही हातांच्या मनगटावरील काताडे निघालेल्या जखमा व उजव्या पायाच्या गुडघ्याजवळ खरचटलेले जखम पाहता सदर मयतास कोणत्यातरी




अज्ञात कारणावरून अज्ञात इसमाने गळा दाबून जीवे ठार मारले आहे म्हणून अज्ञात इसमाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खुनातील आरोपी फरारी असून तपास सुरू आहे. मारूती आमसिद्ध व्हनमाने (वय ३०, रा. संजवाड) यांनी खबर देताच पोलीस उपनिरीक्षक राजू डांगे यांनी फिर्याद दिली असून सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार तपास करीत आहेत.

# थकीत मिळकतकर वसुलीसाठी १४ डिसेंबरला लोक अदालत

## महापालिकेकडून २३ हजार मिळकतदारांना नोटिसा पाठवण्याची कार्यवाही सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीची लगबग संपताच महापालिका प्रशासनाने थकीत मिळकतकर वसुलीसाठी कंबर कसली आहे. हा कर प्रभावीपणे वसूल होण्यासाठी दिं. १४ डिसेंबर रोजी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी नोटिसा देण्याचे काम सुरू झाल्याची माहिती महापालिका कर संकलन व आकारणी विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांनी दिली.

महापालिकेचा मिळकतकर मोठ्या प्रमाणात थकीत आहे. त्याच्या वसुलीसाठी यापूर्वीच्या धोरणानुसार थकीत मिळकतदारांचे नळ कनेक्शन तोडणे, मालमत्ता सील करणे आदी स्वरूपाची कारवाई केली जात होती. खुल्या जमिनीबाबत लाखाहून अधिक रक्कम थकीत ठेवणाऱ्यांच्या मालमत्ता जप्त करून त्यांचा



लिलाव करण्याची कटू कारवाई देखील काही वर्षांपूर्वी करण्यात आली होती. यंदाच्या वर्षी मात्र महापालिकेने थकीत मिळकतकर प्रभावीपणे वसूल करण्यासाठी लोकअदालतीचा पर्याय निवडला आहे. काही महिन्यांपूर्वी महापालिकेतर्फे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यासंदर्भातील माहिती मिळकतदारांपर्यंत न पोहोचल्याने या लोकअदालतीला थंडा प्रतिसाद मिळाला होता. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होताच महापालिका प्रशासनाने आपला मोर्चा पुन्हा एकदा थकीत मिळकतकर वसूलीकडे वळविला आहे.

महापालिका प्रशासनाने थकीत मिळकतदारांना दिलासा मिळावा यासाठी १४ डिसेंबर रोजी लोकअदालतीचे आयोजन केले आहे. २५ हजारापेक्षा जास्त कर थकीत ठेवणाऱ्या सुमारे २३ हजार मिळकतदारांना लोक अदालतीच्या नोटीसा देण्याचे काम महापालिका प्रशासनातर्फे सुरू करण्यात आले आहे. या लोकदालतीचा थकीत मिळकतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कर संकलन व आकारणी विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांनी केले.



सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये साईश्वर गुटुंकचे १० कि.मी. अंतर ४० मिनिटात पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

गुजरातमधील अहमदाबाद येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय अदानी अहमदाबाद मॅरेथॉन स्पर्धेत सर्वात कमी वयाचा राष्ट्रीय धावपटू साईश्वर केशव गुंटूक याने १० किमी अंतर कमी वेळेत म्हणजेच ४०.२७ मिनिटात पूर्ण करत स्वतःचाच विक्रम मोडीत काढला.

जुळे सोलापुरातील स्वामी विवेकानंद प्रशालेत नववीतील साईश्वरला सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा शिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. साईश्वरचे एशियन चॅम्पियन गोल्ड मेडलिस्ट डॉ. सुनीता गोध्रा यांनी मेडल व प्रमाणपत्र प्रदान केले. ही स्पर्धा साबरमती रिव्हरफ्रँट येथून सकाळी ६ वाजून ४५ मिनिटाने सुरुवात झाली. या स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू मिताली राज व जागतिक बुद्धिबळपटू प्रज्ञानंद यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भारतीय हवाई दल, नौदल व भूदल या तिन्ही क्षेत्रातून साईश्वरचे कौतुक केले.






दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860


# विधानसभेनंतर सोलापूर बाजार समितीचा महामुकाबला

## स्थगितीनंतर जानेवारीत होणार निवडणुकीची धामधूम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र राज्यातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी आर्थिक उलाढाल असलेल्या श्री सिद्धेश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या प्रक्रियेला नव्या वर्षात सुरुवात होईल. राज्य सरकारने ३१ डिसेंबर पर्यंत निवडणूक प्रक्रियेला स्थगिती दिली आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीमुळे इतर सर्व निवडणुकांना स्थगिती देण्यात आले होती. परंतु आता विधानसभेची धामधूम संपली आहे. त्यामुळे जानेवारी २०२५ पासून बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया पुन्हा सुरू होईल. या निवडणुकीत देखील महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा महामुकाबला दिसून येईल.

दरम्यान राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने ७ ऑक्टोबर पासून सोलापूर आणि बार्शी बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू केली होती दहा नोव्हेंबरला मतदान होणार होते परंतु विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने या निवडणुकीला स्थगिती दिली ७ ते ११ ऑक्टोबर पर्यंत याकालावधीत नामनिर्देशनाची प्रक्रिया होती सात ऑक्टोबर रोजी तब्बल दोनशे जणांनी उमेदवारी अर्ज घेतले होते. निवडणूक कार्यक्रम स्थगित करताना ज्या टप्प्यावर प्रक्रिया थांबली, तिथून पुढे प्रक्रिया सुरू होणार आहे. असे यावेळी सांगण्यात आले.

### माने आणि हसापुरे यांचा लागणार कस




दक्षिण व उत्तर सोलापूर या दोन तालुक्यातील बाजार समितीचे कार्यक्षेत्र आहे सुमारे पाच हजार मतदार आहेत. दोन्ही तालुक्यातील सोसायट्यांवर माजी आमदार दिलीप माने व सुरेश आशापुरे यांचे वर्चस्व असून, राज्यात महायुतीचे सरकार आल्याने बाजार समितीत सत्ता कायम ठेवण्यासाठी या दोघांवर निवडणुकीचा कस लागणार आहे.

### १७ जागांसाठी मतदान



बाजार समितीचे एक जानेवारी रोजी निवडणुकीची स्थगिती उठणार आहे. त्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात प्रक्रियेला सुरुवात होईल. फेब्रुवारी महिन्यात १७ जागांसाठी मतदान असल्याची माहिती राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी दिली.



● शहरात कचऱ्याचे ढीग

**सोलापूर : शहरात मध्यवर्ती भागात सरार्स कचऱ्याचे ढिग दिसुन येते आहेत. शिंदे चौकातील इंदिरा कन्या प्रशालेच्या मागे असे चित्र आहे. प्रशासन ढिम आहे का?, अशी नागरिकात चर्चा सुरू आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)**

## जुना पुना नाका येथे अपघात; चालकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

जुना पुना नाका येथील अपघात प्रकरणी आयशर वाहन क्रमांक एमएच ४८ सीबी ८८८० च्या चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी रोहित योगेश काळे (वय २२, रा. खाजामीन दर्गा, जि. विजापूर, राज्य कर्नाटक, सध्या रा. संतोष नगर, बाळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलीस ठाण्यात आयशर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रोहित काळे व त्याच्यासोबत काम करणारे मारुती काळे असे दोघे त्यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ ईएन ०७९३ यावरून जुना पुना नाका येथील बाळे ब्रिज वरून जात असताना आयशर वाहन क्रमांक एमएच ४८ सीबी ८८८० च्या चालकाने काळे यांच्या दुचाकीला कट मारल्याने त्याच्यासोबत काम करणारे मारुती काळेच्या डोक्याला मार लागला आहे व तसेच डाव्या हाताच्या हाड मोडले आहे. या अपघातात आयशर चालक याने गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत ठरला आहे म्हणून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### थांबलेल्या चारचाकीला धडकून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

रस्त्याच्या कडेला थांबलेल्या चारचाकी वाहनाला धडकून दुचाकीस्वार जखमी झाला. कन्हैय्यालाल भंवरलाल प्रजापती (वय ३३, रा. आदर्श नगर, दहिटणे) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव असून त्याच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास कन्हैय्यालाल प्रजापती हे सदर बझार चौकी मार्गे रंगभवन चौकाकडे दुचाकीवरून जात होते. त्यावेळी अश्वीनी हॉस्पीटलच्या पुढे गणपती मंदीराजवळ बाजूला थांबलेल्या चार चाकी वाहनास प्रजापती याने दुचाकीची जोरदार धडक दिली. यामध्ये प्रजापती हा गंभीर जखमी झाल्याने त्याला मदतनीस वैभव गायकवाड यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




### अज्ञात कारणावरून विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

अज्ञात कारणावरून विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. आलिया जावेद शेख (वय २३, रा. पोगुल मळा, रामवाडी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआकाराच्या सुमारास राहत्या घरातील बेडरूममधील पंख्याच्या अँगलला आलिया शेख या विवाहितेने अज्ञात कारणावरून साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर घरातील नातेवाईकांनी आलियाला खाली उतरवून दीर साहिल सय्यद याने शासकीय रुग्णालयात बेशुध्दावस्थेत दाखल केले. त्यावेळी डॉ. शितलकुमार जळकोटी यांनी आलियाला मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती वादातून तरूणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

घरगुती वादातून तरूणीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. पुजा संजय राठोड (वय १७, रा. दुधनी, शिवाजी नगर, ता. अक्कलकोट) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरूणीचे नाव आहे. २४ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घरगुती वादातून पुजा राठोड या तरूणीने राहत्या घरात विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे तीला त्रास होऊ लागल्यानंतर भाऊ गौरव राठोड याने पुजाला सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### साप चावल्याने दोघेजण अत्यवस्थ

**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

साप चावल्यानो दोघे ऊसतोड कामगार अत्यवस्थ झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रामसिंग बाबूलाल चतुर (वय ३२, रा. पानखल्या, ता. धरणी, जि. अमरावती), करण रामसिंग जावरकर (वय ३०, रा. अमरावती) अशी उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. २४ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास किणी (ता. अक्कलकोट) येथे राजू आगरतडे यांच्या शेतात ऊसतोडीचे काम करीत असताना करण जावरकर याच्या डाव्या पायास साप चावला. त्यावेळी रामसिंग चतुर याने करण याच्या पायास साप चावलेल्या ठिकाणावरून तोंडाने विष बाहेर काढून टाकत असताना दोघांनाही चक्कर येऊ लागल्याने दोघांनाही उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## मंत्रीपदासाठी आमदारांनी कसली कंबर

### भाजप शहराध्यक्ष काळे यांनी केली दोन मंत्रिपदाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

राज्यात लाडक्या बहिणींची लाट आल्याने महायुती सरकारला ना भूतो न: भविष्यती असे यश संपादन करता आले आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात देखील सर्वत्र कमळ फुलले असून, शहराच्या उत्तर, मध्य आणि दक्षिण यातीनही मतदार संघात भाजपचा एक हाती विजय झालेला आहे. घवघवीत यश संपादन करत भाजपने शहर जिल्ह्यातील आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. निकाल घोषित झाल्यानंतर आता सत्तास्थापनेसह मंत्रीपदाची चाहूल अनेक आमदारांना लागलेली आहे. त्यामुळे शहर जिल्ह्यातील अनेक आमदार मंत्रीपदाच्या रेसमध्ये आलेले दिसत आहेत. सोलापूर शहर जिल्ह्यातून दोन मंत्री पदे मिळावीत, यासाठी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी पक्षापुढे मागणी केली आहे.

दरम्यान मंत्रीपद मिळण्यासाठी आमदार आपापल्या गॉडफादरकडे फिल्डिंग लावत आहेत. शहर मध्यमध्ये देवेंद्र कोठे यांनी पहिल्याच प्रयत्नात शहर मध्य काबीज करत काँग्रेसच्या बालेकिल्लाला सुरुंग लावलेला आहे. शहर उत्तरमध्ये माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांनी पाचव्यांदा विजयश्री तर दक्षिणमध्ये हॅट्रिक साधत सुभाष देशमुख यांनी विरोधकांना चित केले आहे. समाधान आवताडे यांनी देखील आपला मंगळवेढा पंढरपूर हा गड कायम ठेवला आहे. त्यामुळे नेमकी दोन मंत्रिपदे प्राप्त झाल्यानंतर मंत्रिपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार हे पाहणे देखील औत्सुक्याचे ठरणार आहे.



### यांची मंत्रिपदावर वर्णी?

आगामी महापालिका निवडणूक लक्षात घेता, पाचव्यांदा निवडून आलेले विजयकुमार देशमुख यांचे नाव पुढे येत आहे. सुभाष देशमुख यांनी सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून येण्याचा विक्रम केला आहे. तसेच मराठा समाजाचा आश्वासक चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी दुसऱ्यांदा निवडून आले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची देखील मंत्रिपदावर वर्णी लागू शकते.

## घनकचरा वर्गीकरणासाठी प्रत्येक घर, आस्थापनावर लावणार क्यूआर कोड

### माहिती थेट महापालिकेच्या डॅशबोर्डवर दिसणार

### नव्या प्रणालीचा महापालिकेत केला शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ नोव्हेंबर -**

घनकचरा वर्गीकरणासाठी आता शासनाच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रात क्यूआर कोड पद्धतीची नवी नियंत्रण प्रणाली राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शहरातील प्रत्येक घर, व्यवसायिक आस्थापनासह सर्व मिळकतींवर क्यूआर कोड लावण्यात येणार आहेत. या प्रणालीचा शुभारंभ महापालिका आवारात करण्यात आला आहे.

घनकचरा व्यवस्थापनामध्ये सुधारणा करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेच्या कामांच्या परिणामकारक व्यवस्थापनाकरीता राज्यातील ड वर्ग महानगरपालिका तसेच सर्व नगर परिषद नगर पंचायतमध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीचा आयसीटी बेस्ड वापर आवश्यक असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. केंद्र शासनाच्या आयटीआय लिमिटेड कंपनीमार्फत एक नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. या अंतर्गत शहरातील प्रत्येक मालमत्तेवर एक विशिष्ट प्रकारचे क्यूआर कोड, ओला व सुका कचरा डब्यांवर दोन क्यूआर कोड या कंपनी मार्फत लावण्यात येणार आहे. तसेच या सोबत क्यूआर कोड लावण्याबरोबरच नागरिकांना कचरा वर्गीकरणबाबत माहितीचे पॅम्प्लेट सुद्धा देण्यात येणार आहे. या प्रणालीमध्ये विविध पद्धतीने नियंत्रण ठेवण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. त्याच सोबत शहरातील झाडण्याची नियंत्रण प्रणाली व लिक्विड वेस्टचे स्वच्छता नियंत्रण प्रणाली सुद्धा या प्रणालीमध्ये समावेश करण्यात येणार आहे. यामुळे दैनंदिन करण्यात येणाऱ्या कचरा संकलनामध्ये सुधारणा करण्यास मदत होऊ शकणार आहे. या नव्या प्रणालीचा शुभारंभ महापालिका प्रशासकीय इमारतीच्या समोरील बाजूस पहिले क्यूआर कोड लावून करण्यात आला.

### नागरिकांसाठी मोफत सुविधा

या प्रणाली व तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्याकरिता महापालिकेस स्वनिधीतून एकही पैसा कंपनीस द्यावयाचा नाही.याचा संपूर्ण खर्च शासनामार्फत देण्यात येणार आहे. ही सुविधा नागरिकांकरिता निशुल्क आहे. क्यूआर कोड लावणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यास नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी केले आहे.

### अशी आहे नवी नियंत्रण प्रणाली

घंटागाडीतून दैनंदिन कचरा संकलन करणारे कर्मचारी घरातून अथवा व्यावसायिक आस्थापनेमधून कचरा संकलन केल्यानंतर या क्यूआर कोडला स्कॅन करतील व या कंपनीने महानगरपालिकेस देण्यात आलेल्या डॅशबोर्डवर ऑनलाइन पद्धतीने याची नोंद घेण्यात येईल. या नोंदीमुळे शहरातून किती घरांमधून अथवा व्यावसायिक आस्थापनांमधून कचरा संकलन केला जात आहे व ते वर्गीकृत पद्धतीचा आहे किंवा कसे याची अद्यावत माहिती थेट महापालिकेच्या डॅशबोर्डवर दिसणार आहे.

# आदिनाथ जिनबिंब पंचकल्याणक महामहोत्सवास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

बुधवार पेठ बाळीवेस येतील गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान जैन बोर्डिंग येथे परमपूज्य आचार्य विशुद्ध सागर व विभव सागर महाराजांच्या प्रेरणेने परमपूज्य मुनिश्री १०८ विभास्वर सागर, सौम्य सागर, सारस्वत सागर, शुद्धपयोग सागर, जयंत सागर शुल्लक श्री १०५ श्रुत सागर महाराज यांच्या पावन सानिध्यात तसेच मार्गदर्शनाखाली पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सवास सोमवारी सुरवात झाली.

जैन धर्मीयांच्या पाच दिवसाच्या या महामहोत्सवात प्रथम दिवशी गर्भ कल्यानकाने सुरुवात झाली. पहाटे सहा वाजता जिन आज्ञा, गुरु आज्ञा, घटयात्रा, शोभायात्रा, ध्वजारोहण, आयोध्या नगरीचे उद्घाटन, मंडप शुद्धी, मंडलवेदी शुद्धी, श्री जिंका अभिषेक, मंगलाचरण, चित्र अनावरण, दीप प्रज्वलन, पादप्रक्षालन आणि मुनिश्री यांचे मंगल आशीर्वाद आदी विधिवत कार्यक्रम पार पडले. दुपारी अंगण्यास सकलीकरण, इंद्रप्रतिष्ठा, मंडल प्रतिष्ठा, जप्यानुष्ठान, अंकुरारोपण, यागमंडल विधान, अर्चना आरंभ इत्यादी कार्यक्रम झाले. दुपारी मुनिश्री यांचे मंगल प्रवचन झाले. सायंकाळी श्रीजी यांची महाआरती, शस्त्रसभा, सौ धर्मसभा, तत्व चर्चा, कुबेर द्वारा अयोध्या नगरी रचना, रत्नवृष्टी, माताजी यांची सेवा, स्वप्नदर्शना फल, अष्टकुमारीद्वारा माताचे स्नान, मंगल शृंगार, आरती, ५६ कुमारी द्वारा दिव्य भेट आणि गर्भ कल्याण अंतरीक क्रिया पार पडली. श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट शुक्रवार पेठ येथील उंच शिखरातील भगवान आदिनाथ, भगवान मल्लिनाथ, भगवान वासुपुज्य, भगवान नेमिनाथ, भगवान पारसनाथ, आणि भगवान महावीर इत्यादी मूर्तींवर गर्भ कल्याण संस्कार करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठाचार्य बालब्रह्मचारी पियुष भैया जी सतना तसेच संगीतकार संजय रंगीला पार्टी भोपाळ आणि स्थानिक विद्वान पंडित अनिल जैन, पवन भैया, अभिषेक, राजकुमार आळंदकर, महावीर शास्त्री, विक्रांत शाह, प्रशांत मोहरे, विजय काळेगोरे अनंत बेळे, रवींद्र काळे उपस्थित होते ध्वजारोहणावेळी स्मित शहा, माता-पिता धनश्री वीरधवल मेहता, सौधर्म इंद्र नूतन गांधी, कुबेर इंद्र संतोष शहा, महानायक राजकुमार दोशी, यज्ञ नायक अनिल गांधी, ईशान इंद्र शशांक शहा, सनतकुमार इंद्र पदम कुमार मेहता, मंडप उद्घाटक धन्यकुमार शहा, महेंद्र इंद्र सागर चंकेश्वर, चक्रवर्ती भरत अभिषेक गांधी, बहुबली प्रशांत मेहता, राजा श्रेयांस आदर्श मेहता, मंगल कलश शशिकांत मोहरे, ब्रह्म इंद्र अरुण गांधी, ब्रह्मोत्तर इंद्र प्रशांत मेहता, महा शुक्र इंद्र ईशान नितीन गांधी, शुक्र इंद्र साहिल अजित शहा, शतार इंद्र चेतन वनकुद्रे, महामंडलेश्वर रमेश वनकुद्रे, सुवर्ण सौभाग्यवती संहिता शहा, प्रशाली दोषी, मनाली शहा, तसेच अष्ट कुमारी लोकांकिक देव सामील आहेत. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष सुनील गांधी, डॉ. रणजीत गांधी पंचकल्याण अध्यक्ष श्री संजय गांधी, संजय शहा, अजित शहा याचबरोबर सर्व समिती प्रमुख व जैन समाज उपस्थित होता.



### शोभायात्रेमध्ये दोन हत्ती

शोभायात्रेमध्ये केरळ बँड, दोन हत्ती, घोडे तसेच सवाद्य मिरवणूक विलोभनीय होती. हा कार्यक्रम गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान जैन बोर्डिंग बुधवार पेठ येथे क्रीडांगणावर सुरु आहे. भव्य मंडप, उंच स्टेज, पांडू शीला, ध्वजारोहण, चौक्याची व्यवस्था तसेच भोजन हिराचंद नेमचंद धर्मशाळा श्राविकाश्रम समोर केली आहे. पार्किंगची व्यवस्था नीला नगर आणि गोविंदजी रावजी आयुर्वेद कॉलेज श्री कोचर यांचे पटांगण येथे केली आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५५

**किंबहूना देवें । विश्व विस्तारिलें आहे आघवें ।**
**अनंतरुपा वानावें । कवणें तूतें ।।**

अर्जुन अतिशय जिज्ञासू आहे. युध्द करण्याच्या निमित्ताने युध्दभूमीवर तो आला आहे. समोर लढणारे दुसरे-तिसरे कोणी नसून आपले सगे सोयरेच आहेत हे पाहून तो मोहग्रस्त झाला आहे. पण त्याचे वैशिष्ट असे आहे की, या मोहग्रस्त अवस्थेत तो महत्वपूर्ण प्रश्न, शंका भगवंतांना विचारीत आहे. एखादाही तो चुकीचा प्रश्न करीत नाही. मोहग्रहस्त अवस्थेतील त्याचे प्रश्न भगवंतालाही आवडत आहेत. हे विश्व काय आहे? सत्य म्हणजे नेमके काय? असे अनेक प्रश्न तो विचारुन आपणाला पाहिजे तेवढे ज्ञान भगवंताकडून प्राप्त करीत आहे. आपणही आपल्या संसारात मोहग्रस्त झालेलो आहोत, पण आपण कधी असे प्रश्न कोणाला विचारत नाही. आपला संसार आणखी कसा फळाफुलाला येईल या बाबत आपले प्रश्न असतात.



अर्जुनात आणि आपल्यात हाच मोठा फरक आहे. आपली मानसिक तयारी असेल तर ज्ञान कोठेही मिळवू शकतो, हे अर्जुनाने युध्दभूमीवर दाखवून दिले आहे.

आपणाला पाहिजे तसे व पाहिजे तेवढे ज्ञान मिळविल्यानंतरही आपण ज्ञानाने पूर्णत: समाधानी झालो असे म्हटले तर भगवंताकडील आणखी वेगळे ज्ञान मिळणार नाही, अशी शंका अर्जुनाला वाटते. ज्याला ज्ञान मिळविण्याची इच्छा आहे, त्याने खरोखरच अर्जुनाच्या भूमिकेत यावे, असे मला वाटते. आपल्याप्रमाणे अर्जुनही ईश्वराला विशिष्ट अशा ठिकाणी पाहत होता, त्याच्या पूजा-पाठात तो तल्लीन होता. त्याच्या इच्छेप्रमाणे जेव्हा त्याला विश्वरुपदर्शन झाले, तेव्हा मात्र ईश्वराबद्लची त्याची कल्पना बदलली. तो कल्पनेतून वास्तवतेत आला. आता त्याला ईश्वर नाही असे स्थान दिसत नव्हते. प्रत्येक प्राणीमात्र चराचर ईश्वरच आहे, असे त्याला दिसू लागले. म्हणून तो भगवंतांना म्हणाला,

**किंबहूना देवे । विश्व विस्तारिले आहे आघवें।**
**अनंतरुपा वानावे । कवणें तूतें ।।**

अर्थात, देवा तुझ्याने सर्व विश्व विस्तारले गेले आहे. तुझ्या विश्वरुपात सर्वांचा समावेश आहे. तुझी अनंत रुपे आहेत, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. या अनंत रुपात सर्व प्राणीमात्रांचा समावेश आहे. हे सर्व प्राणीमात्र म्हणजेच तू असल्याने, तूला विशिष्ट आकारात, रंगात, रुपात पाहणे चुकीचे आहे. या प्राणीम त्रांची सेवा म्हणजे तुझी सेवा आहे. अर्जुनाच्या या विचारातून आपणालाही काही घ्यावे लागणार आहे. ईश्वर म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून तुम्ही-आम्हीच ईश्वर आहोत. आपण एकमेकांना सहकार्य करणे, मार्गदर्शन करणे, एकमेकांच्या अडीअडचणी सोडविणे म्हणजेच ईश्वर सेवा होय. आपण सर्वजण जर अर्जुनाच्या विचाराशी सहमत होऊन वागू लागलो तर जगातील, समाजातील, कुटूंबातील अनेक समस्या आपोआप मिटू लागतील. समस्या मिटणे म्हणजे सुख,समाधानाचे आगमन होणे होय. सुख, समाधानाच्या आगमनासाठी आपण अर्जुनाचे हे विचार आत्मसात करु या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : मंगळवार** | **दिनविशेष -** |
| **दि. २६ नोव्हेंबर २०२४** | **उत्पत्ती एकादशी** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **आळंदी व निर्मळ यात्रा.** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - कार्तिक** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. एकादशी (२७.४७)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - हस्त (२८.३३)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - प्रीती (१४.१२)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - बव(१४.२४)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी

**वृषभ :** आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन :** नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू

**कर्क :** व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

**सिंह :**व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**कन्या :** पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठा व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक :** प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल.

**धनु :** कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**मकर :** आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ :** आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन :** आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

# धर्म, विज्ञानाच्या समन्वयातूनच विश्वशांती नांदेल

## आध्यात्मिक गुरु पं. विजयशंकर मेहता; एमआयटी डब्ल्यूपीयूत २९ वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**पुणे, दि.२५ नोव्हेंबर-**

''धर्म आणि विज्ञान यांचा समन्वय घरा घरात झाला तर प्रत्येकाला शांतीचा अनुभव घेता येऊ शकतो. हेच सूत्र समाजासाठी लागू झाल्याने विश्वशांती निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. तसेच प्रत्येकाने चेहऱ्यावर हास्य ठेवणे या क्रांतिकारी प्रयोगामुळे ही जीवनात शांतीचा अनुभव येतो. प्रत्येकाने संकल्प करावा की घरामध्ये प्रवेश करतांना चेहऱ्यावर हास्य ठेवावे.'' असे विचार उज्जैन येथील आध्यात्मिक गुरू व लेखक पंडित विजयशंकर मेहता यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि संतश्री ज्ञानेश्वर-संतश्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यम ाने युनेस्को अध्यासना अंतर्गत २४ ते ३० नोव्हेंबर या कालावधित आयोजित २९वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या संतश्री ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड, पुणे येथे झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या प्रसंगी संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प.श्री. योगीराज महाराज गोसावी पैठणकर हे प्रमुख पाहुणे म्हणून होते. तसेच जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर हे सन्माननीय पाहुणे होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. तसेच एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस व २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे समन्वयक व प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे उपस्थित होते.



पंडित विजयशंकर मेहता म्हणाले, ''संतती, संपत्ती, संबंध आणि दुर्बल आरोग्य या चार मार्गाने जीवनात अशांती येते. अशा वेळेस शांतीसाठी जीवनाला चार टप्प्यांमध्ये विभाजीत करावे. व्यावसायिक जीवनात निष्काम राहणारे, सामाजिक जीवनात वचन बद्धतेचे पालन करणे, कुटुंबाला प्राथमिकता देणे आणि स्वत:ला शांत ठेवावे. यामुळे कुटुंबात, समाजात आणि संपूर्ण विश्वात शांती नांदेल. हभप योगीराज महाराज गोसावी पैठणकर म्हणाले,'' भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ असून जगाला वारकरी संप्रदायाने शांतीचा मार्ग दाखविला आहे. आजच्या युगामध्ये अध्यात्म आणि विज्ञानाची वेगळी परिभाषा करणे योग्य नाही. आत्म स्वरूपाचा विचार करणे हे अध्यात्म असून ते सर्व धर्मात आहे. खर पाहता विश्वाला शांतीची गरज आहे आणि ती विज्ञानातून मिळेल. मनुष्याने ज्ञानाचा योग्य वापर केल्यास ते शक्य आहे. ज्ञान हे आंतरिक विचार करतो त्यासाठी रोज संतांचे वाङ्मय वाचावे.'' डॉ. विजय भटकर म्हणाले,'' वर्तमान काळात मानवाने विज्ञानाच्या आधारे सर्व गोष्टी साध्य केल्यात परंतू जीवनात सुख आणि शांती नाही. यासाठी आध्यात्मिक व आत्मज्ञान आवश्यक आहे. सत्याची परिभाषा ओळखणे गरजेचे आहे.''

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, ''तत्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर म ाऊली व जगदगुरू तुकाराम महाराज यांचा संदेश मानवजातीपर्यंत पोहचविण्याच्या मुख्य उद्देश्याने ही व्याख्यानमाल सुरू केली आहे. येथे सद्गुणांची पूजा हीच खरी ईश्वरसेवा पूजा आहे. मन आणि आत्मा या गोष्टींचे अधिक चिंतन व्हावे. जीवनाचा हेतू व कर्तव्य काय आहे याची जाणिव यातून होते. ''

डॉ. मंगेश तु. कराड म्हणाले,''धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे जीवनात सर्वात महत्वाचे असून त्याचे पालन करावे. देशाचा विकास पाहता भारत तीसरी आर्थीक व्यवस्था म्हणून उदयास येत आहे. अशा वेळेस हा देश भविष्यात जगाचे नेतृत्व करेल आणि विश्वगुरू बनेल.''

डॉ. आर.एम.चिटणीस यांनी स्वागत पर भाषण व प्रस्तावना मांडली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मिलिंद पात्रे यांनी केले.

# उच्च न्यायालय व खंडपीठांचे दोन दिवसीय लोकअदालतीचे आयोजन

## पक्षकारांना आभासी पध्दतीने सहभाग नोंदविता येणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे येत्या ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष लोकअदालतमध्ये पक्षकार प्रत्यक्ष वा आभासी पध्दतीने सहभागी होवू शकतात.

याा विशेष लोकअदालतीमध्ये मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबादा व नागपूर खंडपीठ येथील प्रलंबित प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. सोलापूर जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे याठिकाणी प्रलंबित आहेत व ती तडजोडीने मिटविण्याची ज्यांची इच्छा असेल ती प्रकरणे सदर लोकअदालतमध्ये ठेवता येतील.

या विशेष लोकअदालतमध्ये पक्षकार प्रत्यक्ष वा आभासी पध्दतीने सहभागी होवू शकतात. पक्षकारांनी उच्च न्यायालयाच्या विशेष लोकदालतमध्ये प्रकरणे ठेवण्यासाठी वकीलांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर अथवा तालुका विधी सेवा समिती, अक्कलकोट यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समि तीचे अध्यक्ष तथा अक्कलकोटचे न्यायाधीश मुकुल एम. कल्याणकर यांनी केले आहे.



**सोलापूर : सातरस्ता परिसरात महापालिका बस डेपोच्या जागेत पेट्रोल पंप उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# जेलरोड पोलीस ठाण्याच्या आवारात पतीने-पत्नीला बेदम ठोकले

## महिला सहाय्यक पोलीस निरीक्षकाला धक्काबुक्की करून दिली धमकी

## कारभारीचा पोलीस ठाण्यात कारभार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

पतीविरुद्ध तक्रार देण्यासाठी आलेल्या पत्नीला पतीने जेलरोड पोलीस ठाण्याच्या आवारात बेदम मारहाण केली. त्यावेळी भांडण सोडविण्यासाठी आलेल्या महिला सहायक पोलिस निरीक्षकांना पतीने धक्काबुक्की करून धमकी देऊन सरकारी कामात अडथळा निर्माण केला. म्हणून पतीविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना २४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्योत्सना भांबिष्टे (नेमणूक - जेलरोड पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कुदरत खाजाभाई कारभारी (रा. सोलापूर) याच्याविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. २४ नोव्हेंबर रोजी साडेआकराच्या सुमारास जेलरोड पोलिस ठाण्यात महिला सहायक पोलिस निरीक्षक ज्योत्सना भांबिष्टे या सरकारी काम करीत असताना कुदरत कारभारी याची पत्नी अनिसा कुदरत कारभारी ही तक्रार देण्यासाठी आली होती. त्यावेळी कुदरत कारभारी याने पोलीस ठाण्याच्या आवारात त्याची पत्नी अनिसा हिस शिवीगाळ करून बुक्क्यांनी मारत खाली पाडले. त्यानंतर तिच्या तोंडावर पाय ठेवून तोंड दाबू लागला.त्यावेळी महिला सहायक पोलिस निरीक्षक ज्योत्सना भांबिष्टे यांनी बळाचा वापर करून त्या दोघांना सोडवत असताना कारभारी यांनी महिला पोलिस अधिकाऱ्याच्या अंगावर येऊन धक्काबुक्की करून, तुम्ही ड्रेस काढून बाहेर या तुम्हाला दाखवतो असे म्हणून धमकी दिली.

त्यामुळे याबाबत महिला पोलिस अधिकाऱ्याला शासकीय कामापासून प्रवृत्त करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी कारभारीविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जाधव हे करीत आहेत.

# घरगुती कारणावरून विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर -**

घरगुती कारणावरून विवाहितेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. काजल भगवान केंगार (वय १९, रा. मुस्ती, ता. दक्षिण सोलापूर, सध्या रा. अशोक नगर, नविन आरटीओ ऑफिसजवळ, सोलापूर) असे आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास राहत्या घरी घरगुती कारणावरून रागाच्या भरात काजल हिने विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्यावर पती भगवान केंगार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## किरकोळ कारणावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर** -किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ नोव्हेंबर रोजी रात्री सात वाजण्याच्या सुम ारास शोभा देवी नगर नई जिंदगी येथे घडली.

याप्रकरणी इस्माईल फारुख उस्ताद (वय २६, रा. शोभादेवी नगर, नई जिंदगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उजेर दफेदार, अमन मेहबूब शेख, अबरार मंगलगिरी व फैजन उर्फ एफ के यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. इस्माईल उस्ताद यांची आई आयेशा या २३ नोव्हेंबरला नळाला पाणी भरत असताना तेथे उभे असलेले वरील संशयित आरोपी यांना इस्माईल हा बायका पाणी भरत आहे. तुम्ही येथे थांबू नका असे सांगत असताना अमन शेख याने तुला काय मस्ती आली आहे असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी इस्माईल व त्यांचा भाऊ इब्राहिम असे भांडण सोडवण्यासाठी गेले असता उजेर




दफेदार याने रस्त्यावर पडलेला दगड इस्माईलच्या कानावर मारून दुखापत केली व तसेच त्यांच्या आईला देखील दगडाने मारून जखमी केले. दरम्यान, अबरार व फैजन यांनी देखील भाऊ इब्राहिम याला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

## महिलेच्या पर्समधून ८२ हजारांचे दागिने लंपास

**सोलापूर** - रंगभवन येथे अक्कलकोट बस स्टॉपवर महिलेच्या पर्समधून ८२ हजार रुपयांचे दागिने चोरट्याने लंपास केले.

याबाबत वंदना बसवराज गुंदगे (वय ४०, रा. गुरूवार पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ नोव्हेंबर रोजी गुंदगे या रंगभवन चौकात अक्कलकोट बस स्टॉपवर असताना चोरट्याने त्यांच्या पर्सची चैन उघडून त्यातील एक तोळ्याचे सोन्याचे लहान मुलांच्या पाटल्या व एक तोळ्याचे चांदीचे वाळे असा एकूण ८२ हजार ८०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

## अज्ञात चोरट्याने घराजवळून दुचाकी पळवली

**सोलापूर** - राहत्या घराजवळ हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ एएम २८६१ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास शांतीनगर मजरेवाडी येथे घडली. याप्रकरणी रशीद उमरअली बागवान (वय ४८, रा. शांतीनगर, मजरेवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उबाळे हे करीत आहेत.

# आनंद, अक्षया बनसोडेंची बिजनेस आउटरिचच्या ४० अंडर ४० मध्ये निवड

## बिजनेस आउटरिच मॅगझिनमार्फत प्रेरणादायी उद्योजक जोडपे म्हणून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ नोव्हेंबर-**

भारताचे एव्हरेस्टवीर आणि उद्योजक आनंद बनसोडे आणि त्यांच्या पत्नी अक्षया बनसोडे यांची निवड बिझनेस आउटरिच मॅगझीन च्या प्रतिष्ठित ४० अंडर ४० यादीत झाली आहे. युवा उद्योजक कपल या विशेष गटातून त्यांची निवड झाली असून, साहसी पर्यटन आणि लाईफ ट्रान्सफॉरमेशनल टुरिझम क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीची ही मोठी दखल घेण्यात आली आहे.





आनंद बनसोडे यांनी २०१२ मध्ये माउंट एव्हरेस्ट सर केले व पाच पुस्तकेही लिहिली आहेत. २००६ पासून सोलापूरसारख्या सपाट भौगोलिक भागात गिर्यारोहण क्षेत्रात काहीतरी करून दाखवत जगभरातील शिखरे आनंदने सर केली आहेत. २०१६ मध्ये मणक्याच्या आजाराने आनंद आजारी असताना अक्षया बनसोडे यांनी कोणत्याही विधिशिवाय भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून विवाह केला. याच जोडप्याने २०१७ साली केलेली ३६० एक्सप्लोरर ही कंपनी आज जगभरात साहसी पर्यटनासाठी प्रसिद्ध झाली आहे म्हणूनच बिजनेस आउटरिच मॅगझिनने त्यांची निवड केली आहे.

**संकटांवर मात करून घडवले स्वप्नांचे जग**

वडिलांच्या मृत्यूनंतर आनंद यांना २०१५ मध्ये झालेल्या मणक्याच्या गंभीर दुखापतीमुळे डॉक्टरांनी चालण्यासही म नाई केली होती. अशा कठीण परिस्थितीत अक्षया यांनी आनंद यांना साथ दिली. साध्या सोहळ्यात त्यांनी विवाह केला. त्यांच्या जिद्दीमुळे २०१७ मध्ये आनंद पुन्हा गिर्यारोहणात परतले. साहसी पर्यटनाच्या क्षेत्रात त्यांच्या कार्याचा पाया अत्यंत साध्या परिस्थितीत घातला गेला. .

**साहसी पर्यटनातून लाईफ ट्रान्सफॉरमेशनल**

२०१७ साली आनंद आणि अक्षया यांनी मिळून ३६० एक्सप्लोरर या साहसी पर्यटन कंपनीची स्थापना केली. केवळ ५०० पासून सुरू झालेली ही कंपनी आता भारत, अमेरिका, कॅनडा आणि जगभरातील पाच खंडांमध्ये कार्यरत आहे. ७ वर्षांच्या वाटचालीत त्यांनी ७ ते ६५ वर्षांपर्यंतच्या गिर्यारोहकांना किलीमांजारो, एव्हरेस्ट, माउंट एल्ब्रूस यांसारख्या जगातील सर्वोच्च शिखरांवर चढाई करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. साहसी मोहिमा मर्यादित न ठेवता, त्या व्यक्तीच्या जीवनातील परिवर्तनासाठी उपयोगात आणण्याचे काम त्यांनी केले. २०२२ साली त्यांनी या संकल्पनेला आधुनिक स्वरूप देत साहसी पर्यटनासाठी टेक्नॉलॉजी वापर सुरू करत लाइफ ट्रान्सफॉर्मेशनल टुरिझम सुरु केले. त्यांच्या या अभिनव कल्पनेची दखल घेत सिलिकॉन व्हॅली, अमेरिका आणि कॅनडा येथील जगातील सर्वात मोठ्या स्टार्टअप एक्सलेरेशन प्रोग्राम्समध्ये जगभरातील इतर २० फाउंडरमध्ये आनंद व अक्षयाची निवड झाली होती.

बिजनेस आउटरिचच्या ४० अंडर ४०' मध्ये स्थान मिळणे हा आम्हा दोघांसाठी मोठा सन्मान आहे. हा सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. असे प्रत्येक जोडपे जे शून्यातून सर्व निर्माण करते अश्या जोडप्यांच्या संघर्षाला आम्ही हा सन्मान अर्पण करत आहोत. अजूनही पुढे खूप काही करायचे आहे त्याची ही सुरवात आहे.''

**-आनंद व अक्षया बनसोडे**

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## इस्मालवाडी येथे जीवे मारण्याची धमकी; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि. २५ नोव्हेंबर-**

तालुक्यातील इस्मालवाडी येथे मागील भांडणाची कूरपात काढुण एकास काठीणे मारहाण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, तालुक्यातील ईस्मालवाडी येथे २३ नोव्हेंबर रोजी फिर्यादी व त्यांचे वडील वलांडी येथील दूकानात असताना मागील भांडणाची कूरापत काढून मला धक्काबूक्की करून तूला खूप माज आलाय का असे म्हणून शिवीगाळ करून माझ्या अंगावर धावत येऊन काठीने उजव्या हातावर मूक्का मार दिला.आमचा आवाज ऐकून माझे वडिल सोडवण्यास आले असता त्यांना पण शिवीगाळ करू लागला. जर तूम्ही माझ्या नादाला लागलात तर तूम्हाला खतम करुन टाकतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली.

ओमप्रकाश शिवराज बसपुरे यांच्या फिर्यादीवरून दयानंद बाबूराव ऊर्फ ज्ञानोबा कवठाळे यांच्या विरोधात कलम बी एन एसच्या अंतर्गत ११५ (२) ३५२,३५१(२) प्रमाणे गून्हा दाखल करण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत 'राजमाता जिजामाता'चे यश

**लातूर, दि.२५ नोव्हेंबर-**

जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत राजमाता जिजामाता विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी कराटे स्पर्धेत घवघवीत यश मिळविले आहे. जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत राजमाता जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता १२वी कला शाखेतील विद्यार्थिनी वैष्णवी अनिल आवाड हिने १९ वर्षीय मुलींच्या ६४ किलो वजन गटातील कराटे स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला असून तिची नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच राजमाता जिजामाता विद्यालयातील इयत्ता १०वीचा विद्यार्थी भागवत अविनाश जाधव या विद्यार्थ्याने १७ वर्षीय वयोगटात जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत ७० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला. या खेळाडूंचे संस्थेच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन कौतुक करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, उपप्राचार्य कविता केंद्रे, राजेंद्र जायेभाये, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक अश्विनी केंद्रे, राजीव मुंढे, वैशाली केंद्रे, राणी केंद्रे, क्रीडा शिक्षक ए. बी. मुंडे, कराटे प्रशिक्षक देवानंद गुजर व प्रसाद कुलकर्णी, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, अविनाश जाधव, सुनीता जवळे आदी उपस्थित होते.




## लाडक्या बहिणींच्या आशीर्वादाचा विजय : आ. रमेश कराड

**लातूर, दि. २५ नोव्हेंबर-**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तब्बल वीस वर्ष मेहनत घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या कष्टाचा, धनशक्ती विरुद्ध जनशक्तीचा विजय आहे या विजयाला लाडक्या बहिणीचा मोठा आशीर्वाद मिळाला असल्याचे सांगून नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांनी लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना हा विजय समर्पित करतो अशी भावना व्यक्त केली. गेल्या वीस वर्षापासून गोरगरीब सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जनतेच्या न्याय हक्कासाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात सातत्याने संघर्ष केला संघर्षाच्या या लढाईत प्रत्येक वेळी कार्यकर्त्यांनी साथ दिली. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपाचे काम केले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात दोन वेळा पराभूत झालो असलो तरी कधीच निराश झालो नाही ज्या दिवशी पराभूत झालो त्या दिवसापासूनच त्या दिवसापासून पुन्हा त्याच जिद्दीने कामाला लागलो. सर्वसामान्यांच्या कार्यात कार्यरत राहिलो, गोरगरिबांना मदत केली, सुखदुःखात सहभागी झालो. आरोग्याची सेवा दिली अध्यात्मिक क्षेत्र टिकून राहावे यासाठी भजनाचे साहित्य वाटप केले या सगळ्या सामाजिक, आध्यात्मिक आणि राजकीय कामात सर्व सामान्य कार्यकर्त्यांनी मला वेळोवेळी साथ दिली. पक्षाने दिलेल्या आमदारकीचा उपयोग गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी केला असे सांगून रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या विधानसभा निवडणुकीत पराभवाच्या भीतीनेच भ्रष्ट पैशाच्या जोरावर मतदारसंघाला विकत घेण्याची पाप केले याची सर्वसामान्य मतदारांना मोठी चीड होती त्यामुळे ही निवडणूक मतदारांनीच हाती घेऊन माझ्या विजयाचा निर्धार केला होता. लातूर ग्रामीण मतदार संघातील निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती यांच्यातच अत्यंत चुरशीची लढत झाली यात जनशक्तीचा विजय झाला. आज पर्यंत केलेल्या कामामुळे गोरगरीब सर्वसामान्य मतदारांनी या निवडणुकीत साथ दिली राज्यातील महायुती शासनाने राबवलेल्या विविध कल्याणकारी योजनेच्या लाभार्थ्यांनी आशीर्वाद दिले. हा विजय खऱ्या अर्थाने लाडकी बहीणीचा आणि गेली २० वर्ष मेहनत घेतलेल्या कष्ट वेचलेल्या माझ्या सहकाऱ्यांचा, कार्यकर्त्यांचा आहे असे सांगून लोकनेते सूर्य गोपीनाथ मुंडे यांना माझा हा विजय समर्पित करतो अशी भावना आ. रमेश कराड यांनी व्यक्त केली.

## राघवेंद्र देबडवार यांना मराठवाडा गौरव पुरस्कार जाहीर

**लातूर, दि. २५ नोव्हेंबर-**



येथील देबडवार मल्टीसर्व्हिसेसचे संचालक राघवेंद्र बालाजी देबडवार यांना मराठवाडा गौरव पुरस्कार - २०२४ जाहीर झाला आहे. त्यांना हा पुरस्कार लघुउद्योग आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीत कार्य केले त्यासाठी प्रदान करण्यात येणार आहे. सदरील पुरस्कार भारतीय सिनेयुग प्रोडक्शन अकॅडमी, मुंबई. या संस्थेकडून मिळणार आहे. हा पुरस्कार वितरण दादर, मुंबई येथील सुप्रसिद्ध शिवाजी मंदिर नाट्यगृह येथे २९ नोव्हेंबर रोजी प्रदान होणार आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक अनिलकुमार शिंपी यांनी दिली आहे.

# लातूरच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणार

### माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि.२५ नोव्हेंबर-**

लातूर शहर मतदारसंघातील बहाद्दर मतदारांनी शहरात शांतता, सर्वधर्म समभाव सामाजिक सलोखा, विकासाला प्राधान्य देत चौथ्यांदा आमदार अमीत देशमुख यांना मतदारांनी निवडून दिले आहे जो विश्र्वास आमच्यावर लातूरकरांनी टाकलेला त्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही असे सांगून शहराच्या सर्वागीण विकासासाठी आम्ही सर्वजण आपल्या सर्वांना सोबत घेवुन आगामी काळात कार्य करणार असल्याची माहिती राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी बोलताना दिली आशियाना निवासस्थानी शहर व परिसरातील मान्यवरांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला त्यावेळीं ते बोलत होते.



लातूर शहर मतदार संघातून काँग्रेस आघाडीचे उमेदवार आमदार अमित देशमुख यांना आपण विश्वास ठेवून आशिर्वाद दिलेले आहेत तो विश्वास आम्ही सार्थ ठरवून विकासाच्या बाबतीत आम्ही कधीही मागे सरकणार नाही असे सांगून शहर मतदार संघातील मतदारांचे आभार व्यक्त केले तसेच राज्यभरात विधानसभा निवडणुकीत आलेले अनपेक्षित निकाल लागल्याचे दिसून येत असून जिल्ह्यातील निलंगा ,औसा अहमदपूर उदगीर व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पडलेली मते ही एक लाखापर्यंत असून त्यात लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील निकाल सुधा अनपेक्षित असून आमच्या महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठे परिश्रम घेतले होतें परंतु लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील आमदार धीरज देशमुख यांचा अगदी कमी मतांनी पराभव झाला आहे यासाठी आम्हीं निश्चितपने त्याचे चिंतन करू असे यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार अँड त्रिंबक भिसे, साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, अँड श्रीपतराव काकडे, युवा नेते दिशा प्रतिष्ठानचे संस्थापक अभिजित देशमुख, अशोक गोविंदपूरकर, शाम भोसले, सूर्यप्रकाश धूत, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, रिपाईचे नेते चंद्रकांत चिकटे प्रा. अनंत लांडगे, मोहन माने, गिरीश पाटील, सचिन पाटील, अँड. अतिश चिकटे,सुभाष घोडके, अहेमदखा पठाण, गोविंद पारीख, सुपर्ण जगताप विश्र्वास देशमुख, बबन देशमुख हरिराम कुलकर्णी, अँड. प्रवीण पाटील, संभाजी सुळ, दयानंद बिडवे, स्वयंप्रभा पाटील, अनुप शेळके राजकुमार पाटील, सचिन दाताळ, शामराव भोसले, सचिन पाटील, गणेश देशमुख, सुनिल देशमुख, विकास जोशी, प्रवीण पाठक, डॉ. पाटील, प्रमोद जोशी, रवींद्र पाटील, राजकुमार जाधव, मकबूल वलांडीकर हरिभाऊ गायकवाड, धनंजय शेळके जयेश कदम, चांदपाशा इनामदार, रामदास पवार, सतीश पाटील, युवराज पाटील, गोविंद पाटील पंडित कदम यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार उपस्थित होते.

# मतदारांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

### आमदार रमेश कराड : विजयानंतर कार्यकर्त्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. २५ नोव्हेंबर-**

काँग्रेसवाल्यांनी लातूर ग्रामीण मतदार संघात पैशाचा पाऊस पडला मात्र माझा गरीब स्वाभिमानी कार्यकर्ता विकला गेला नाही. बहाद्दर मतदारांनी भ्रष्ट पैशाची मस्ती जिरवली असून मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाला कदापी तडा जाऊ देणार नाही. यापुढील काळात सहकारी साखर कारखाने शेतकऱ्याच्या मालकीचे करायचे आहेत असे सांगून लातूर ग्रामीण एक विकासाचे मॉडेल मतदारसंघ निर्माण करू, अशी ग्वाही लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी दिली.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात नवे परिवर्तन घडून आले. वर्षानुवर्ष पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले. भाजपाचे नेते रमेशआप्पा कराड यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून विजय घोषित होताच भाजपासह महायुतीतील कार्यकर्त्यांनी, सर्वसामान्य नागरिकांनी आ. कराड यांच्या लातूर येथील कौशल्या या निवासस्थानी रमेश कराड यांचे अभिनंदन करण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. प्रत्येक जण पुष्पहार घालून पेढे भरवून अभिनंदन करत होते. ढोल ताशाच्या गजरात गुलालाची उधळण करत विजयाचा जल्लोष अनेक जण करत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रदीर्घ संघर्षानंतर आनंदाचे वातावरण दिसून येत होते. यावेळी निवासस्थाना बाहेर प्रचंड फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, फकीरा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रा संजय शिंदे, शिवाजी केंद्रे, भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, दशरथ सरवदे उपस्थित होते. आ. रमेश कराड म्हणाले की, गेल्या वीस - पंचवीस वर्षाच्या स्वप्नाची पूर्तता खऱ्या अर्थाने आज झाली असून लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मी भाजपाचे काम सुरू केले त्यांनी माझ्यावर लातूर ग्रामीण मतदार संघाची ज्या दिवशी जबाबदारी टाकली त्या दिवसापासून या मतदार संघाची सेवा करत आहे. वेळोवेळी स्वतःसाठी नव्हे तर गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या कल्याणासाठी प्रस्थापितांच्या विरोधात संघर्ष केला. मागील काळात दोन वेळा पराभूत झालो मात्र कधीच खचून गेलो नाही ज्या दिवशी पराभव झाला. दुसऱ्या दिवसापासून पुन्हा कामात राहिलो. भ्रष्ट पैशाच्या जोरावर गेल्या निवडणुकीत मतदार संघ विकत घेण्याची पाप केले नसते तर पाच वर्षापूर्वीच आपला विजय झाला असता असे सांगून आ. रमेश कराड म्हणाले की, या वेळची निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची लढाई होती मात्र जनतेने निवडणूक हातात घेतल्याने जनशक्तीचा विजय झाला. कार्यकर्त्यांच्या कष्टाचे फळ मिळाले आणि स्वाभिमानाची लढाई जिंकलो. या विजयामुळे आता कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढली असून नम्रपणे जनतेच्या कायम संपर्कात राहून कामे करावीत. या पुढील काळात ग्रामपंचायत, सोसाट्यासह सर्व विविध स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आपल्याला यश मिळवायचे आहे, सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे करावयाचे आहेत त्याचबरोबर महाराष्ट्रात लातूर ग्रामीण मतदार संघ एक विकासाचा मॉडेल निर्माण करण्यासाठी आपला प्रयत्न राहील असे आ. रमेश कराड यांनी बोलून दाखविले.




## 'वेताळेश्वर'च्या शिबिरात ६० जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२५ नोव्हेंबर-**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था लातूरचे सचिव वेताळेश्वर बावगे यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर कॉलेज ऑफ सायन्स, लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग (जी एन एम) लातूर कॉलेज ऑफ आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये ६० पेक्षा अधिक शिक्षक व विद्यार्थ्यांनी रक्तदान करून वाढदिवस साजरा केला.

संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, सौ माधुरी बावगे, प्राचार्य डॉ.श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्या सौ योगिता बावगे, क्षितिजा माळी, प्रा. शुभम वैरागकर आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिव साहेबांच्या पुढील आयुष्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्या.


# महायुतीचे बाबासाहेब पाटील यांची दुसऱ्यांदा मुसंडी

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २५ नोव्हेंबर-**

अहमदपूर चाकूर विधानसभे मध्ये महायुती चे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार बाबासाहेब पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या विनायकराव किशनराव जाधव यांच्यावर ३१ हजार ६६९ एवढ्या दणदणीत मताने विजय मिळवून या अहमदपूर विधानसभा मतदासंघात सलग दुसऱ्यांदा प्रचंड बहुमताने निवडून येण्याचा इतिहास घडवला. या मतदार संघात २० उमेदवार आपले भविष्य आजमावत असताना खरी लढत बाबासाहेब पाटील, विनायकराव पाटील व गणेशदादा हाके-पाटील यांच्यातच होती.

पहिल्या फेरीपासून ते सातव्या फेरीपर्यंत जन सुराज्य शक्ती पक्षाचे गणेश दादा हाके पाटील हे आघाडीवर होते. मात्र आठव्या फेरीपासून आमदार बाबासाहेब पाटील यांनी हळूहळू मताधिक्य मिळवण्यास सुरुवात केले व ते त्यांनी शेवटच्या फेरीपर्यंत टिकवले.

मतमोजणीच्या पंधराव्या फेरीमध्ये द्वितीय स्थानावर असलेले गणेश दादा हाके पाटील हे विनायक पाटील यांनी त्यांच्यावर आघाडी घेतल्यामुळे तिसऱ्या स्थानावर फेकले गेले व पहिल्या स्थानावर बाबासाहेब पाटील दुसऱ्या स्थानावर विनायक पाटील व तिसऱ्या स्थानावर गणेश दादा हाके पाटील अशी स्थिती निर्माण झाली. व ही स्थिती शेवटच्या २७ व्या फेरीपर्यंत कायम राहिली. संपूर्ण २७ फेरीच्या मतमोजणीनंतर विनायक जाधव पाटील यांना ६५ २३६, तर गणेश दादा हाके पाटील यांना ६२४४७, तर बाबासाहेब पाटील यांना ९६९०५ मते मिळाली शेवटी बाबासाहेब पाटील यांनी ३१ हजार ६६९ मतांनी विजय मिळवला. बाबासाहेब पाटील यांना विजयात लाडक्या बहिणीचा मोठा वाटा असल्याचे कारण दिले जात असेल



तरी त्यांनी मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास राबवलेली विकास कामे सर्व समाजात सतत संपर्क, भाजप चे नेते ,कार्यकर्ते व. मतदार यांची सहकार्य, माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांचा मतदारसंघांमधील संपर्क याचाही फायदा झाला. मुस्लिम समाजामध्ये बाबासाहेब पाटील व बाळासाहेब जाधव यांचे असलेले सलोख्याचे व जिव्हाळ्याचे सन्मान यामुळे मुस्लिम समाजाने ही प्रवाह विरुद्ध जात बाबासाहेब पाटील यांना मतदान केल्यामुळे त्यांना चांगलेच मताधिक्य मिळाले. भाजपाच्या कोअर कार्यकर्त्यांनी व महिला आघाडीने ही त्यांना प्रचारामध्ये साथ दिली त्यामुळे. त्यांचा विजय आणखीन सुकर झाला. विनायकराव जाधव पाटील यांना मतदारसंघात जास्तीत जास्त मराठा व मुस्लिम मतदान मिळाले. महाराष्ट्र शासनाच्या लाडकी बहीण योजनेचाही फटका त्यांना बसला त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत विनायकराव पाटील यांना पराभवास सामोरे जावे लागले. जनसुराज्य शक्तीचे गणेश हाके-पाटील यांनी व माजी आमदार बब्रूवान खंदाडे यांनी मतदासंघांतील ओबीसी मतदार एकतेसाठी प्रयत्न केला पण उमेदवार ठरवता न आल्याने मात्र ओबीसीमध्ये सुरुवातीला फूट पडली. नाट्यमय घडामोडी घडत माजी आमदार खंदाडे यांनी गणेश दादा हाके यांच्या उमेदवारीला पाठींबा दिला पण ऐनवेळी निवडणूक लढवली व संघटनेची कमतरता मिळालेला कमी वेळ या दोन गोष्टी मुळे त्यांना पराभव सामोरे जावे लागले. अहमदपूर औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे मतमोजणी करण्यात आली.

बाबसाहेब पाटील यांची शहरातून भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली या नंतर झालेल्या विजयी सभेत ते म्हणाले मी विकास मुद्यावर निवडणूक लढवली, मतदारांनी जाती धर्माला थारा दिला नाही. माहायुतीतील सर्व घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केल्याने हा विजय झाला आहे. व्यासपीठावर भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, डॉ. अफसर शेख, शिवानंद हेंगणे, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, अँड. भारत चामे, यशवंत केंद्रे, किशोर मुंडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले. शेतकऱ्याच्या शेती मलाचा भाव कसा वाढेल याकडे लक्ष देणार आहे मतदारसंघातील शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. सर्व मतदारांचे त्यांनी आभार मानले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पिलीव येथील स्वरुप वाघमारे याची प्रिसीजन टेक कंपनीमध्ये निवड

पिलीव, दि. २५ नोव्हेंबर-

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील स्वरुप सत्यवान वाघमारे याची पहिल्याच प्रयत्नात पुणे येथील नामांकित प्रिसीजन टेक या कंपनीमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचा अतुल पाटील, संजय पाटील, झाडे, जाधव, ढोले यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी स्वरुप वाघमारे याचे वडील सत्यवान वाघमारे, आई, भाऊ उपस्थित होते. स्वरुप वाघमारे याने आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर पहिल्यांदाच या कंपनीमध्ये मुलाखत दिली होती.



यामध्ये त्याची निवड झाली. या निवडीबद्दल पिलीव परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याकडून स्वरुपचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### अन्नछत्र मंडळातर्फे आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी हे दुसऱ्यांदा विजयी संपादन केल्याबद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, महेश हिंडोळे, मिलन कल्याणशेट्टी, सिध्दाराम बाके, मधुकर सुरवसे, सागर कल्याणशेट्टी, मनोज कल्याणशेट्टी, बाळा शिंदे, स्वीय सहायक धनंजय गाढवे, यांच्यासह न्यासाचे सचिव शामराव मोरे, मनोज निकम, सौरभ मोरे, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, अतिश पवार, पिंटू साठे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



### श्री विठ्ठल कारखान्यावर यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी

**पंढरपूर, दि. २५ नोव्हेंबर -**

तालुक्यातील वेणुनगर-गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व धुरंधर राष्ट्रीय नेते भारताचे माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे पुर्णाकृती पुतळ्याची विधीपूर्वक पुजा संचालक सिध्देश्वर बंडगर यांचे हस्ते व कारखान्याचे संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास कारखान्याचे संचालक दिनकर चव्हाण, प्रविण कोळेकर, कार्यकारी संचालक आर.बी. पाटील, तसेच कारखान्याचे सभासद, कार्यकर्ते, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते, उपस्थित सर्व संचालक व मान्यवरांनी याप्रसंगी कै. यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहिली.



### कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक पाटील यांना पुरस्कार जाहीर

**पंढरपूर, दि.२५ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती तर्फे दरवर्षी मुख्याध्यापकांनी केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून कृतिशील मुख्याध्यापक हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा हा सन्मान पुरस्कार येथील कवठेकर प्रशालेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री व्ही.वाय. पाटील यांना जाहीर झाला आहे. माजी शिक्षक आमदार तथा महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे प्रदेश सचिव दत्तात्रय सावंत यांनी येथील कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक पाटील यांना या बाबतची माहिती देवून खास अभिनंदन देखील केले आहे. येत्या १ डिसेंबर २०२४ रोजी हा पुरस्कार मुख्याध्यापक पाटील यांना प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान पुरस्कार जाहीर झाल्या नंतर सोमवारी (ता.२५) मुख्याध्यापक पाटील यांचा सत्कार येथील कवठेकर हायस्कुल मध्ये पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र.पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रशालेचे उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व कर्मचारी बंधु-भगिनी यांनी मुख्याध्यापक श्री. पाटील यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीतर्फे प्रदान करण्यात येणारा हा राज्यस्तरीय पुरस्कार रविवारी १ डिसेंबर २०२४ कोर्टी (ता.पंढरपूर) येथील सिंहगड कॉलेज येथे सकाळी १०:३० वा. प्रदान करण्यात येणार आहे.

# पंढरपुरातील इंदिरा गांधी भाजी मंडईची झाली दूरवस्था

## पालिकेकडून दुरुस्ती अन् देखभाल करुन मंडई सुस्थितीत आणण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ नोव्हेंबर-**

शहरातील मध्यवर्ती असलेल्या इंदिरा गांधी भाजी मंडईची सध्या दूरवस्था झाली आहे. त्यामुळे या मंडईच्या दुरूस्ती आणि देखभालीची गरज असून पालिकेने तात्काळ याकडे लक्ष देवुन पावासाळा सुरु होण्या अगोदर संबंधित काम हाती घ्यावे अशी मागणी मंडईतील भाजी विक्रेते आणि शहरातील सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

पंढरपूरात गावभागात असलेली सर्वात जुनी भाजी मंडई म्हणजे इंदिरा गांधी भाजीमंडई. शहरातील मध्यवर्ती आणि सर्वांनाच सोयीची मंडई म्हणून देखील इंदिरा गांधी भाजी मंडईची ओळख आहे. ऐरव्ही तसेच यात्रांच्या काळात या भाजी मंडईत शहरातील नागरिकां बरोबरच वारकऱ्यांची देखील मोठी गर्दी असते. या भाजी मंडई मध्ये भाजीपाल्या बरोबरच किराणा माल, दूध,दही आदींची देखील किरकोळ स्वरुपात विक्री केली जाते. त्यामुळे गावभागातील सर्वसामान्य नागरिकांना भाजीपाल्या बरोबरच दैनंदिन किराणा सामान तसेच दूध,दही आणि लोणी आदी पदार्थांची एकत्रितरित्या इथे खरेदीची सुविधा देखील उपलब्ध होते. त्यामुळे गावभागातील नागरिकांची या मंडई मध्ये वर्दळ असते.

मध्यंतरी ही मंडई पाडून या ठिकाणी दोन,तीन मजली नवीन भाजी मंडई बांधुन त्या ठिकाणी भाजी मंडई आणि दुचाकी, चारचाकी गाड्यांच्या पार्किंगचा देखील घाट घालण्यात आलेला होता. मात्र मंडईतील कायमस्वरुपी व्यापाऱ्यांचा तसेच भाजीपाला विक्रेत्यांचा कमालीचा विरोध झाल्याने पालिकेने हा विषय बाजूला ठेवला. दरम्यान अतिशय



जुन्या असलेल्या या मंडईची सध्या अतिशय दूरवस्था झालेली आहे. या मंडईवर टाकण्यात आलेले पत्रे खूपच जुने झाल्यामुळे पावसाळ्यात अनेक ठिकाणी पत्र्यांमधून अक्षरश: मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होताना दिसते. मंडईतील भाजी विक्रेत्यांसाठी असलेल्या दगडी कट्यांची देखील अनेक ठिकाणी पडझड झालेली आहे. या मंडईतील पावसाचे किंवा मंडई धुतल्या नंतर साठलेल्या पाण्याचा निचरा होण्याची सिस्टीम किंवा अंतर्गत असलेल्या गटारी बुजल्या गेल्यामुळे या ठिकाणी थोडे जरी पाणी आले तरी ते मंडईत साठुन राहते. त्याचा योग्य निचरा होत नाही. त्यामुळे सगळीकडे दलदल होऊन निसरडे होते.

या बरोबरच मंडई मध्ये फ्लोरिंगच्या ठिकाणी असलेले घडीव दगड देखील अनेक भागात निघालेले दिसत आहेत. त्यामुळे मंडईतून चालताना लहानमुले, वृध्द यांना अडचणीचे होते आहे. मंडईचे लोखंडी पत्र्यांचे छत ज्या मोठ्याला लोखंडी गर्डर वर पेललेले आहे ते मोठाले लोखंडी गर्डर देखील पावासामुळे गंजु लागलेले आहेत. त्यामुळे या गर्डरला देखील गंज लागणार नाही अशा प्रकारे ऑईलपेंट देण्याची गरज आहे. पावसाळ्यात गर्डरला तसेच लोखंडी गळणाऱ्या पत्र्यांना सततच्या पावासाच्या पाण्यामुळे इजा पोहचुन एखादी दुर्घटना घडणार नाही या बाबत पालिकेकडून सतर्कता बाळगली जावी. त्यामुळे पावसाळा तोंडावर आलेला आहे त्यापूर्वीच पालिकेच्या वतीने या मंडईच्या देखभाल आणि दूरुस्तीची कामे हाती घेऊन गावभागातील नागरिकांसाठी मध्यवर्ती जुनी असलेली ही मंडई सुस्थितीत करुन द्यावी अशी मागणी नागरिकांमधून तसेच भाजीविक्रेत्यांकडून केली जात आहे.

**स्वच्छतेबाबत पालिकेकडून कमालीची उदासीनता**

या मंडईची पालिकेकडून पूर्वी प्रमाणे नियमीत स्वच्छता देखील केली जात नाही. पुर्वी दर एक, दोन महिन्याला ही मंडई फिनेल टाकून पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांकडून स्वच्छ धुवून घेतली जात असे. मंडई धुण्यासाठी खास पाण्याच्या वॉल्व्हची देखील या मंडईत सुविधा होती.

## उरूसनिमित्त हैद्रा दर्गात विविध धार्मिक कार्यक्रमास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-**

तालुक्यातील हैद्रा येथील ख्वाजा पिर सैफुल मुलक दर्गात उरूस निर्मित२७,२८ व२९ नोव्हेंबर रोजी संदल, चिराग आदीसह विविध धार्मीक कार्यकमाचे आयोजन करण्यात आले आहेत.तरी भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्टीचे चेअरमन एम.डी रफीक सिराजोद्दीन मुजावर यानी केले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हिंदु - मुस्लीम एक्याचे प्रतीक असलेले सुप्रसिद्ध ख्याजा पिर सैपुल मुलक दर्गाचे उरुस दिनांक २७ पासुन प्रारंभ होत असुन दिनांक २८ रोजी गंध( संदल ) चा कार्यक्रम पार पडणार आहे. हजारो वर्षाच्या परंपरेप्रमाणे कर्नाटक येथील करजगी गावचे पाटील परीवाराच्या घरातुन गंध निघणार आहे. तसेच ६ वाजता चिराग ( दिवा ) चा कार्यक्रम तर रात्री ९ वाजता गोरखपुर युपी, येथील नुसरत खानम व पुनाचे कामील चिश्ती यांचा कव्वालीचा मुकाबला होणार आहे.दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी पर्यंत महाप्रसाद चालु राहणार आहे. ख्याजा पिर सैपुल मुलक या दर्गाचे उरुस सलग तिन दिवस चालणार असून या ऊरुसमध्ये हिंदू - मुस्लीम बांधव मोठया संख्येने उपस्थित राहणार आहे.

देश-परदेशातून येणाऱ्या भाविक भक्तांचा हैद्रा येथे प्रचंड गर्दी होत असते.धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रत्येक व्यक्ती, कुटुंब व समाज घटक येवून पवित्र दर्ग्यात नवस बोलतात व नवस फेडण्यासाठी लोकसमुहाचा वर्दळ उरूसच्या काळात पाहवयास मिळत असते.सात ते आठ हजार लोकवस्तीच्या हैद्रा या गांवात ख्वाजा पीर सैफुल मुलक दर्गा प्रसिध्दीच्या जोत्यात आला आहे.सर्व जाती धर्माचे प्रतिक म्हणून या दर्ग्याकडे पाहिले जाते. भाविक भक्तांचा भावनांचा आदर दर्गाह ट्रस्टीकडून जोपासले जातो.कर्नाटक,महाराष्ट्र सीमेवर वसलेले



तीर्थक्षेत्र हैद्रा येथील प्रसिध्द ख्वाजा पीर सैफुलमुलक दर्ग्याचे हजारो वर्षापासून चालत आलेले परंपरा करजगी (कर्नाटक) येथील पाटील या कुटुंबाकडून गंध च्या माध्यामातून येवून परंपरा अविरतपणे चालू असल्याची माहिती दर्गाह ट्रस्टीचे चेअरमन एम.डी रफीक सिराजोद्दीन मुजावर यांनी दिली आहे.

यावेळी व्हा.चेअरमन बंदेनवाज तालाबअली मुजावर, सेक्रेटरी वकील नबीसाब मुजावर,ट्रस्टी अहमद कादरबाशा मुजावर,ट्रस्टी अ.रउफ अहमदसाब मुजावर,ट्रस्टी बंदेनवाज शिराजोद्दीन मुजावर, ट्रस्टी याकूबसाब एम.मुजावर,ट्रस्टी जैनोद्दीन तालाबअली मुजावर,ट्रस्टी अय्युब वकील मुजावर, ट्रस्टी बंदेनवाज दस्तगीर बाशा मुजावर आदी उपस्थित होते.



## हैद्रा दर्गा परिसरात विविध विकासकामांना गती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हजरत खाजा हाजी सैफुलमुल्क चिस्ती कादरी दर्गा परिसरात विविध विकास कामांना गती आली आहे. भाविकानां दर्गा परिसरात सोयी सुविधांवर स्वच्छता भर देण्यात येत असल्याची माहिती हजरत खाजा सैफुलमुल्क चिस्ती दर्गा ट्रस्ट चेअरमन रफिक सिराजोद्दीन मुजावर कादरी यांनी दिली.

हैद्रा येथील हजरत खाजा हाजी सैफुलमुल्क चिस्ती दर्गा हा देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी सर्व धर्मीय लोक दर्शनासाठी येतात. हजरत खाजा हाजी सैफुलमुल्क चिस्ती दर्गा ट्रस्ट कडून दर्गा परिसरात विविध विकास कामे करण्यात येत आहेत. सध्या दर्गा परिसरात ३६ दुकान गाळे काढण्यात आले आहेत. तसेच उघड्या नाल्यावर मुरूम भरून बंदिस्तिकरण करण्यात येत आहे. त्याचबरोबर उघड्या गटारी या बंदिस्तिकरण करण्यात येत आहेत. दर्गा परिसरात मोठ्या प्रमाणात स्वच्छता करण्यात येत आहे. दर्गा ट्रस्ट चेअरमन रफिक मुजावर हे स्वतः थांबून ही कामे जातीने लक्ष देऊन करून घेत आहेत. दर्गा ट्रस्टच्या चार एकर जागेत गार्डनची निर्मिती करण्यात येणार आहे. भक्तांच्या राहण्यासाठी चांगल्या रूम निर्माण करून भक्तनिवास उभे करण्यात येणार आहे. तसेच दर्गा परिसरात वाहनांना पार्किंगची व्यवस्था केली जाणार आहे. कंदुरी करणाऱ्या भक्तांसाठी शंभर रूमची निर्मिती केली जाणार आहे. याचे काम हे पुढील वीस दिवसात पूर्ण होणार आहे. दर्गा परिसरात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या निधीतून एक कोटी ३४ लाख रुपये मिळाले असून दर्गा परिसरातील सिमेंट कॉंक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आता पेविंग ब्लॉक गट्टू बसविले जाणार आहेत. भक्तांसाठी पाण्याची सोय व्हावी यासाठी दोन बोअर द्वारे पाणी व्यवस्था केली जाणार आहे . दर्गावर सुशोभीकरण केले जाणार आहे. दर्गासमोर दीडशे बाय शंभरचा हॉल निर्माण केला जाणार आहे . परिसरातील मशिदीचे बांधकाम हे पंधरा दिवसात सुरू केले जाणार आहे. दर्गा ट्रस्ट कडून अंदाजे दोन कोटी रुपयांची विकास कामे सुरू आहेत. भक्तांनी या सेवेत यथाशक्ती योगदान द्यावे यासाठी देणगी स्वरूपात सहकार्य करावे असे आवाहन हजरत खाजा हाजी सैफुलमुलुख चिस्ती दर्गा ट्रस्ट चेअरमन रफिक सिराजोद्दीन मुजावर कादरी व्हाईस चेअरमन बंदेनवाज तालाबाली मुजावर व ट्रस्ट सदस्य यांनी केले आहे.

# अटीतटीच्या लढाईत सोपल यशस्वी; वैरागचे प्रश्न सुटणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २५ नोव्हेंबर-**

बार्शी विधानसभा मतदारसंघाकडे सोलापूर जिल्ह्याचेच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेले होते. येथे महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी दुरंगी अटीतटीची चुरशीची रंगतदार लढत बघायला मिळाली आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी एकनाथ शिंदेची शिवसेना आणि उध्दव ठाकरेची शिवसेना यांचे उमेदवार आमनेसामने उभे ठाकलेले होते. पण ही लढत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरोधात माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे अशी होती. त्यामुळे या लढतीकडे अख्ख्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेले होते. बार्शीमध्ये दोन्ही सेनाप्रमुखांच्या जोरदार सभा झालेल्या होत्या.

या सभामध्ये महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या उमेदवारासह दोन्ही सेनाप्रमुखांनी जाहीर सभेमध्ये बार्शी येथे त्यांनी वैराग भागाकडे विशेष लक्षं केंद्रीत करणार असल्याचे सांगून वैराग भागातील जे जे विषय आहेत ते निवडून आल्यानंतर दोन वर्षात पूर्ण करणार असे अभिवचन वैरागकरांना दिलेले आहे. यामध्ये वैराग तालुका निर्मिती, बंद पडलेला संतनाथ कारखाना, उजनीच्या पाण्याचा प्रश्न, ग्रामीण रुग्णालय, ग्रामीण भागातील रस्त्यांचा समावेश आहे. बार्शी विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार माजी आ. राजेंद्र राऊत यांचा महाविकास आघाडीचे उमेदवार दिलीप सोपल





यांनी ६४७२ मतांनी पराभव केला आहे. पण वरती महायुतीचे सरकार आलेले असल्याने सोपल हे महाविकास आघाडीचे आमदार असल्याने वैराग भागातील जे कांही प्रश्न, समस्या आहेत त्या सोडविणार का? असा प्रश्न आता वैरागकरांमधून चर्चिला जात आहे.

बार्शी तालुक्यातील ग्रामीण. पण बार्शी आणि वैराग शहरातील मतांमध्ये सोपलांची सरशी झालेली आहे. आगामी काळात होणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद, पंचायत समिती, बार्शी नगरपालिका निवडणुकांकडे आतापासूनच लक्ष देणे गरजेचे झाले आहे. बार्शी तालुक्यामध्ये सहा जिल्हा परिषद गट तर बारा पंचायत समिती गण आहेत. यामध्ये उपळाई ठों- ३१०५, पांगरी-२३७, उपळे दुमाला-२९९ , मालवंडी-१४३६ हे जिल्हा परिषद गट राजेंद्र राऊत यांना आघाडी देऊन गेले आहेत तर पानगाव-४९३, शेळगाव (आर)- ६९८ या जिल्हा परिषद गटात सोपलांची सरशी झाली आहे.

**बार्शी, वैरागवर सोपलांचे कमांड**

ग्रामीण भागातील मतांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास ग्रामीण भागावर माजी आमदार राजेंद्र राऊत यांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते तर बार्शी आणि वैराग शहरामध्ये आ. दिलीप सोपलांचे कमांड असल्याचे दिसून येते.

**आठ पंचायत समिती गटात राऊत आघाडीवर**

बारा पंचायत समिती गणांपैकी आठ गण राजेंद्र राऊत यांना मताधिक्य देऊन गेले आहेत. ते पुढील प्रमाणे उपळाई ठों-१८५४, आगळगाव-१२५१, खामगाव-५८०, गौडगाव-४६९, पानगाव-६०, मालवंडी-१२८३, सासूरे-१५३, शेळगाव-२ तर दिलीप सोपल यांना पांगरी-३४३, उपळे दुमाला-१७०, बावी-५५३, मानेगाव-७०० या चार गणातून लीड मिळालेला आहे.